
साप्ताहिक
# माणूस
शनिवार
२ मार्च १९७४
एक
रुपया



## भीमशक्ती आणि शिवशक्ती : विरोध की सहकार्य ?
## औरंगाबाद-सांगली येथील काही क्रिया आणि प्रतिक्रिया



औरंगाबादेतील शिष्यवृत्तीवाढ आंदोलनात बंदच्या दिवशी वयोवृद्ध श्री. बोरीकर व इतर

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : तेरावे |
| --- | --- | --- | --- |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २ मार्च | अंक : चाळीसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |

# साप्ताहिक माणूस


## ....मित्रहो, आपण सगळेच सारखेच

□ 'माणूस' नियमित मिळतो. अंक चांगल्यापैकी त्रासदायक असतात. तो दिवस अन्न काही घशाखाली उतरत नाही. फार चमत्कारिक अवस्था होते. कारण तिकडच्या आठवणी काढून काही सारखे डोळे गाळणे जमत नाही, बरे दिसत नाही अन् वाटतही नाही. पण त्या आठवणी आल्याशिवाय रहात नाहीत. तुलनेने हे जग कमालीचे श्रीमंत अन् संपन्न आहे. अन् इथे एकच वर्षासाठी आहे म्हटले तरी अपराधी वाटत रहाते. लोक सतत प्रश्न विचारतात कारण B. B. C. वर भारतातल्या सर्व संप, दंगली, भूक-बळी वगैरेंच्या नेमक्या बातम्या दिल्या जातात. फ्रेंच रेडिओ त्यामानाने थोडा रोमँटिक आहे. क्वचित कधीतरी भारताबद्दलची बातमी दिली जाते अन् तीही 'भारतात एका हत्तीने जखमी माहुताला उचलून पोलीस ठाण्यावर नेला' अशा प्रकारची. आता आंतरराष्ट्रीय पातळीवरून दिल्या जाणाऱ्या बातम्यांमध्ये अशा बातमीला काय महत्त्व हा प्रश्न खास फ्रेंच जिव्हाळ्याचा असावा.

हा आठवडाभर अनेक प्रश्नांना उत्तरे दिली. काही प्रश्न अगदी टिपिकल होते. उदा... चातुर्वर्ण्य (स्पष्ट सांगायचे तर अस्पृश्यता) अजून आहे का ? शाळा अस्तित्वात आहे का ? कर्म, आत्मा म्हणजे काय ? तुमची अशी भाषा कोणती अन् ती लिहिता वाचता येते का ? म्हणजे तिची लिपी अस्तित्वात आहे का ? शिवाय महाराजा, हत्ती-वाघ-सिंह, कुंकू, देवळे इ. सर्व अज्ञानपूर्ण प्रश्न होतेच. वास्तविक दोन च महिन्यांपूर्वी डॉ. मोडक (खानापूरचे) या मंडळींना भेटून गेले होते. पण भारतात माणसे माणसांसारखीच अन् जनावरे जनावरांसारखीच आहेत यावर विश्वास ठेवायला मंडळी तयार नसावीत किंवा ते तसे आहे हे कळल्यावर त्यांची निराशा होत असावी. सगळे thrill च संपले की मग ! अशा प्रश्नांना थंड डोक्याने उत्तरं देणं महाकठीण कसरत आहे बुवा. पण कधी कधी फार पेचात टाकतात काही लोक. 'काहो तुमच्या देशात इतके गरीब आहेत, भाव भडकतायत, अन्नधान्य बाजारातून गडप होतेय, विजेवर बंधने, पेट्रोलचे रेशन आहे, पण तुमची लग्ने, उत्सव, मिरवणुकी, समारंभ अगदी यथास्थित बँडबाजा लावून पार पाडतात हे कसे काय ? की ही बंधने फक्त गरिबांसाठीच अन् कायदेही फक्त गरिबांसाठीच आहेत ?'

मी गप्पच बसते. या लोकांना लाडूचिवड्याच्या राशीत डुंबण्याची गंमत सांगून काय कळणार ? अशा वेळी आपण फक्त सभेत तोंडाचा पट्टा अन् वर्तमानपत्रात लेखणी चालवायची असते. पुन्हा आपण करायचे तेच करायचे असते हे गुपीत यांना अजून कळलेले दिसत नाही. अनेक लोक तो पट्टा अन लेखणी न चालवताही सगळे पार पाडीत असतात ते तर ग्रेटच. मला हसावे, रडावे की चिडावे तेच कळत नाही. यातले काहीच करणे जमू नये इतके रक्त थंड झालेय असे वाटते. शेवटी मी उत्तर देते, ते द्यावेच लागते, 'हे असेच आहे. मीही त्यातलीच एक आहे. माझ्याही घरात तेच चालते, मीही त्यात भाग घेते. 'ती' जाणीव मधूनच अभद्र पालीसारखी अंगावर चढते, जागे करू पहाते पण झोपेचे सोंग घेतलेल्याला जागे कोण करणार ? ती पाल झटकून मी पुन्हा उत्सवात सामील होते. मोतीचुराचा लाडू, कांद्याची भजी अन् अळूची भाजी तुम्ही कधी चाखलीत तर त्याची नशा तुम्हाला कळेल. जबर असते ती, एक का दहा पेशवाया बुडल्या तरी उतरायची नाही. उष्टया पत्रावळींचे दान देण्याचे पुण्य हुकले तर ?

पोट अति भरल्यामुळे तुम्ही हिप्पी झालात. आम्ही पोट रिकामे म्हणून हिप्पी झालो. शॉर्ट कट. पोट भरेपर्यंत कष्ट करायचा ताप नाही. डायरेक्ट मेथड. म्हणून मित्रहो, आपण सगळे सारखेच. तुम्हाला भूक नाही म्हणून तुम्ही खात नाही आम्हाला पोटात टाकायलाच काही नाही म्हणून आम्ही खात नाही.

आमच्याकडे येऊन तुम्हीही काही शिकलात हे बाकी बरे झाले. तुम्हीही रस्त्यात घाण करायला, भीक मागायला लागलात.

तुमच्या हॉटेलातल्या पदार्थात झुरळांना मानाचे स्थान मिळायला लागले.

ऐतिहासिक ठिकाणी भिंतींवर शिलालेख कोरायला शिकलात.

अशा अनेक बारीकसारीक गोष्टींमुळे आता कसे घरच्यासारखे वाटते आम्हाला.

हळू हळू आमचा कर्मयोगही शिकून टाका !

[ –माधुरी पुरंदरे, सध्या प्रगत चित्रकला अभ्यासासाठी वर्षापुरता मुक्काम पॅरीस. संपादकांना आलेल्या 'घरगुती' पत्रातील काही भाग. ]

# विद्यार्थी आंदोलन : औरंगाबाद

सु. ल सोमण

मी औरंगाबादेत पोचलो तेव्हा तिथलं आंदोलन संपलेले होते. मुख्य मागणी काही अंशी पदरात पाडून घेऊन! एखाद दिवसच आधी युक्रांदतर्फे एक व रिपब्लिकन स्टूडंट्स फेडरेशन तर्फे एक असे दोन विजय मोर्चेही निघाले होते. 'युक्रांद'चे विजयानिमित्तचे शिबीरही पार पडले होते. त्यामुळे मी औरंगाबादेत पाय ठेवला तेव्हा आंदोलनाचे कवित्व तेवढे उरले होते. आंदोलन काळात स्पृश्य-अस्पृश्य एकत्रित येऊन लढले होते. प्रश्न जरी प्रामुख्याने दलितांचा होता तरी दलितांच्या प्रश्नावर सवर्णांनी त्यांच्या पाठीशी उभे राहून एवढ्या मोठ्या प्रमाणावर आंदोलन उभारावे हे औरंगाबादेतल्या अनेक जुन्या जाणत्यांना आंदोलनाचे हे फार मोठे यश वाटत होते.

हा आशावाद चांगला नक्कीच पण मी जेव्हा घडलेल्या काही घटना टिपू लागलो, तेव्हा एक गोष्ट प्रकर्षाने माझ्या लक्षात आली ती ही की खुद्द आंदोलनाच्या काळात दलित पॅन्थर्सनी आंदोलनाला विरोध केला होता. राजा ढाले व नामदेव ढसाळ ह्यांची औरंगाबादेत येऊन 'युक्रांद'वाल्यांना विरोध केला होता. आंदोलनात सामील होऊ नका... छोटे छोटे तुकडे आमच्या अंगावर फेकून पॅन्थर्सच्या आंदोलनाची धार बोथट करायचा हा शासनाचा प्रयत्न आहे. अशा तुकड्यांनी आता आमचे समाधान होणार नाही. मुंबईत दलित पिळून निघत आहेत. त्यांच्या स्त्रियांवर अत्याचार होत आहेत. त्याविरुद्ध आम्ही प्रतिकार करीत आहोत. त्यावेळी असल्या आंदोलनामुळे दलित वर्गांच्या समाजाचे चित्र मुख्य लढ्यापासून विचलीत करायचे हे शासनाचे तंत्र आहे. आंदोलनाचा देखावा उभा करून काही तुकडे दलितांच्या पुढ्यात टाकून दलितात फूट पाडायचा हा कावा आहे... पॅन्थर नेत्यांनी धरलेला सूर साधारणतः हा असा होता. प्रत्यक्ष आंदोलनाच्या काळात दलित विद्यार्थ्यांनी 'युक्रांद'शी सहकार्य जरी केले तरी नंतरच्या काळात 'युक्रांद' व त्यांचे समर्थक ह्यांच्या विरुद्ध 'पॅन्थर्स'नी आघाडी उघडल्याचे स्पष्ट जाणवत आहे.

मी औरंगाबादेत पोहोचलो त्याच दिवशी संध्याकाळी तिथले एक सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार श्री. बाबा दळवी ह्यांच्या नेतृत्वाखाली युवक सहजीवन संस्थेतर्फे चालविल्या जाणाऱ्या खाणावळीत त्यांच्यासह गेलो होतो. दलित विद्यार्थी–विद्यार्थिनींसाठी अवघ्या तीस रुपयात दोन्ही वेळचं जेवण ही संस्था उपलब्ध करून देते. बाबा दळवीकडून ह्या संस्थेची माहिती उपलब्ध करून घेत असतानाच, एक विद्यार्थी रडत रडतच खाणावळीत पोहचला... बाबा, बाबा, प्रभाकर सोनवणेला ती मुले मारताहेत. लौकर चला.' आम्ही त्या खाणावळीतील बाबांचे काम अर्धवट सोडून रिक्षा पकडून मिलींद महाविद्यालयाच्या वसतीगृहाकडे धाव घेतली. तिथे मिळाली ती हकीगत अशी–

प्रभाकर सोनावण हे पूर्वी रिपब्लिकन स्टूडंट्स फेडरेशनचे सेक्रेटरी होते. मध्यंतरी आंदोलन काळात, 'युक्रांद' बरोबरच्या सहकार्यामुळे त्यांच्यावर त्याच्या सहकाऱ्यांचा रोष होऊन त्यांना सेक्रेटरीपदावरून मुक्त करण्यात आले (सोनावणे ह्यांच्या मतानुसार त्यांनी राजीनामा दिला!) त्यानंतर प्रभाकर सोनावणे 'युक्रांद'मध्ये सामील झाले. साहजिकच 'युक्रांद'चा विजय मोर्चा व नंतरचे शिबीर ह्यांनाही ते उपस्थित होते. त्यामुळे चिडून जाऊन पॅन्थर्स नेत्यांनी त्यांच्यावर हल्ला चढविला असावा. (पॅन्थर्सच्या म्हणण्यानुसार मात्र हा हल्ला सवर्णांनी चढविला असून, पॅन्थर्सना बदनाम करण्याचा हा हल्लीचा राजमान्य मार्ग झाला आहे!) प्रभाकर सोनावणे त्या दिवशी, म्हणजे १८ तारखेला संध्याकाळी खाणावळीतील जेवायला निघाले होते, वाटेत त्यांना बाजूला घेऊन मुलांनी त्यांच्यावर हल्ला चढविला. आपल्या पोलीस तक्रारीत त्यांनी ५–७ पॅन्थर्स म्हणवून घेणाऱ्या काही तरुणांची नावेही दिली आहेत,

ह्याच रात्री ११। वाजता मिलिंद महाविद्यालयाच्या वसतिगृहात राहाणाऱ्या आणखी एका विद्यार्थ्यावर सुरीहल्ला झाला. हा विद्यार्थी दगावला नाही एवढेच, पण त्याला मार मात्र खूप लागला आहे. १७ तारखेच्या रात्री ह्याच महाविद्यालयाच्या वसतिगृहावर शेकडो तरुणांचा (ते दलित पॅन्थर्सचे तरुण होते असा 'युक्रांद'चा दावा आहे.) ताफा लाठ्या, काठ्या, चाकू, सुरे घेऊन आला होता. रेक्टरच्या मध्यस्थीने ह्यावेळचा होऊ घातलेला भीषण प्रसंग टळला.

राजा ढाले–नामदेव ढसाळ ही जोडी औरंगाबादला येऊन जाण्यापूर्वी दलित विद्यार्थी कुमार सप्तर्षींकडे झुकला होता. पण त्याच कुमार सप्तर्षींना आंदोलनानंतर तीनच दिवसांनी विद्यार्थ्यांनी अक्षरशः हूट-आऊट केले. ('युक्रांद'च्या कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार काही पँथर्सनी विरोध केला हे खरे, पण 'हूट-आऊट' वगैरे काही केले नाही!') अशी अनेक उदाहरणे नंतरच्या दिवसात घडत होती. विद्यापीठात मी गेलो तेव्हा तिथल्या एका विद्यार्थ्याने (तो कवी आहे!!) सांगितले. '...नुकतीच अत्यंत गुप्तपणे इथे 'मराठा पँथर्स'ची स्थापना झाली आहे. 'दलित पँथर्स'चा समर्थ मुकाबला करण्यासाठी... 'म्हणजे झालेच! दोन पँथर्समधले झगडे आणि विद्यापीठ-विद्यार्थी ह्यांच्यातले वितुष्ट, म्हणजे आता आम्हा शिकवणाऱ्यांची वाटच!...' माझे एक जुने मित्र प्रा. मोरवंचीकर ह्यांची 'मराठा पँथर्स'च्या बातमीवरील ही प्रतिक्रिया!...

हे सारं लिहायचे कारण एवढेच की 'युक्रांद'ने ह्या आंदोलनात

भाग घेऊन दलित-दलितेतरात सामंजस्य निर्माण करण्याचे कार्य केले. ह्या आशावाद बऱ्याच प्रमाणात अर्धसत्य स्वरुपाचा आहे. एवढेच नाही तर 'युक्रांद' व कुमार सप्तर्षींच्या आंदोलनातल्या 'एंट्री' बाबतही फार मोठ्या प्रमाणात कर्तृत्व विद्यार्थ्यांच्या अन्य संघटनांत आहे. दलित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ व्हावी अशी हाक प्रथम अन्य संघटनांनी दिली. त्यासाठीच्या आंदोलनाचा नारा लगावून त्यासाठी पार्श्वभूमी तयार केली. एवढं असूनही ऐनवेळी आपण काही फार मोठा कार्यक्रम हाती घेत आहोत असा स्टंट करून कुमार सप्तर्षी आणि युक्रांद यांनी ह्या आंदोलनात उडी घेतली. एकांगी स्वरुपाचा प्रचार करून दलितांच्या, दलितांनीच पुढाकार घेतलेल्या आंदोलनाचे यश पटकावण्याचा प्रयत्न केला अशी बहुसंख्य विद्यार्थी संघटनांची भूमिका आहे. इथले एक जुने जाणते व सर्वसामान्य समाजवादी नेते ह्या संबंधात माझ्याशी बोलताना म्हणाले, '... युक्रांदने इथे येऊन ज्या पद्धतीने आंदोलन हाताळलं, त्यामुळे माझ्या सारख्या जुन्या लोकांची फार अडचण झाली. आपल्याच बैठकीतला माणूस म्हणून आम्ही गप्प बसलो एवढेच. शिवाय कुणी-कडून का होईना, न्याय्य प्रश्नावरचा लढा पुढे सरकत होता... पण एक गोष्ट खरी की कुठल्याही स्थानिक संघटनांशी, संस्थांशी सल्ला-मसलत न करता, युक्रांदने इथे उडी घेणे योग्य नव्हते !...'

२६ जानेवारीला हे 'शिष्यवृत्ती वाढ' आंदोलन सुरू झाले. तत्पूर्वी इथे डिसेंबरमध्ये 'परीक्षा फी माफी' आंदोलन छेडले गेले होते. गेल्या वर्षाचा भयानक दुष्काळ, नंतरची बेफाट भाववाढ, ह्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी मिळावी ही मागणी मुसा (मराठवाडा युनिव्हर्सिटी स्टूडंटस असोसिएशन) ह्या विद्यार्थी संघटनेने पुढे मांडली. 'मुसा' पूर्वी एस्. एफ्. आय. (स्टूडंटस् फेड-रेशन ऑफ इंडिया) ह्या संघटनेने ती पुढे मांडली होती. मुसाने ह्या खेरीज, मुसाची मान्यता, आर्थिक निकषावर सर्वच दलितांना संपूर्ण फी माफी व शिष्यवृत्ती (तीही वाढीव !) ह्याही मागण्या ह्याचवेळी मांडल्या होत्या. मुसा ही म्हटली तर विद्यार्थ्यांची प्रातिनिधिक संघटना आहे. म्हटली तर नाही. ह्या संघटनेला विद्यार्थ्यांचे सदस्यत्व नाही. प्रत्येक महाविद्यालयातल्या विद्यार्थी संसदेचा अध्यक्ष व एक प्राचार्यांनी नेमलेला प्रतिनिधी असे दोघेजण प्रत्येक कॉलेजातून 'मुसा'वर, प्रतिनिधीत्त्व करतात. मराठवाडा विद्यापीठातल्या ८२ महाविद्यालयातल्या अशा दोन दोन प्रतिनिधींच्या सभासदत्त्वावर मुसाचा डोलारा उभा आहे. ह्या प्रतिनिधीतून मुसाची कार्यकारिणी आणि पदाधिकारी निवडले जातात. रिपब्लिकन फेडरेशनचे (व सध्याचे पँथरचे) श्री. गाढे हे ह्या मुसाच्या सेक्रेटरी पदावर आहेत, तर नॅशनल स्टूडंट्स युनियन ह्या काँग्रेसवादी विद्यार्थी संघटनेचे श्री. कल्याणकर हे ह्या संस्थेच्या उपाध्यक्ष पदी आहेत. एस्. एफ्. आय. ह्या मार्क्सवादी संघटनेचे श्री. मोरे हेही मुसाचे एक पदाधि-कारी आहेत. थोडक्यात मुसाचे निदान बाह्यात्कारी दर्शन तरी असे काहीसे निःपक्ष आहे. तथापी सर्वश्री राजुरकर, पाथरीकर, कल्याण-कर, शिंदे आदि मुसा पदाधिकाऱ्यांचा कल काँग्रेसकडे आहे. त्यामुळे काहीशी काँग्रेस संघटना असे स्वरूप मुसाला आले आहे. मुसाच्या मागच्या निवडणुकात कुणाला उभंही राहू न देता, ठराविक तोच काँग्रेस कार्यकारिणीत निवडून येईल अशी खबरदारी घेतली गेली, असा आरोप मला ऐकवला गेला. मुसानेही, विद्यार्थ्यांच्या प्रश्नां-बरोबरच महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद आता मराठवाड्याकडे आले पाहिजे, अशीही मागणी पुढे केल्यामुळे मुसावर शंकरराव चव्हाण-वादी काँग्रेस गट असाही शिक्का लागला आहे.

एवढे असले तरी, इतर मागण्यांबरोबरच दलित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीतील वाढीचा प्रश्नही त्याचवेळी, म्हणजे डिसेंबरच्या फी माफी आंदोलनाच्या वेळी एस. एफ. आय., मुसा ह्या विद्यार्थ्यांनी उपस्थितीत केला होता एवढे निश्चित. त्यावेळी ह्या प्रश्नावर साध्या वाटाघाटींचे मार्ग संपल्यावर, विद्यार्थ्यांना रस्त्यावर यावे लागले, आणि फी माफीसाठी विद्यार्थ्यांना संप पुकारावा लागला. दुर्दैवाने सर्वच विद्यार्थ्यांचे आंदोलन असूनही मिलींद आंबेडकर ह्या प्रायः दलित विद्यार्थी (९०%) असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थी मात्र ह्या आंदोलनापासून अलिप्त राहिले. असे म्हणतात की उच्च महाविद्यालयीन विद्यार्थी संसदेचे अध्यक्ष व मुसाचे सेक्रेटरी श्री. गाढे हे त्यावेळी 'चाकू'चा धाक दाखवून ह्या दोन महाविद्या-लयातल्या विद्यार्थ्यांना संपात सामील व्हायला मना करीत होते. संपात सहभागी न व्हायचे मुख्य कारण मुसाने मुख्यमंत्रिपदाचा वाद विद्यार्थी पातळीवर आणला हे आम्हाला मान्य नव्हते हे आहे. केवळ फी माफीचा प्रश्न असता, तर आम्ही त्याला निश्चित पाठिंबा दिला असता, असे श्री. गाढे सांगतात. तर त्याच वेळी 'मुसा'चे कल्याणकर म्हणतात की 'बाकीच्या मागण्या नंतर चर्चा करून सोडवता येतील अशीच आमची भूमिका होती.' संप होता तो निव्वळ फी माफीसाठी. त्यात सर्वांना सहभागी व्हायला काहीच हरकत नव्हती...काहीशी अशीच भूमिका एस एफ. आय. चे श्री. मोरे ह्यांचीही होती.

## गाजलेला घेराव

भूमिका कुणाच्या काही असल्या तरी एक गोष्ट मात्र निश्चित होती. एस. एफ. आय., मुसा आदिच्या त्या फी माफी आंदोलनाला दलित विद्यार्थ्यांनी पाठिंबा दिला नाही. 'युक्रांद'ची ताकद लहानशीच– निदान तेव्हा तरी होती. त्यांनीही पाठिंबा दिला नाही असा इतरांचा आरोप आहे. दलितांनी पाठिंबा दिला नाही एवढेच नाही, तर मुसाच्या विद्यार्थ्यांना भरघोस मारपीटही केली. तीन दिवसांच्या संपानंतर, तडजोडीचे काही चिन्ह दिसेना. तेव्हा विद्यापीठाचे कुलगुरु रे. पं. नाथ ह्यांना विद्यार्थ्यांनी घेराव घातला. ह्या घेरावात, विद्यार्थ्यांची मागणी एवढीच होती, की श्री नाथांनी आपले वजन खर्च करून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून द्यावा. मुख्यमंत्री व पंतप्रधान ह्यांना विद्यार्थ्यांसमोर फोन करून विद्यार्थ्यांची गाऱ्हाणी त्यांच्या कानावर घालावी. परंतु मला जे सांगितले गेले त्यानुसार, प्रा. नाथांनी मुख्यमंत्र्यांना फोन लावण्याऐवजी आंबेडकर व मिलींद महाविद्यालयांना फोन लावले. 'मिलींद'चे प्रा. सूर्यवंशी ह्यांना विद्यार्थ्यांच्या विरोधात, घेराव-काळात स्वतःजवळ बसवून घेतले. 'आपण कुलगुरूंचे बॉडीगार्ड आहोत.' असा दावा प्रा. सूर्यवंशींनी केल्याचेही मला सांगितले गेले ! ह्या तणावातच, कुलगुरूंना पडलेला घेराव उठवण्यासाठी मिलींद व आंबेडकर महाविद्यालयांचे दोन ते तीन हजार विद्यार्थी विद्यापीठावर जणू चालच करून आले. पोलिसांच्या उपस्थितीत, ह्या दलित विद्यार्थ्यांनी घेराव घालणाऱ्या सवर्णांच्या विद्यार्थ्यांना अक्षरशः बदडून काढले. कुलगुरूंच्या मनाई-

मुळे समोर सवर्ण विद्यार्थ्यांना बुकलून काढले जात असताना; पोलिसांना म्हणे हस्तक्षेप करता आला नाही. घेराव असा मोडून काढल्यावर कुलगुरूंना खांद्यावर उचलून घेऊन, दलित विद्यार्थ्यांनी त्यांची मिरवणूक काढली. मिरवणुकीचे सभेत रूपांतर झाल्यावर, 'युवा शक्तीवर आज भीमशक्तीने विजय मिळवला' असे म्हणून नाथांनी असेही सांगितले म्हणे की, ह्या भीमशक्तीवरच विद्यापीठात आपले आसन मानाने टिकवून धरणे त्यांना जमले आहे.

ह्या गाजलेल्या घेराव प्रकरणानंतर कुलगुरूंनी महाविद्यालये व विद्यापीठ बारा दिवसांसाठी बंद राहातील असे घोषित केले. ह्या सुटीच्या काळात फी माफी प्रकरणावर तडजोडही निघाली आणि ५०% फी माफी सर्व विद्यार्थ्यांना देण्याचे जाहीर केले गेले. विद्यार्थ्यांचे आंदोलनही मागे घेतल्याचे मुसाने जाहीर केले...

पण मध्यंतरीच्या काळात सर्वांचीच मने आंदोलनाने घेतलेल्या वळणामुळे नासली होती. दलित दलितेतर धुसफूसही वाढली होती. त्यातच मुंबईला दलित पॅन्थरच्या चळवळीने नवा वेग घेतल्यामुळे त्याचे पडसाद इथल्या आधीच्याच तणावपूर्ण परिस्थितीवर उटतात की काय असेही वाटू लागले होते. प्रामुख्याने दलित व मराठा समाज असे एकमेकांविरुद्ध धुमसत असता, परिस्थिती स्थानिक नेतृत्त्वाने काबूत ठेवली असे मला वाटते...

या पहिल्या फी माफी वाढीच्या आंदोलनातून वाढीला लागलेली जातीय तेढ, कुलगुरु व विद्यापीठ ह्यांच्या विरुद्धचे आरोप-प्रत्यारोप ह्या पार्श्वभूमीवरच विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीवाढीसाठीच दुसरे आंदोलन पुढे सरकत होते...

## जातिय तत्त्वावरील विभागणी

औरंगाबादेतला जातीय तणाव वाढीस लागावा अशीच एकूण शैक्षणिक (किंवा महाविद्यालयीन म्हणणं अधिक श्रेयस्कर ठरेल!) औरंगाबादची परिस्थिती आहे. इथली महाविद्यालये उघड उघड जातीय व्यवस्थेवर विभागली आहेत. आंबेडकर व मिलींद ह्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयांत प्रायः बौद्ध विद्यार्थी आहेत. जवळ जवळ शेकडा ९८ देवगिरी विवेकानंद महाविद्यालयांत मराठा विद्यार्थी एवढ्या मोठ्या प्रमाणावर आहेत. सरस्वती भुवन महाविद्यालयात ब्राह्मण, व्यापारी वगैरेंचा भरणा आहे तर मौलाना आझाद महाविद्यालयात मुसलमानांचा! शासकीय महाविद्यालय हे वरिष्ट अधिकाऱ्यांच्या मुलांचे जणू राखीव महाविद्यालयच आहे. तर वसंतराव नाईक महाविद्यालय हे काही अंशी मिश्र महाविद्यालय आहे. वसंतराव नाईक कॉलेजही प्रामुख्याने वंजारी जातीच्या विद्यार्थ्यांनी भरले आहे असे मला सांगितले गेले, पण तिथले प्राचार्य राजाराम रानडे ह्यानी माझा हा समज खोडून काढला.

निखळ जातीय तत्त्वावर विद्यार्थी जगत एवढे विभागलेले इतर कुठे क्वचितच आढळेल. विविध जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांवर त्याचा नकळतही परिणाम होणे अपरिहार्य होते व त्यातून परस्परां विषयीची तेढ वाढत जाणेही अपरिहार्यच होते. आणि अशाच पार्श्वभूमिवर 'शिष्यवृत्ती वाढ' आंदोलनाची हाक दिली गेली होती.

शिष्यवृत्ती वाढ हे प्रामुख्याने दलित विद्यार्थ्यांचे आंदोलन होते. सामाजिक हलक्या दलितांचे 'फी माफ' आंदोलन हे डिसेंबरमध्ये मुसानी छेडले त्यावेळी शिष्यवृत्ती वाढ प्रश्नावरही विद्यार्थ्यांनी आवाज उठवला होता. त्यावेळी बुद्धविद्यार्थ्यांनी त्या आंदोलनाला विरोध केला होता. फी-माफ प्रश्नावर मुसाच्या विद्यार्थ्यांनीं कुलगुरुंना घातलेल्या 'घेराव'वर हल्ला चढवून दलित विद्यार्थ्यांनी सवर्ण विद्यार्थ्यांना पिटून काढले होते. दलित विद्यार्थ्यांच्या 'शिष्यवृत्ती वाढ' आंदोलन प्रकरणी साहाजिकच सवर्ण विद्यार्थ्यांची वृत्ती काहीशी अलिप्त होती. ह्या आंदोलनात सक्रीय भाग घ्यायचं टाळताना, मुसानी असा युक्तिवाद केला की केवळ जातीय दलितच नव्हे तर सर्वच दलित विद्यार्थ्यांना (म्हणजे आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या मराठा, ब्राह्मण आदि सर्व दलितांना!) शिष्यवृत्ती मिळावी व तीही वाढवून! रिपब्लिकन स्टूडंट्स फेडरेशन आणि दलित युवक आघाडी ह्या दोन संघटनांना जी आंदोलनाची हाक दिली होती, ती सध्या शिश्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या दलित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाढवून मिळावी एवढ्यासाठी. अर्थातच मुसा आदि संघटना ह्या आंदोलनापासून अलिप्त राहिल्या. एस्. एफ्. आय. ह्या मार्क्सवादी संघटनेने दलित विद्यार्थ्यांची मागणी उचलून तर धरलीच पण त्याचबरोबर लढ्याची भाषाही सुरू केली. भारतीय विद्यार्थी परिषदेचे काम सध्या इथे शून्य आहे. तरी त्यांनींही मागणीला पाठिंबा दिला.

आणि अशा पार्श्वभूमीवर पहिल्या आंदोलनात फारशी पुढे नसलेली 'युक्रांद' ह्या आंदोलनात उतरली. जवळ जवळ ८–९ हजार विद्यार्थ्यांचा भक्कम गट. जवळ जवळ एकसंघ. त्यामुळे आंदोलनात उतरता उतरता 'युक्रांदने प्रत्यक्ष लढ्याची भाषा सुरू केली. सुरूवातीला रिपब्लिकन स्टूडंट्स फेडरेशन आणि दलित युवक आघाडी ह्यांच्या बरोबर 'युक्रांद'ने आंदोलन चालवावे असे ठरले. पण डॉ. कुमार सप्तर्षि जेव्हा स्वतः प्रत्यक्ष औरंगाबादला तळ देऊन बसले तेव्हा कुणाच्याही नकळत आंदोलनाचे नेतृत्त्व त्यांच्याकडे गेले. त्यांच्या व 'युक्रांद'च्या मिषाने अनेक डाव्या विचारसरणीचे विद्यार्थी व तरुण आंदोलनाकडे खेचले गेले. दलितांच्या मागे सवर्णांची ताकदही उभी राहू लागून, केवळ दलितांची चळवळ हे स्वरूप जाऊन दलितांच्या मागण्यासाठी व्यापक चळवळ हे स्वरूप आंदोलनाला येऊ लागले. मुसा, एन्. एस्. यू. (कॉंग्रेस प्रणीत) आदि संघटनांना त्यामुळेच युक्रांद रिपब्लिकन दलित युवक ह्यांच्या संयुक्त आंदोलनाला पाठिंबा जाहीर करावाच लागला. ह्या संघटनांनी आंदोलनात प्रत्यक्ष सहकार्य जरी दिले नाही, तरी त्यांच्या शाब्दिक पाठिंब्यामुळे आंदोलकांचे बरेच काही साधले! कुमारांच्या भाषणांनीही बरीच हवा निर्माण केली. ह्या साऱ्याचा परिणाम योग्य तोच झाला आणि २६ जानेवारीपासून चालू झालेल्या प्रत्यक्ष कृतिशील (सत्याग्रह!) आंदोलनाला चांगला प्रतिसाद मिळाला.

ह्या आंदोलनात प्रत्येक महाविद्यालयावर गेट मिटींग्ज युक्रांदनी घेतल्या. जातीय कवच फोडून चळवळ सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोचवण्याचे कार्य त्यामुळे काही अंशी सुकर झाले. 'युक्रांद'नी सत्याग्रहाचा मार्गही वेगळा अनुसरला. विद्यापीठ वा महाविद्यालये ह्यांच्या परिसरात हे सत्याग्रह न करता, रहदारीच्या रस्त्यावर बसून सत्याग्रहाचे सत्र आरंभले गेले. सामान्य जनतेचे लक्ष त्यामुळे ह्या विद्यार्थीआंदोलनाकडे अधिक प्रकर्षाने वेधले गेले. कुमारांनी सुरू केलेला

पृष्ठ ३१ वर

# चुकार चित्त्यांचे बिनचूक बंड

आशय : वसंत लुले   शिल्प : रमेश गुप्ता

मतपक्षपंथांच्या सांस्कृतिक जंगलात
अहिंसाधर्म स्वीकारलेल्या द्विपाद प्राण्यांची
परवा चैत्यभूमीवर एक विराट सभा झाली.
आणि तेथे वाट चुकलेल्या हिंस्र चित्त्यांना
एकमताने जातीबाहेर काढण्यात आले.
'पँथर आपल्या मरणाने मेला !'
असे शोकपूर्वक जाहीर करण्यात आले.

पण हे जाहीर करणाऱ्यांनी
फक्त देखाव्याची दखल घेतली आहे.
त्यांची दृष्टी जीवनाची फक्त
टरफलेच टिपू शकते.
घटनांच्या चिरतरुण गाभ्यात
ती शिरणे कसे बरे शक्य आहे ?
कारण तिचा पल्ला मतलबांच्या मर्यादांनी
जखडलेला आहे.

खरे म्हणजे पँथर मेलेला नाही
आणि त्याने कोणास मारलेलेही नाही.
उलट त्याला शत्रू मानून त्याच्या
जिवावर उठलेल्यांनाच
त्याने जीवदान दिले आहे.
पित्ते बनलेल्या आपल्या पित्यांची
व पितामहांची चित्तशुद्धी
या दलित चित्त्यांनी साधलेली आहे.

जातीवंत चित्ता घालतो तशी
सावज बेसावध असता त्याते झडप घातली
आणि साऱ्यांनाच हव्या असलेल्या
परिणामांची शिकार साधली,
बापांच्या चाळिशीतून हे बच्चे
वाट चुकत असलेले दिसत असले
तरी खुद्द त्यांना वठणीवर आणणारे
चुकार चित्त्यांचे हे बंड
अगदी बिनचुक ठरले आहे.
या शॉक ट्रीटमेंटने
पक्षघात झालेला आपला पक्ष
त्यांनी पुन्हा जिवंत केला आहे.
चैत्यभूमीवर पुन्हा उसळून उठलेले चैतन्य
ही या दलित, शापित, चुकार
चित्त्यांची देणगी आहे !
मत हे सत्याने घेतलेले रूप असते,
आचार हे अस्तित्वाने पांघरलेले वस्त्र असते.

मते आणि आचार जुने होतात.
पण अस्तित्वाचे सत्य चिरतरुण असते
मरत असते ती मरगळ असते
आणि जीवनाचा क्रांतिकल्लोळ
नेहमी नवाच असतो.

दलितांच्या नेत्याने एक सत्य
उद्घोषिले होते
ते सत्य होते समतेचे
दलितांचे राज्य स्थापित करण्याचे.
पण या सत्याचे विचाररूप मरगळले
आणि आचारवस्त्र विरून ठायीठायी फाटले
जात न मानणारा धर्मपंथ त्याने स्वीकारला होता.
पण या धर्मपंथाचीच नवी जात झाली.
दलितांचे आश्रिताची कळा ल्यालेले
लाचार अस्तित्व त्याला नको होते
पण राजकीय दलालांनी
त्याची शिकवण व संस्कार विसरून
आपल्या मतलबी सौदेबाजीसाठी
त्याचेच राजकीय भांडवल केले
फेकलेल्या तुकड्यांची बस्ताने जपत
ते स्वतः चढत गेले.
पण दलितांची अजाण गर्दी
त्याच खातेऱ्याच्या खाईत पडून राहिली

दलितांच्या भीमशक्तीने या देशाचे भवितव्य घडविणारे
नीलचित्र आपल्या राकट हातांनी रेखाटले होते
पण प्रत्यक्षातील वास्तू उभी राहात नाही
असे दिसताच
सत्तास्थान ठोकरून लावीत
तो आपल्या गर्दीच्या गर्तेत परतला होता.
थेट तथागतासारखा !
हे मात्र आमदारकी, खासदारकी
व उपसभापतीत्वावरच खूश होऊन
शेपट्या हलवीत सुटले.

कोट्यवधी दलित, अडाणी, लाचार प्रजा
बघ्यासारखी कधी थक्क होत्साती
तर कधी मौजेने ही राजकारणाच्या रिंगणातील
लाचार सर्कस व विदुषकी कोलांट उड्या
पाहात राहिली.
अशा वेळी या चित्त्याने
रिंगणाबाहेर झेप घेऊन
साऱ्यांना सळो की पळो केले.

भीमशक्तीने राजकारणाचा जुगार
खेळण्याची चटक लागलेल्या
आणि त्यापायी आपले स्वत्त्व
घालवून बसलेल्या
भोंगळ ' धर्मराजां 'चे नादान हात जाळण्यासाठी
तरुण सहदेवाला मागितलेला हा अग्नी आहे.
हिणकस वृत्तींचे शुद्धीकरण
हे या अग्नीचे इतिहासदत्त कार्य आहे.

चित्ते चुकले असतीलही
चुकणे हा गद्धेपंचविशीचा धर्मच होय
पण म्हातारे चुका करीत नाहीत असे नाही.
आणि म्हातारे जेव्हा चुकतात
तेव्हा त्याच्या चुका हिमालयाहून मोठ्या असतात.
आणि त्याचे परिणाम
देशाचे तुकडे पडण्यासारखे
अथवा हिमालयाचे माथे झुकण्यासारखे
भयानक असतात.

ताज्या दमाच्या या तथाकथित चुकीने मात्र
तुकडे जोडले गेले आहेत
आणि बनावटपणे विभागलेली
दलितांची संघर्षशक्ती
एकसंध झाली आहे.
दलितांच्या नेत्यांची मधली पिढी
जी आपसात यथेच्छ भांडून
आता समंजस व शहाणी झाली आहे.
(असावी, असे मानण्यास जागा आहे)
तिने या नव्या पिढीलाही
समजून घेतले पाहिजे.
तिने चुका केल्या असतील
चुकीच्या मार्गदर्शनाखाली ती चालत असेल
चुकांच्या चक्रव्यूहात हे अभिमन्यू अडकले असतील
तरीही त्यांना सोडवण्याचे काम
या धुरंधरांचे आहे.

अरे, तरुणांना दलितांच्या विजयाचे
एक लढाऊ तत्त्वज्ञान देणाऱ्या
मार्क्सचे आकर्षण वाटणार नाही.
तर काय अभावाची उपासना शिकवणाऱ्या
महात्म्यांचे वाटेल ?

पण मार्क्स आणि महात्मे
यांच्या अल्याड पल्याडही
एक अनादी, अनंत आणि अजस्र जीवन आहे.
पुढे नेणारी एक मधली वाटही आहे
आणि त्या वाटेवरून या पिढीला
पुढे नेण्याचे काम
या मधल्या पिढीचेच आहे.
त्या नव्या पिढीने त्यांच्याजवळ होते
ते नवचैतन्य तुम्हाला दिले !
त्याना तुम्ही दिशा द्या
फक्त शिव्या देऊ नका !

आणि या दलितांच्या नवनेतृत्त्वानेही
इतरांच्या व स्वतःच्याही चुकांपासून
धडा घेतला पाहिजे.
अन्यथा त्या काळचा चित्त्यांचे
जे झाले तेच या दलित चित्त्यांचे होईल.

ते केवळ या जातीच्या अथवा त्या धर्माच्या
विरोधातच लढे पुकारत राहिले
तर ती ऐतिहासिक चूक ठरेल.
जगात आज शोषक आणि शोषित या दोनच जाती
अस्तित्वात आहेत.
आणि जे शोषले जात आहे
त्या रक्ताचा वर्ण एकच आहे !
लढा हवा आहे भाकरीसाठी
दलितांचा माथा उंच, कणा ताठ
आणि जिद्द दुर्दम्य करण्यासाठी
तो कोणा जातीधर्माच्या विरोधात नव्हे
अथवा याला त्याला खतम करण्यासाठी नव्हे
तर स्वतःचे अस्तित्वच
बलदंड करण्यासाठी हवा आहे.
वैरासाठी वैर आणि विरोधासाठी विरोध
ही कमजोरीची निशाणी आहे
सामर्थ्य विरोध करीत नाही
ते साऱ्यांना सामावून घेऊ शकते.
आणि आपण आपले सामर्थ्य वाढवले
की प्रतिस्पर्ध्यांचे ते आपोआप कमी होते.
आणि मग विरोधात शब्द न काढताही
मनावर हुकूम हवे ते होऊन जाते.

बंडखोर, बहाद्दर चित्त्यांनो !
अखेर हा देश तुमचा आहे.
येथेच तुमची माती अथवा
मोती होणार आहे,
तुमची मक्का, मास्को व पेकिंग
येथेच आहे.
आणि येथे जे पेराल तेच
उगवणार आहे.
तुमच्या प्रखर चैतन्यबीजांना
प्रकाशाचीच फळे यायला हवीत !
आणि तुमची झेप
ब्लॅक पॅन्थरसारखी दैन्याच्या गर्तेतून
विनाशाच्या काळोखात नको.
तर प्रकाशाकडून प्रगतीकडे असायला हवी ! ☐ ☐

## दलित पँथर्सचा सांगली येथील

# पूजा स्टंट

दशरथ पारेकर, सहसंपादक दै. नवसंदेश

मुंबईत जाहीर सभातून हिंदु देवदेवतांना शिव्या मोजणाऱ्या दलित पँथर्सनी खळबळ उडवून दिली असतानाच त्या पेटत्या दंगलीत बर्फाचा खडा टाकावा त्याप्रमाणे सांगलीच्या दलित पँथर्सनी एक अनपेक्षित घोषणा करून अगदीच विसंगती निर्माण केली. ९ फेब्रुवारीच्या संकष्टी दिवशी सांगलीच्या श्री गणेश मंदिरात गाभाऱ्यात जाऊन दलित जोडप्यांकरवी 'श्री'ची पूजा करण्याचा निर्णय त्यांनी घोषित केला होता. हा निर्णय जाहीर झाला आणि शहरात एकच खळबळ उडाली.

त्याला कारणे दोन. एकतर हिंदु देवदेवतांना अश्लील शिव्या देणारे, त्यांचा अनादर करणारे म्हणून दलित पँथरच्या कार्यकर्त्यांचा लौकिक! त्याला पार्श्वभूमी मुंबईच्या सवर्णहिंदु दलित दंगलीची. आणि दुसरे म्हणजे श्री गणेश हे सांगलीकरांचे आराध्य दैवत! हे मंदिर सांगली संस्थानच्या अखत्यारीतले असून तो सर्वस्वी खाजगी ट्रस्ट आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात पुजाऱ्यांव्यतिरिक्त अन्य कोणाही व्यक्तीस जाण्यास मज्जाव आहे. ही रूढ-परंपरा अद्याप कोणीही मोडलेली नाही. त्यामुळेच पँथर्सची ही घोषणा म्हणजे एकप्रकारे बंडाचीच भाषा होती.

स्थानिक वृत्तपत्रात या बातम्या प्रसृत झाल्या आणि शहरातील वातावरण हळूहळू अधिकाधिक तापू लागले. सर्वत्र एकच संतप्त चर्चा सुरू झाली. वृत्तपत्रातून उलट सुलट प्रतिक्रीया व्यक्त होऊ लागल्या. तशातच शिवसेना व अन्य गणेशभक्त मंडळीत पँथर्संच्या या वेडाचारास विरोध करण्याचे घाटू लागले. शिवसेनेने तर तसे जाहीरच केले. श्रीगणेश मंदिराबाहेरच 'पँथर्सना प्रतिबंध करू!' असा चक्क बोर्ड लावला. आणि या संतप्त वातावरणातच ८ फेब्रुवारी उजाडला.

हा संकष्टीचा आदला दिवस! या दिवशी रात्री साडेआठ वाजता मारुती चौकात 'दलित पँथरने' आपली उद्याच्या 'पूजा' कार्यक्रमामागची भूमिका स्पष्ट करण्यासाठी जाहीर सभा आयोजित केली होती. ही सभाही होऊ न देण्याचा निर्धार काही व्यक्तींनी व गटांनी व्यक्त केला होता. त्यामुळे काहीतरी विशष घडणार अशा अशांत व संशयित वातावरणातच सभा सुरू झाली.

सभेत वक्ते चार! दलित पँथरचेच कार्यकर्ते. 'दलित पँथर' सांगलीत स्थापन झाली आहे हेही सांगलीकरांना या वादंगाच्या निमित्ताने प्रथमच कळले.

कडक पोलीस बंदोबस्तात ९ वाजता सुरू झालेल्या सभेत सुरुवातीस पँथर नंदू कांबळे याने प्रास्ताविक केले. भाषा अर्थातच कडक उघडी नागडी! त्याचे संपल्यानंतर दुसरा पँथर क्रांती धेंडे बोलू लागला आणि मागच्या वक्त्याने आपल्या वक्तृत्वाने वाढविलेले 'टेन्शन' त्याने अधिकच वाढविले.

'हिंदु-देवदेवतांना आम्ही यापूर्वीच ओढ्यानाल्यात फेकून दिले आहे. या देवांची पूजा आम्ही कदापी करणे शक्य नाही. पण धर्ममार्तंडानो, तुमची मने पाहण्यासाठी, तुमची प्रतिक्रिया अजमावण्यासाठी आम्ही हा 'स्टंट' केला. तुमच्या गणपतीसह तुम्ही आता (आम्हाला विरोध करायला जाऊन) उघडे पडला आहात. तुमचे पितळ व प्रतिगामीपणाही उघडा झाला आहे, पँथर्सच्या या खुल्लंखुल्ला (?) वक्तव्याने सभेत गडबड सुरू झाली. 'गणपती बाप्पा मोरयाऽ' च्या घोषणा सुरू झाल्या. सभा उधळली जाणार असे चित्र स्पष्ट दिसू लागले.

अशा या गोंधळातच 'युक्रांद'चा व्यंकाप्पा पत्की बोलावयास उभा राहिला. थोडी शांतता पसरली पण मुख्य विषय 'श्री गणेशपूजा' हा बाजूस ठेवून त्याने 'महागाई, भ्रष्टाचार' आदि विषयावर नेहमीचेच चाकोरीबद्ध भाषण सुरू केले. त्यामुळे लोक कंटाळले 'विषयाला धरून बोला' अशी अनेकांनी ओरड केली, पण तरीही व्यंकाप्पाने तसेच पुढे चालू ठेवले. त्यामुळे लोक अखेर चिडले आणि भाषण बंद करायची त्यांनी ओरड सुरू केली. गलका व गोंधळ अधिकच वाढला. लोक जागेवरून उठून उभे राहिले. दरम्यान या गोंधळाचा फायदा घेऊन दलित पँथर्सनी 'राजा ढाले झिंदाबाद' 'दलित पँथर झिंदाबाद' अशा घोषणा सुरू केल्या. 'गणपती बाप्पा मोरया'च्या प्रति घोषणाही चालू झाल्या. ही गडबड चालू असतानाच किरकोळ दगडफेक झाली. दोन-तीन विरोधी कार्यकर्त्यांनी या गोंधळाचा फायदा घेऊन सभेत घुसून व्यंकाप्पा पत्की व आणखी एका वक्त्यास मारहाणही केली. त्यामुळे पोलिसांनी पुढचा भीषण प्रकार टाळण्यासाठी हस्तक्षेप करून पँथर्सना सभा बंद करावयास लावली व त्यांना संरक्षण देऊन सभास्थानापासून दूर नेले. पोलिसांच्या सौम्य छडीमारामुळे सभा विसर्जित होऊन पांगापांग झाली.

दलित पँथर्सनी या सभेत घोषित करून दुसऱ्या दिवशीचा नियोजित पूजा कार्यक्रम रद्द केला. तशी पत्रकेही वाटली. पण या अपरिपक्व कार्यकर्त्यांना आपला मूर्खपणा उशिरा कळला आणि आपल्या अपुऱ्या शक्तीला जनताविरोधी बंड पेलवणार नाही हे उमजल्यामुळेच अखेर त्यांनी आम्हाला पूजा करावयाचीच नव्हती असा आयत्या वेळी कांगावा केला. पँथर्सना पूजा करावयाचीच नव्हती तर त्यांनी श्रीगणपती संस्थानचे चालकांशी पूजा करण्यास परवानगी मिळावी म्हणून वाटाघाटी का केल्या? पूजेस परवानगी मिळावी म्हणून स्थानिक वृत्तपत्रातून आपल्या मागण्यांचे समर्थन का केले? आणि श्रीगणपती मंदिर हे खाजगी नाही, तर त्याला आता सार्वजनिक स्वरूप कसे आले आहे हे पटवून देण्याचा अट्टाहास तरी का केला? जनतेच्या धार्मिक भावनांना धक्का लावण्याचा प्रयत्न केला तर त्याचे काय

परिणाम भोगावे लागतील याचे प्रत्यंतर पँथर्सना सांगली शहरात निर्माण झालेल्या तप्त वातावरणावरूनच आले आणि मग त्यांनी अखेर 'झाकली मूठ' या नावाखाली 'श्री'ची पूजा करण्याचा बेत रद्द केला. धर्मभावनांना आव्हान करून सामान्य संस्कृतिप्रिय जनतेविरुद्ध बंड करून त्यांना सामोरे जाणे हे तसे सोपे नाही हे पँथर्सना उशिरा का होईना पण कळून चुकले आणि शहाणपण सुचले!

पँथर्सनी पूजेचा कार्यक्रम रद्द केल्यामुळे शहरात होऊ घातलेला अनर्थ टळला. वातावरण निवळले. पण मुळात पँथर्सनी हा मूर्खपणाचा 'स्टंट' केलाच कशासाठी? सामान्यजनांच्या धर्मभावनांना धक्का देऊन निष्कारण वातावरण तप्त बनविले. दलित पँथर्सचा लढा हा सामाजिक आहे. वर्गसंघर्ष आहे. धर्मसंघर्ष नव्हे! मग अशा प्रकारच्या स्टंटमधून त्यांनी काय साधले? जनतेची सहानुभूती गमावण्याबरोबरच त्यांचा रोष पत्करण्याची त्यांच्यावर पाळी आली. चार सहा नवख्या पँथर कार्यकर्त्यांनी लोकांच्या धर्मभावनांना आव्हान करून त्या द्वारे शहरात खळबळ उडवून देणे, केवळ व्यासपीठ मिळते या स्वार्थापोटी 'युक्रांद'सारख्या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी दलित पँथरच्या मूर्खपणाचे समर्थन करण्याच्या निमित्ताने लोकांच्या माथी एक 'ज्वलंत'(?) भाषण ठोकणे आणि तरुणांच्या पोरकटपणाद्वारे असे रान उठवून, मिळालेल्या स्फोटक परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी हा खेळ करावयास लावून राजकीय संधिसाधूंनी टपून बसणे हे सारेच निखालस अयोग्य आहे.

केवळ गाजावाजाच हवा होता तर पँथर्सना अन्य कार्यक्रमाद्वारे तो करता आला असता! भले तुम्ही देव ना पूजा बापुडे, पण ज्या मंदिरात ठराविक मर्यादेपर्यंत जाऊन दर्शन घेण्याचा सर्वसामान्याप्रमाणेच तुम्हालाही जर समान अधिकार आहे, तर अशा एका खाजगी मंदिरात बेकायदेशीर घुसून पूजा करण्याचा तुमचा प्रयत्न, हे सारेच हास्यास्पद आहे. लोकांच्या भावना भडकावण्यास तुमचा हा निर्णय कारणीभूत ठरला होता. त्यांना चिथावणी देण्याचे कुकर्म अन्य कुणी संधिसाधूंनी केले असते तर? संतप्त जमावाने आपल्या शक्तीचे प्रदर्शन कोणत्या मार्गाने केले असते, ते काय सांगायला हवे? पुन्हा वर दलितांवर अन्याय झाला म्हणून मारामारीच्या निषेधाची ओरड करायला हे मोकळे!

दलित मित्रांनो! प्रस्थापितांविरुद्ध बंड करायची भाषा ठीक आहे, पण हा मार्ग खचितच नव्हे! असले मूर्खपणाचे 'स्टंट' करून निष्फळ मार्ग अवलंबणे व संयमशीलता सोडून जीव घेणे, धोके पत्करणे सर्वस्वी अयोग्य ठरेल. त्यामुळे सामाजिक असंतोषाऐवजी दलितांविषयी गैरसमजच अधिक वाढतील. अन्य काहीही निष्पन्न होणार नाही. सांगली पूजा प्रकरणाने हे सिद्ध झाले आहे. □ □


## राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रतापगड आणि शिवदर्शन | ब. मो. पुरंदरे<br>श्री. ग. माजगावकर | १–०० |
| २. | पुरंदऱ्यांची दौलत | ब. मो. पुरंदरे | ३–५० |
| ३. | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३–५० |
| ४. | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३–५० |
| ५. | पुरंदऱ्यांची नौबत | ब. मो. पुरंदरे | ४–०० |
| ६. | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४–०० |
| ७. | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७–०० |
| ८. | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २–०० |
| ९. | सहा साहसे | दा. सी. देसाई | २–०० |
| १०. | पूर्णिया | अनिल अवचट | ६–०० |
| ११. | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७–०० |
| १२. | सांगत्ये ऐका | हंसा वाडकर | ८–०० |
| १३. | संध्याकाळ | गजानन जागीरदार | १०–०० |
| १४. | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १०–०० |
| १५. | रातराणी | विजय तेंडुलकर | १२–०० |
| १६. | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४–०० |
| १७. | अग्निपुत्र | वसंत पोतदार | १४–०० |
| १८. | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५–०० |
| १९. | व्होल्गा जेव्हा लाल होते | वि. स. वाळिंबे | १८–०० |

**आगामी प्रकाशने**

| | | |
|---|---|---|
| २०. | शतपावली | रवींद्र पिंगे |
| २१. | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर |
| २२. | मी नेताजींना बघितलंय | अशोक शहाणे |
| २३. | टॉलस्टॉय–एक माणूस | सौ सुमती देवस्थळे |

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३० : ५७३५९

# शिष्यवृत्ती-वाढ आंदोलन

अनंत भालेराव

गेल्या पंधरवडयात प्रामुख्याने औरंगाबाद शहरात व सर्वसाधारणपणे मराठवाडयाच्या इतर शहरात युक्रांद, दलित युवक आघाडी रिपब्लिकन स्टूडंटस फेडरेशन आदि चार विद्यार्थी संघटनांच्या नेतृत्वाखाली दलित व मागास विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ व्हावी यासाठी जे आंदोलन झाले त्याची सांगता यशस्वीरीतीने झाली. सुदैवाने महाराष्ट्र शासनाने या प्रश्नाची तातडी ओळखून चांगला दृष्टिकोन बाळगला. अंतरिम वाढ म्हणून संपूर्ण महाराष्ट्रासाठी मुख्यमंत्री निधीतून २५ लाख रुपये मंजूर केले. आता केंद्राने ही कायम वाढ देण्याचे मान्य केले आहे. अनेक वर्षे भिजत पडलेला प्रश्न एकदाचा निकाली निघाला हा झाला या आंदोलनाचा तात्कालिक फायदा. परंतु याचे पलीकडे जाऊन बघितले तर या आंदोलनाची सामाजिक क्षेत्रातील कामगिरी कितीतरी मोठी, प्रमाणात आणि गुणात व्यापक अशी असल्याचे निदर्शनास येऊ शकेल.

या आंदोलनाला औरंगाबादेत आणि मराठवाडयात एक विशिष्ट पार्श्वभूमी लाभली होती. आंदोलन सुरू होण्याच्या काही काळ आधी मराठवाडा विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी एक आंदोलन छेडले होते. अनेक मागण्यांपैकी मागील दुष्काळ लक्षात घेऊन परीक्षा फी माफ करण्याची मागणीच प्रभावी ठरली. या आंदोलनात मराठवाडा-विद्यापीठ विद्यार्थी संघ (मुसा MUSA) या संघटनेनेच पुढाकार घेतला होता. यावेळी प्रामुख्याने मराठा व सवर्ण जातीची मुले पुढे होती. त्यांनी आंदोलनाचा भाग म्हणून कुलगुरुंना घेराव केला तेव्हा दलित व सवर्ण मुलांत मारामारी झाली. या घटनेचा प्रिणाम सर्व विद्यार्थी वर्गावर व त्यामुळे नागरिकांवर झाला. सवर्ण विरुद्ध दलित असा जातीय तणाव वाढला. वातावरण यात्र तणावांनी वेढलेले होते. एकमेकांशी आपल्याला कर्तव्य नाही, इथपर्यंत भावना जखमी झाल्या होत्या.

या पार्श्वभूमीवर शिष्यवृत्ती वाढीचे आंदोलन सुरू झाले. त्याच्या आधीच मुंबईला पोट निवडणुकीच्या निमित्ताने बी. डी. डी. चाळीत भलतेच रामायण घडून गेले होते. उपरोक्त पार्श्वभूमीची तीव्रता या घटनांनी अधिकच वाढविली होती. आंदोलन एकाकी पडेल व शेवटी फजिती होऊन सामाजिक दृष्टया आपले पाऊल उलटया दिशांनी खूप मागे खेचले जाईल अशी अनेकांना भीती होती. माझ्या ही मनात ही होती हे कबूल केले पाहिजे. परंतु युक्रांदचे नेते कुमार सप्तर्षी येथे येऊन ठाण मांडून बसले व त्यांनी एकाएकीच (युक्रांद व इतर संघटना खेरीज करून अन्य नागरिकांच्या दृष्टीने) आंदोलनाला प्रारंभ केला. दररोज कायदेभंग, अटक आणि रात्री मुक्त विद्यापीठ असा प्रकार सुरू झाला. पहिल्याच सभेत कुमार सप्तर्षींना बोलू न देण्याचा प्रयत्न झाला. ते बोलू लागले तर मध्ये व्यत्यय आणले गेले. त्यांच्यावर व इतरावर टीकांच्या तोफा डागण्यात आल्या. परंतु कुमार सप्तर्षींनी मोठया शर्थीने, सामंजस्याने व कौशल्याने सामना केला. मुलांची मने त्यांनी जिंकून घेतली. आरंभी अत्यंत कडवेपणाने सवर्णांवर सरसकट तुटून पडणारी दलित वर्गातील मुले आंदोलनात दाखल झाली. त्यांच्या वृत्ती व दृष्टी निवळल्या. इतरांशी आपण आपल्या न्याय्य प्रश्नासाठी सख्य केले पाहिजे व न्यायासाठी प्रामाणिकपणे झगडणारांची फळी उत्तरोत्तर व्यापक व मजबूत बनविली पाहिजे, हा विवेक त्यांना पटला. अतिरेकी दलितवादी, फटकून वागण्याची भूमिका घेणाऱ्या व स्वतःला विनाकारणच दलित पँथरचे अनुयायी म्हणवून घेणाऱ्या तथाकथित नेत्यांना दलित विद्यार्थ्यांनीच विरोध केला. या अतिरेक्यांना अनुयायीच उरले नाहीत. शेवटी शेवटी त्यांनी आपली सर्व शक्ती (?) हे आंदोलन खलास व्हावे, फसावे, त्यात फूट पडावी व ते त्वरित थांबावे म्हणून खर्च केली. परंतु आंदोलन पुरून उरले. जातीचे नाव घेतले की हुकमी अनुयायी उभे करण्याची जुनी पद्धत या आंदोलनाने तूर्त तरी निष्प्रभावी ठरविली आहे.

दुसरी मोठी कामगिरी आहे ती सवर्ण धर्मामधली. दलितांचे प्रश्न दलितांनी बघावेत. त्यांनीच सोडवून घ्यावेत. आपला त्याच्याशी काही संबंध नाही अशी विक्षिप्त उदासीनता सवर्णात आढळते. याही पलीकडे जाऊन काही लोक दलितांवर आक्रमणे करीत असतात. दलितांचे लाड अति झाले, ते सरकारचे जावई बनले. अभ्यास करायला नको, फुकट मजा करायला हवी असे अनुदार उद्‌गार दलितांच्या संदर्भात नेहमीच काढले जातात. या प्रकारचे लोक सवर्णांतून नाहीसे झाले नसले तरी उपरोक्त आंदोलनामुळे त्यांचीही सद्दी संपली. दलित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा प्रश्न आपणा सर्वांचा आहे. त्यांची मागणी रास्त आहे अशी नवी जाणीव जुन्या उदासीनतेला व तिरस्काराला भेदून गेली. दुर्मिळ सहसंवेदना प्रकट झाली. अनेक सवर्ण विद्यार्थ्यांनी दलितांच्या खांद्याला खांदा लावून आंदोलनात भाग घेतला. एक नवेच वातावरण तयार झाले. शोषित आणि दलित एकटे नाहीत. त्यांच्यासाठी व त्यांच्या समवेत भांडणारे इतरही आहेत असा दिलासा या चळवळीने निर्माण केला.

हे नवे वातावरण केवळ विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित राहिले नाही. औरंगाबादच्या सर्व विचाराच्या नागरिकांनीही या आंदोलनाला फार चांगली साथ केली. अडचण या बाबतीत अशी होती की नागरिकांपैकी कोणी आपण होऊन या आंदोलनाच्या दिशेने गेले असते तर ते नेतृत्वाच्या, ढोंगबाजीच्या, राजकीय अपेक्षांनी आले आहेत अशी टीका दलितांकडून झाली असती. ही अडचण कुमार सप्तर्षी यांच्या समंजस भूमिकेने दूर केली. दलित व इतर विद्यार्थीच नागरिकांकडे आले व आता त्यांनी या प्रश्नात लक्ष घालण्याची गरज आहे, असे आग्रहाने सांगू लागले. यामुळे दुरावा नष्ट झाला. नागरिकांच्या प्रयत्नामुळे सर्व शहर एक दिवस बंद राहिले. सर्व पक्षीय शिष्टमंडळ मुंबईस गेले. जरूर पडली तर हा प्रश्न दिल्लीपर्यंत नेण्याची तयारी झाली आणि एवढे सर्व करूनही भागले नाही तर प्रत्यक्ष मैदानात उतरण्याचीही इच्छा अनेकांनी व्यक्त केली. प्रमाणाने छोटा असेल. परंतु हा बदल गुणात्मक दृष्टया फार मोठा. शतखंड झालेल्या आपल्या समाजात फारा दिवसानंतर आपण एकमेकाचे कोणी लागतो हा ऋणानुबंध उजळला.

या आंदोलनामुळे विविध थरात अनेक शक्ती खुल्या झाल्या आहेत. त्या व्यापक बुद्धीने व उदार वृत्तीने एकवटणे व जोपासणे आवश्यक आहे. रूढ राजकीय कार्यपद्धतीतून या शक्तींचा वापर झाला तर ज्या शक्तीवर या आंदोलनाने प्रारंभी विजय मिळविला त्या पराभूत शक्तीच परत थैमान घालण्यास मोकळया होतील. या शक्तींची म्हणूनच निर्मळपणे जोपासना झाली पाहिजे.

या आंदोलनात संख्येने दलित विद्यार्थीच अधिक होते हे खरे आहे. विद्यापीठ प्रकरणी घडलेल्या घटनेचा मी वर उल्लेख केला आहे. सवर्णातली ही मुले आंदोलनाला शाब्दिक पाठिंबा देऊन काठावर राहिली. एक तर परीक्षा जवळ आलेल्या व दुसरे म्हणजे मने विद्ध झालेली, ही मुले मराठा असतील अगर इतर जातीतील सवर्णांची असतील परंतु आपलीच आहेत. त्यांची मने बदलण्याचा व त्यांना आंदोलनात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न कमी पडला इतःपर तरी दलितांच्या सर्व जातीतील शोषितांच्या लढयात याही मुलांना सक्रिय रीतीने सामावून घेण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. □

# आयुर्वेद कॉलेज संप : सायलेन्स झोन

डॉ. अरुण लिमये

जुन्या कहाण्यामध्ये राजा 'चक्रमादित्याचे' चमत्कार असतात. आपल्या राज्याचे आरोग्य धोरण इतके धरसोडीचे आहे की कहाणीची आठवण यावी. आपल्या राज्याचा कायदा ऐका–'जर कोणाला औषधाचे दुकान उघडावयाचे असेल तर तो 'फार्मसीचा पदवीधर' पाहिजे. 'डॉक्टर' व्हायला काही शिकले नाही तरी चालेल. कोणी पिढीजात बाप अगर आज्याकडून ऋग्णसेवा शिकला तर त्याला आर. एम. पी. डॉक्टर म्हणणार. त्याला सुया टोचायला, खिसे भरायला, माणसे मारायला सरकारी परवानगी आहे. (आर. एम. पी. चा खरा लाँगफॉर्म 'रोगी मारण्यात पटाईत')

चक्रमादित्याहून त्याचे मंत्रीगण भारी. एक बाई आरोग्य मंत्री झाल्या. त्यांना होमिओपॅथीने गुण आला. झाले. राज्यात ग्वाही फिरली. 'होमिओपॅथी हीच खरी पॅथी' उद्यापासून याला सरकारी उत्तेजन. दुसरा मंत्री आला. त्याला गरिबांचा भारी कळवळा. त्याला लागला शोध. णायुर्वेद सर्वात स्वस्त 'पॅथी' आहे. दुसरे दिवसापासून त्याने आयुर्वेद लोकांच्या माथी मारला. खास करून ग्रामीण गरीब जनतेसाठी. शहरात मात्र अत्याधुनिक ऋग्णालये. तिसऱ्या मंत्र्याची नजर फॉरीनकडे. त्याला सगळे इंग्लंड-अमेरिकेसारखे हवे. राज्यात कॉलऱ्याने माणसे पटापट मरताहेत. अंगारेधुपारे–भगताची खेड्यातून चलती आहे. याला काळजी हृदयाच्या शस्त्रक्रिया खेडेगावी कशा होतील याची. वाटेल तितका पैसा लागला तरी चालेल पण इकडे सर्व 'पॉश' झाले पाहिजे. मंत्री बदलला की राज्याचे धोरण बदलते. आज गर्भपात घोर गुन्हा तर उद्या कायदेशीर. काल फॅमिली प्लॅनिंग म्हणजे 'भ्रूणहत्येचे पातक' तर आज मारुती देवळावरसुद्धा 'लाल त्रिकोण.' सामान्य जनता मुकी बिचारी कुणी हाका अशी. तज्ज्ञ मंडळी आपापल्या पॅथीचे कडवे पुरस्कर्ते. त्यांच्या साठमारीत वैद्यकीय विद्यार्थ्यांची चेंगराचेंगरी सुरू आहे. महाराष्ट्रात गेल्या महिनाभर रेंगाळत चाललेल्या आयुर्वेद विद्यार्थी संपामुळे या साऱ्याच प्रश्नांना पुनश्च तोंड फुटले आहे.

चालू संपाला खरी पार्श्वभूमी जुन्या संपाची आहे. १९७० साली अनेक दिवस चालून शेवटी संप फसला. अपमानास्पद अटीवर तडजोड झाली. जुना कोर्स बंद झाला. मिश्र वैद्यक संपले. व शुद्ध आयुर्वेदाचे राज्य सुरू झाले. ॲलोपॅथीवाल्यांना मनापासून बरे वाटले. (तेवढीच काँपिटिशन कमी.) तर शुद्ध आयुर्वेदाच्या लॉबीला हर्षवायु झाला. या लॉबीचे प्रणेते पंडित शिवशर्मा हे मुंबईचे प्रख्यात वैद्य. यांचे पार्लमेंटात वजन. त्यांनी पार्लमेंटकडून कायदा पास करवून घेतला. १९७० साली 'सेंट्रल कौन्सिल फॉर इंडियन मेडिसीन'ची कायदेशीर स्थापना झाली. आयुर्वेद, सिद्ध (दक्षिणेकडील आयुर्वेद), व युनानी अशा तीन उपशाखा ठरल्या. या कौन्सीलचे अध्यक्ष अर्थातच वैद्य पंडित शिवशर्मा झाले. देशभरच्या विद्यापीठांतून लोकनियुक्त प्रतिनिधी व इतर तज्ज्ञ निवडण्याची लोकशाही निवडणूक यंत्रणा ठरली. परंतु प्रत्यक्षात मात्र सध्याचे सर्व कौन्सील हे सरकार नियुक्त आहे व त्याची मुदत ५ वर्षाची. भारताच्या लोकशाही तत्त्वांचा विजय असो!

या प्रश्नाचा साकल्याने विचार करण्यासाठी, झकेरिया, व्यास, पवार, उडपा, मुदलियार, दवे अशा अनेक समित्या सरकारने नेमल्या. सर्वांनी ॲलोपॅथी व आयुर्वेद दोन्ही शास्त्रांचा अभ्यास करणाऱ्या शिक्षणपद्धतीचा पुरस्कार केला. परंतु पुनरुज्जीवनवादी, भारतीय परंपरेच्या व शुद्ध आयुर्वेदाच्या पुरस्कर्त्यांनी तो हाणून पाडला. या कौन्सीलने सर्व देशासाठी एक 'आयुर्वेदाचार्य' हा कोर्स तयार केला. व शिफारस केली की या कोर्ससाठी म्हणून एफ. वाय. बी. एस्सी. ला (जुने इंटर सायन्स) नवीनच ग्रुप असावा. त्यात आयुर्वेद इतिहास, संस्कृत, आयुर्वेदाचे तत्त्वज्ञान इ. विषय शिकवावेत. 'ए' ग्रुप नंतर इंजिनिअरींग. 'बी' ग्रुपनंतर ॲलोपॅथीक मेडिसीन व या नव्या 'सी' ग्रुप नंतर आयुर्वेद कोर्स असा क्रम असावा. परंतु भारतातील विद्यापीठे ही स्वायत्त आहेत. फक्त यु. पी. च्या विद्यापीठांनी हे स्वीकारले. इतरांनी स्वीकारले नाही. गुजराथेत १९६५ साली सुरू झालेला व विद्यार्थी चळवळीनंतर बदलावा लागलेला जुनाच कोर्स B. A. S. M. नावाखाली महाराष्ट्राने सुरू केला होता. कौन्सीलचे स्थापनेनंतर ती बदलून महाराष्ट्रात बी. ए. एम. एस असा नवा कौन्सीलप्रणित कोर्स सुरू झाला.

B. A. M. & S. (बॅचलर ऑफ आयुर्वेदीक मेडिसीन अँन्ड सर्जरी) ही जुनी मिश्रवैकाची पदवी होती. त्यात व या नव्या B. A. M. S. पदवीत मधला & सोडता सर्वच साम्य आहे. हे साम्य जाणीवपूर्वक विद्यार्थ्यांना व लोकांना गंडविण्यासाठी तर नव्हे ना? नवीन B. A. M. S. चा लाँगफॉर्म नेमका काय? हे अजूनही न उकललेले कोडे आहे. कोणी म्हणतात–हे बॅचलर ऑफ आयुर्वेदिक सिस्टिम आहे. सर्जरी नव्हे. कौन्सीलचे अधिकृत उत्तर फारच विनोदी आहे, B. A. M. S. हा शॉर्टफॉर्म आधी ठरला. त्याचा लाँगफॉर्म अद्याप ठरला नाही. या ढोंगीपणाला हसावे की संतापावे? कोर्स एकंदर ७ वर्षांचा आहे. दरवर्षी परीक्षा घेतली जाणार. टायपिंग पन्नास टक्क्यांना. A. T K. T. नाही. संस्कृतसारख्या नॉनमेडिकल विषयातसुद्धा पन्नास टक्केच पासिंग. संस्कृतबाबत पुनरुज्जीवनवाद्यांची दांभिकता इतकी उघड आहे की सर्व विषयांच्या प्रश्नपत्रिका 'संस्कृतमध्येच' छापतात. उत्तरे मात्र प्रादेशीक भाषातून लिहावयाची. ही जशी काही सवलत. सिलॅबस हे इंग्रजी व संस्कृतमधून छापलेले. सिलॅबसच्या पृष्ठ क्र. ४० वर इंग्रजी Part २ चे भाषांतर सरळ 'पार्ट टू' असे करून पुढे मात्र 'अधोलिखितानाम् वर्गाणाम् लक्षणम्... सूची च इ.!' असे छापले आहे. यावरून एकंदर स्वरू-

पाचे विनोदीपण लक्षात यावे. विषयात स्वास्थ्यवृत्त, शरीररचना विज्ञान, शरीरक्रियाविज्ञान, द्रव्यगुणविज्ञान, भैशज्यकल्पना, चरक-संहिता इ. इ. अनंत विषयांची यादी व त्यावरील ग्रंथांची यादी दिली आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे यापैकी एकही टेक्स्टबुक अद्याप उपलब्ध नाही. या ग्रंथांचे मराठीकरण करणे व स्वतःच नवीन पुस्तके मराठीतून लिहिणे ही लाभदायक कल्पना अनेक हितसंबंधीयांच्या डोक्यात घुसली आहे. त्यांनी अशा ग्रंथलेखनाचे मौलिक कार्य आपली नोकरी, खुर्ची व प्रॅक्टीस सर्व सांभाळून सुरूही केल्याचे समजते. हे ग्रंथ लिहून होण्यास, त्यानंतर त्यांना मान्यता मिळण्यास व नंतर विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्यास अजून किती महिने अगर वर्षे लागतील ? हे कोण व कसे बरे सांगू शकेल ?

महाराष्ट्रात एकंदर आयुर्वेद कॉलेजेसच्या बाबतीत 'आनंदी आनंद गडे' अशी स्थिती आहे. प्रत्येक युनिव्हर्सिटीची निराळी तऱ्हा. नागपूर विद्यापीठाने सेंट्रल कौन्सीलला धाब्यावर बसवून युनिव्हर्सिटी लेव्हलवरच प्रश्न सोडवायचे ठरविलेले दिसते. अनधिकृतरित्या ॲलोपथी सर्रास कॉलेजमध्ये शिकविली जाते. ए. टी. के. टी.चा. नियमही तेथे आहे. पेपर्स संस्कृतमध्ये छापण्याचा दुराग्रह आहेच. परंतु त्याच्यासोबत मराठीतले भाषांतरही मिळते. जुना कोर्स बंद झाला त्यांना नवीन कोर्स देताना नागपूरला वरच्या वर्गात घातले तर पुण्याला खालच्याच वर्गात ठेवले. खुद्द नागपूर, अमरावती, मोझरी, अकोला, यवतमाळ अशी विदर्भाची कॉलेजेस. बऱ्याचशा ठिकाणी पेशंटला विद्यार्थ्यानेच पकडून आणावे लागते. त्याच्या केस-पेपरचे पैसेही त्यानेच भरावयाचे. अभ्यास न करता फुकटात 'डॉक्टरची डिग्री' मिळते. व पुढे भरपूर पैसे मिळण्याची सोय होते. या कारणास्तव विद्यार्थी मुकाटयाने सारे सहन करतात. अशी एकंदर तऱ्हा आहे. मराठवाड्यातील नांदेड व शिवाजी विद्यापीठ कक्षेतील सोलापूर, सातारा या महाविद्यालयांची ख्याती तशीच. मुंबईत पोद्दार, सायन, पुनर्वसू अशी ३ कॉलेजेस आहेत. मुंबईच्या लोटस ट्रस्टने चालविलल्या हॉस्पिटलमध्ये नवीन पदवीत 'शुद्ध आयुर्वेद' हा शब्द नाही म्हणून ती पदवी नाकारली. तीन-चार लाखांच्या देणगीचा प्रश्न असल्याने कॉलेजनेही 'बी. एस्. ए. एम्.' हे जुनेच नाव मुकर केले.

पुणे विद्यापीठात पुण्याची दोन, नगर, नाशिक व धुळे जिल्ह्यातील बोरडी अशी एकंदर सहा कॉलेजेस आहेत. एकूण विद्यार्थी संख्या १५०० चे जवळपास. पुण्यातील अष्टांग आयुर्वेद कॉलेजची विद्यार्थी संख्या तीन. विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या शैक्षणिक व इतर सवलतींची सांद्यंत माहिती देण्यापेक्षा जिज्ञासूंनी या कॉलेजला भेट दिल्यास रहस्य-कथेतील रहस्य नाट्यमय रितीने प्रकट होईल. पुण्याचे टिळक आयुर्वेद कॉलेज हे बऱ्यापैकी स्टँडर्ड म्हणून मानले गेलेले कॉलेज आहे. टेक्स्ट बुक्स कुठेच उपलब्ध नसल्याने पुण्यातही त्याचा प्रश्न नाहीच. 'कुमार संभवम्' हे कालिदासाचे पुस्तक लावलेले आहे पण ते बाजारात मिळत नाही. एवम्च अभ्यास म्हणजे सजीव निर्जिवा-तील फरक सांगणे इत्यादी. बॉटनी, रसशास्त्र व पदार्थविज्ञान यांना लॅबोरेटरी आवश्यक खरी. परंतु संपानंतर वीस दिवसांनी लॅबोरेटरीत लाकडी बाके वगैरे 'इक्विपमेंट' हळू हळू येऊ लागली आहेत. प्रयोगशाळा नाही तेव्हा गेले आठ महिने प्रयोग बंदच, बॉटनीच्या प्रयोगशाळेतील साधनसामुग्री म्हणजे एनॅमल ट्रेमध्ये ठेवलेला झाड-झाडोरा. विद्यार्थ्यांना अद्याप एकही जर्नल मिळालेले नाही. पदार्थ विज्ञान म्हणजे नेहमीचे फिजिक्स नव्हे. हे आयुर्वेदामागील तत्त्वज्ञान. परंतु रात्री प्रोफेसरानी संशोधन करावे व दिवसा शिकवावे असा एकंदर खाक्या.

या साऱ्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी आंदोलन ना घडते तरच नवल होते. पहिली ठिणगी नगरला पडली. सय्यद काझी व इतर विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र आयुर्वेद विद्यार्थी परिषद स्थापन केली. निर-निराळ्या कॉलेजेसचे प्रतिनिधींची संयुक्त बैठक झाली. मागण्या न्याय्य व सरळ आहेत. मुख्य मागणी आयुर्वेदाला ॲलोपॅथी म्हणजेच मॉडर्न मेडिसिनची जोड मिळावी. इतर मागण्या किरकोळ. वास्तविक नॉनमेडिकल विषयांना असलेले पासिंगचे प्रमाण कमी करणे. संस्कृत-मधून प्रश्नपत्रिका पुरविण्याऐवजी मराठीतून देणे, ए. टी. के. टी. काही दुय्यम महत्त्वाच्या विषयांना ठेवणे, दरवर्षी परीक्षेऐवजी ॲलोपॅथिकसारखे १॥ वर्षांनी परीक्षा घेणे. एकंदर अभ्यासक्रमातील ६ महिने कमी करणे. या इतर अनेक मागण्यांसाठी आंदोलनाची गरज नाही. परंतु चळवळीशिवाय कसल्याच प्रश्नात दखल न घेण्याची शासनाची प्रवृत्ती सर्वश्रुतच आहे.

लाक्षणीक संप, बेमुदत संप, उपोषण, अशा टप्याटप्याने चळवळ पुढे चालली आहे. कौन्सील मेंबर्स, प्राचार्य व विद्यापीठ कुलगुरुंना घेराव झाले. झकेरियांकडे शिष्टमंडळ गेले. करणसिंगांशीही गाठभेट झाली. पण यश पदरी पडत नाही. कसे पडणार? लढा व्यापक न करता ज्या भाबडेपणे अननुभवी नेतृत्त्वाने संघर्ष (?) चालविला आहे, त्यातून शेवटी हेच अपेक्षित आहे. पुण्यात प्राचार्यांकडून पालकांना समजुतीची पत्रे गेली. विद्यार्थ्यांना 'आयुर्वेदाच्या विरोधी कारवाया सहन केल्या जाणार नाहीत.' असा सज्जड दमही भरला गेला. तरी विद्यार्थी दबले नाहीत ! बेमुदत संप पुढे चालू.

प्रस्थापितांची बाजू ऐकल्याशिवाय संपूर्ण सत्याचे आकलन होणे कठीण म्हणून प्राचार्यांना पुण्यात भेटलो. उपप्राचार्य वैयक्तीक परिचित व सुहृद. ते स्वत: B. A. M. & S. च्या संपातील क्रिया-शील सैनिक होते. त्यावेळी तो कोर्स कसा उत्कृष्ट यावर त्यांनी लेखही लिहिला होता. त्यानंतर आलेला B. S. M. A. हा कोर्स कसा सर्वोत्कृष्ट यावरही त्यांनी लिहिलेले. सध्या आयुर्वेदाची पदव्यु-त्तर डिग्री घेऊन, गाईडशिवाय पुणे विद्यापीठात, आयुर्वेदात डॉक्टरेट करणारे डॉक्टर्स त्यांना भेटावयास गेले त्यावेळी त्यांनी माझेसमोर त्यांचा लेखच टाकला. सध्याचा कोर्स कसा छान आहे यावरचा. त्या लेखाच्या आधारे पुढील चर्चा झाली.

त्यांचे दृष्टीने चळवळीची कारणमीमांसा सरळ आहे. कॉलेजच्या मुलांना पुढे आपल्याला ड्रग ॲक्टच्या तरतुदींमुळे इंजेक्शने देऊ देणार नाहीत अशी साधार भीती वाटते. मुले सुखवस्तू घरातून आलेली आहेत. त्यांना आयुर्वेदांत बिलकूल इंटरेस्ट नाही. म्हणून गुंडगिरी करतात. (सर्व मुलांनी प्रवेश घेताना 'आयुर्वेदाची आवड आहे म्हणून कोर्स घेतला' असे लिहून दिले असल्याचा कायदेशीर व तांत्रिक मुद्दा त्यांनी चर्चेत उपस्थित केला ते वेगळे.) सरकारने मान्य केलेल्या मिश्रवैद्यक या शब्दाला यांचा प्रामाणिक विरोध आहे.

पृष्ठ २६ वर

# सोलकढी



## □ नाव मृणाल, करणी कराल

‘ बाबी ’ फेम डिंपल ज्यांना माहित नाही असे मुंबईकर क्वचित आढळतील; पण मृणालफेम गोरे ज्यांना माहित नाहीत, असे मुंबईकर आढळणे मुश्किल आहे. या बाईंनी अलिकडच्या काळात, मुंबईत बऱ्यापैकी धमाल उडवून दिली आहे. विधानसभेत, बिचाऱ्या सत्ताधारी काँग्रेसपक्षाला त्या उगाचच अडचणीत टाकतात. विरोधी आमदाराने सत्ताधारी पक्षाला चवीपुरता विरोध करावा. सत्ताधारी पक्षाचे मन मोडू नये, साधनशुचिताविरोधाची कडक आचारसंहिता निकराने सांभाळावी, बोलण्या-वागण्यात तळ्यात-मळ्यात करीत राहावे, एवढे साधेदेखील ज्ञान या धसमुसळ्या बाईला असू नये, याचा आम्हाला आश्चर्ययुक्त खेद वाटतो. लज्जा, संकोच, विनय, आर्जवीपणा, सहिष्णुता, पुरुषदास्य या भारतीय नारीच्या परंपरापूत आदर्श गुणांशी मृणाल गोरे यांचा परिचय दिसत नाही. त्या लाजत नाहीत; काही गोष्टी जाहीर करताना संकोचत नाहीत; त्यांच्या वागण्यात विनय दिसत नाही; सत्तेपुढेदेखील त्या आर्जव दाखवत नाहीत. बिकट परिस्थितीत जमवून घेत झाकापाक करायची सहिष्णुता त्यांच्या ठिकाणी आढळत नाही, हातातल्या बांगड्या प्रसंगी पुरुषांच्या हातात चढवायला त्या उरत नाहीत. मला तर वाटते, विरोध करण्यात या बाईला काही विकृत समाधान मिळत असले पाहिजे, ‘ नाव मृणाल, करणी कराल ’ किंवा ‘ नाव गोरे, करणे काळे ’ असे त्यांच्याबद्दल आम्ही म्हणतो ते उगाच नव्हे.

बरे केवळ विधानसभेतच त्यांची ताईगिरी चालते असे नव्हे. विधानसभेबाहेरसुद्धा, जनजागरणाच्या सोज्वळ नावाखाली, सत्ताधारी पक्षाच्या कुरापती त्या सारख्या काढत असतात. योगायोगाने त्यांना भगिनीवर्गाचा अडाणी पाठिंबा फार मोठ्या प्रमाणावर मिळतो आहे. त्यामुळे अलीकडे त्या फारच ऐटीत असतात, असा मला संशय आहे. अशा ऐटीत त्यांनी राहू नये. कारण ऐटीची फैटी कधी होईल हे सांगता येत नाही. शिवाय प्रतिभाताई पाटील, शालिनीताई पाटील, वत्सलाताई नाईक, लीलाताई मर्चंट, कमलाताई रामन, विमलताई रांगणेकर, निर्मलाताई ठोकळ, ताराबाई वर्तक इत्यादी असंख्य काँग्रेसी तायांच्या बिनदिखाऊ, विधायक, मौलिक कार्याची ओळख जनतेला जसजशी पटत जाईल तसतशी ती अमर जनता मृणालताईंचे लोकशाहीविरोधी नेतृत्व झुगारून देईल, हे अटळ राजकीय भवितव्य मला स्पष्ट दिसते आहे. कारण या काँग्रेसी ताया कमरेला पदर बांधून महाराष्ट्र राज्याचा घरसंसार चालवतात, तर मृणालताई गळ्याला मफलर बांधून फक्त तोंड चालवतात. त्यांचा आवाज बसलेलाच असतो, राजकारणसुद्धा लौकरच बसेल.

एरवी खरे म्हणजे मृणाल गोरे यांच्याबद्दल आम्ही इतके कधीही लिहिले नसते. पण परवा विधानसभेत जे घडले त्याच्या अनुरोधाने मृणालताईंबद्दल लिहिणे भाग पडले. शुक्रवार दिनांक १५ फेब्रुवारी १९७४ रोजी, मृणालताईंनी, ठरावान्वये, महाराष्ट्र राज्य हाऊसिंग फायनान्स सोसायटीचे अध्यक्ष जवाहरलाल दर्डा यांच्यावर भ्रष्टाचाराचा उघड आरोप केला. फायनान्स सोसायटीचे अध्यक्ष सदरहू दर्डा हेच मुळी कर्जे मंजूर करताना कमिशन मागतात असे सांगून मृणालताईंनी फायनान्स सोसायटीच्या कारभाराची व आर्थिक व्यवहारांची न्यायालयीन चौकशी करावी अशी मागणी केली.

विधानसभेत ही खळबळ : कारण जवाहरलाल दर्डा ही असामी चिल्लर नव्हे. मंत्री व्हायला लायक अशी महान विधायक कर्तबगारी मागे उभी, हे यवतमाळचे जणु-जवाहर सहकारी चळवळीचे समर्पित सोयरे, गरिबीविरुद्धच्या युद्धातले शूर शिलेदार अशा माणसाचे खाजगी आणि सार्वजनिक जीवन अंतर्बाह्य शुचिर्भूत असणारच, हे या जबाबदार आमदारबाईंना ठाऊक नाही असे थोडेच आहे. पण अशा एखाद्या काँग्रेसी उच्चपदस्थावर चिखलफेक केल्यास झटपट प्रसिद्धी मिळते ना. काँग्रेसच्या नावाने मधून मधून शिमगा करायची एक वाईट सवयच विरोधी पक्षांनी लावून घेतली आहे असे दिसते.

यावेळी तर मृणाल गोरे यांच्या शिमगाकार्यक्रमात चक्क एक काँग्रेसवाला सामील झाला. फ्रेडरिक (द ग्रेट) पिंटो हे त्याचे नाव. मृणाल गोरे यांनी जवाहरलाल दर्डांवर केलेल्या आरोपात तथ्य असावे असे सांगून पिंटो म्हणाले : सहकारमंत्री यशवंतराव मोहिते यांना हे आरोप माहीत आहेत, पण कारवाई करण्याच्या बाबतीत ते असाहाय्य झालेले दिसतात. आपण मुख्यमंत्र्यांचे ‘ सगे ’ आहोत असे दर्डा उघडउघड बोलतात, त्याचा हा परिणाम असावा.

पिंटोंच्या या अवसानघातकी वक्तव्यामुळे विरोधी पक्षांना अधिकच चेव चढला. काँग्रेसवाल्यांचा गूळ, नाही म्हटले तरी, पाघळला. सहकारमंत्र्यांनी फायनान्स सोसायटीचा कारभार सुधारण्याच्या दृष्टीने योग्य ती कारवाई करण्याचे व त्यासाठी समिती नेमण्याचे आश्वासन दिले. त्याचबरोबर, भ्रष्टाचाराचे आरोप मोघम न करता पुराव्यानिशी करावे, हे सांगायला मंत्रीमहाशय विसरले नाहीत.

पुराव्याची गोष्ट काढताच विरोधकांची दातखिळी बसली. पुरावे गोळा करायचे तर दीर्घ काळ अंधारात राहून जाळे विणावे लागते. तेवढी जबाबदार चिकाटी विरोधकांपाशी, आणि विशेषत: या बंडखोर (आणि बंडुखोरसुद्धा) मृणालताईंपाशी असती तर

काय पाहिजे होते? तसे असते तर त्या सरळ काँग्रेसच्या सतत वाहत्या नळावर पाणी भरायला आल्या असत्या. पण मग नळावर पाण्याच्या निमित्ताने येऊन तणतणायची त्यांची बायकी हौस कशी भागली असती?

ता. क.: मृणाल गोरे आणि फ्रेडरिक (द ग्रेट) पिंटो यांनी विधानसभेत जवाहरलाल दर्डाची जी दरडपट्टी काढली तिला दस्तुरखुद्द दर्डा बिनतोड उत्तर दिल्याखेरीज राहणार नाहीत, असा आमचा कयास होता. आणि नेमके तसेच झाले: आमदार गोरे आणि पिंटो यांनी विधानसभेत केलेले आरोप सभागृहाबाहेर करण्याचे धाडस दाखवावे, असे आव्हान देऊन दर्डांनी स्वच्छ सांगितले की त्यांच्यावरील आरोप सिद्ध झाल्यास राजकीय व सामाजिक जीवनातून निवृत्त होण्याची व वाटेल ती सजा भोगण्याची त्यांची तयारी आहे.

सगळे भ्रष्टाचारी अशीच शंखफुंकी करतात, असे मृणासताईंनी मानू नये. जवाहरलाल दर्डा या माणसाची सावली पडत नाही, हे त्यांनी लक्षात घ्यावे. अज्ञास अधिक सांगणे नलगे. ●



## अन्यायाविरुद्ध सिमी-लढा

नग्नतेत सौंदर्य असते आणि थंडी वाजते.

परंतु तूर्त आपल्याला थंडीचे घोंगडे बाजूला ठेवून निखळ नग्नतेचा विचार करणे आहे. ही निखळ नग्नता पुन्हा, वास्तव आणि कलात्मक, अशी दोन प्रकारची असते. वास्तव कल्पनेने काय होते ते सर्वांना चांगले माहीत आहे. कलात्मक नग्नता ही मात्र थोडी भानगडीची गोष्ट आहे. म्हणजे असे की काही शेलक्या डोळस मंडळींना अशा नग्नतेत सौंदर्याचा साक्षात्कार होऊन त्यांचे देहभान हरपते तर अन्य काही ढोबळ आणि लघुदृष्टीची माणसे अशा दर्शनाने चेकाळतात. मला या दोन्ही प्रतिक्रिया लक्षणीय वाटतात.

सिमी गरेवाल प्रकरणातसुद्धा या दोन्ही प्रतिक्रिया एकमेकात गुरफटलेल्या होत्या. सिमी गरेवाल ही आहे एक भारतीय चित्रपट-चंद्रिका. म्हणजे बोली भाषेत नटी. सगळ्या भारतीय नट्या असतात तशी सिमीसुद्धा मोठी कुलशीलवती नटी आहे. असे असले तरी तिची कलानिष्ठासुद्धा तितकीच प्रखर आणि जाज्वल्य आहे. त्यामुळे कॉनरॅड रूक्स या बिनभारतीय चित्रपटवाल्याने सिमीला जेव्हा 'सिद्धार्थ' या चित्रपटात भूमिका दिली तेव्हा सिमीने ती सहर्ष स्वीकारली. 'सिद्धार्थ' चित्रपटातल्या काही दृश्यात सिमीला आपले कपडे उतरवून ठेवावे लागले होते. कलासक्तीसाठी हा त्याग तिने केला. कलेची पातळी उंचावण्यासाठी नट्यांना कपडे उतरवण्याची मुभा कलाप्रेमी समाज नेहमी देत आहेत. असो.

चित्रपटकलेचा एक साक्षेपी आणि अभ्यासू चाहता म्हणून 'सिद्धार्थ' हा चित्रपट पाहायचे मी मनोमन ठरवून टाकले. या चित्रपटाबद्दल मी तडकेने माहिती गोळा करू लागलो. कोठे काय शोधायचे याची एक बऱ्यापैकी उपजत समज मला आहे. उदाहरणार्थ, 'सिद्धार्थ' हा कलात्मक नवचित्रपट असल्यामुळे त्यातली नजरखेचक छायाचित्रे 'इलस्ट्रेटेड वीकली'मध्ये झळकणार असा माझा होरा होता. तसेच झाले. 'इलस्ट्रेटेड वीकली'चे संपादक पद्मश्री भगवान 'वीकलिंगजी' महाराज खुशवंतसिंगजी यांनी माझा विश्वासघात केला नाही. चित्रपटाबद्दलचे माझे अभ्यासू कुतूहल आणखी वाढले.

इतक्यात वर्तमानपत्रातून एक बातमी आली, 'फिल्म वर्ल्ड' या रंगीत, गुळगुळीत, मोहोरेदार, चित्रपटविषयक इंग्रजी नियतकालिकाच्या मुखपृष्ठावर सिमीचे 'सिद्धार्थ' मधले नैसर्गिक अवस्थेतले छायाचित्र तिच्या परवानगीवाचून प्रसिद्ध झाले. तेव्हा बिचाऱ्या सिमीला कसंसंच वाटू लागले! 'फिल्म वर्ल्ड' या, आपली बदनामी करणाऱ्या नियतकालिकाची विक्री थांबविण्यात यावी, अशी अर्जी सिमीने न्यायालयात दाखल केली. बरोबरच आहे. चित्रपटात असे झळकणे वेगळे आणि नियतकालिकाच्या मुखपृष्ठावर तसे झळकणे वेगळे. आर्य स्त्रिया विवेकी असतात असे म्हणतात ते काही खोटे नाही.

परंतु न्यायमूर्ती मात्र आर्यपुत्रासारखे वागले नाहीत. त्यांनी निष्ठुरपणे सिमीविरुद्ध निकाल दिला. सिमीने अर्जी आता वरच्या न्यायालयात नेली आहे.

अन्यायाविरुद्ध लढा देणाऱ्या भारतीय भगिनीचे हे दर्शन कित्ती कित्ती विलोभनीय आहे नाही? म्हणूनच सीमालढ्याबद्दल जशी बांधिलकी आपल्याला वाटते तशी सिमी-लढ्याबद्दलसुद्धा वाटायला हवी.

— अनंतराव



# ओंडका

● सौ. वसुधा पाटील ●

—कथाक्षेत्रात शतक केव्हाच झळकवलंय. " जमुना के तीर " या कथासंग्रहाला महाराष्ट्र सरकारचे पारितोषिक मिळाले आहे. " पियानो व इतर एकांकिका " हा एकांकिका संग्रह प्रकाशनाच्या मार्गावर. मुंबईत गोरेगावच्या अ. भि. गोरेगावकर हायस्कूलमध्ये शिक्षिका.

—जेव्हा लिहावंसं वाटतं तेव्हाच लिहितात, म्हणूनच कथांची एकूण संख्या कमी. १९५६ पासून लेखनास सुरुवात. पहिल्या काही कथा 'वसुधा' मध्ये प्रसिद्ध झाल्या. काही परत आल्या तेव्हा 'वसुधा'चे त्या वेळचे संपादक श्री. विजय तेंडुलकर यांच्याकडून मार्गदर्शन मिळाले. तंत्र, शाब्दिक जंजाळ इ. मध्ये जखडलेल्या कथांपेक्षा जीवनाचा वेध घेणाऱ्या कथा त्यांना अधिक महत्त्वाच्या वाटतात. त्यामुळेच कदाचित त्यांच्या बऱ्याचशा कथा व्यक्तिचित्रणात्मक आहेत. नवीन तंत्र, मनोविश्लेषण वगैरे प्रकार त्यात नाही. त्यात कधी कधी पाल्हाळही आढळतो. त्या जशा सोज्वळ कथा लिहीत नाहीत तशाच मुद्दाम 'तशाही' कथा लिहीत नाहीत. पण स्पष्ट लिहिणे आवश्यक असेल तर 'स्त्री लेखिकेने अशी भाषा लिहिणे बरोबर नाही' वगैरे आरोपांची पर्वाही करीत नाहीत—

वरील गोष्टींचा प्रत्यय आणून देणारी त्यांची ही कथा— 'ओंडका.'

नोकऱ्या धरायच्या आणि सोडायच्या हा त्याचा छंद! बहुतेक करून घरीच असायचा—विड्या फुंकीत—नाहीतर जुगार खेळत! नाहीतर चुलीपाशी खुडबुडत!

एकदा कधी नेहमीसारखाच नोकरी सोडून घरी बसायला आणि दूरच्या पुतण्याला क्षयाची गंभीर बाधा व्हायला एकच गाठ पडली—कोरड्या हवेच्या ठिकाणी पुतण्याला ठेवण्याची अतिशय निकड होती—परंतु त्याच्या बरोबर जायला, त्याची काळजी घ्यायला कोणीच पुढं येत नव्हतं. बायकोचे दिवस भरत आलेले! बाप म्हातारपणामुळे अंथरुणाला खिळलेला, आई ठार वेडी, भावांना त्याच्या आजारपणाची भयंकर भीती! अखेर हाच म्हणाला, 'वर्षभरच राह्यचंय ना? चल, मी येतो तुझ्याबरोबर! पण माझाही खर्च तू करायचास. कबूल?'

मरणाच्या भीतीने पांढराफटक पडलेला पुतण्या एकदम कबूल झाला. एक वर्ष, दोन वर्ष, कदाचित तीन वर्षसुद्धा.. काका कबूल झालाय हेच खूप झालं. खर्चाचं मागंपुढं पाहता येईल. शिर सलामत तो पगडी पचास.

आणि खरोखरच तीन वर्षं लागली बरं व्हायला. तोवर त्याने त्याला सकाळ संध्याकाळ झकासपैकी ताजा ताजा स्वयंपाक रांधून वाढला. स्वयंपाक करणं म्हणजे याच्या हातचा मळ. कारण खिशात पैसे खुळखुळत असले की ते हॉटेलमध्ये उडवण्याऐवजी, मटण, मासळी, अंडी घरी आणून रुचकर शिजवून भरपेट खाण्याचीच याला हौस जास्त! चुलीशी त्याचे वैर नव्हतंच! कधी उलट सख्यच, म्हणून तीन वर्षं अगदी मजेत गेली.



हॉस्पिटलच्या आवारात एक छोटंसं कॉटेज घेतलं होतं. पुतण्याचं औषधपाणी आणि इतर सुश्रुषा करण्यासाठी नर्स होतीच. याला त्याचं तसं काहीच करावं लागलं नाही. एक स्वयंपाक रांधणं आणि अबोल सोबत देणं एवढंच त्याचं कर्तव्य. पुतण्या तासन् तास आढ्याकडे नजर लावून स्वस्थ पडून राह्यचा. कधी थोडंबहुत वाचायचा. आणि दिवसातला बराच वेळ झोपेतच घालवायचा. याची आपली सकाळ-संध्याकाळ आत स्वयंपाकघरातच खुडबुड. काकापुतण्याचं महिना महिना बोलीभाषण काही नसायचं. महिना अखेरीस हिशोबाचा कागद पुतण्या पुढे हा रुबाबात सारायचा. सगळा खर्च पाहून पुतण्याचे डोळे पांढरे व्हायची वेळ येई.

'हे बघ, माझ्या हातचं खाऊन तुझी तब्येत झकासपैकी सुधारतेय, हे डॉक्टरच्या बापाला देखील नाकबूल करता यायचं नाही. तेव्हा तू खर्चाला मागंपुढं पाहू नकोस. आता मी तुझ्यासाठी कामधंदा सोडून हे स्वयं-पाक्याचं काम पत्करलंय. तर मला थोडे खर्चायला पैसे देशील की नाही ? माझ्याही थोड्याबहुत गरजा भागल्या पाहिजेत नं ?'

पुतण्या मग अशानं दिवसेंदिवस कर्जात डुबत जायचा. नकार देणं शक्यच नव्हतं. तीन वर्षांत घरचं कुणी म्हणजे कुणीच येत नव्हतं. मुलाचे फोटो मात्र वाढदिवशी येत होते. अधनंमधनं थोडे थोडे पैसे ! चुकून माकून एखाददुसरं पत्र ! बस्स ! यापलीकडे काही नाही.

त्या मानाने काका जवळचा वाटत होता. बाकी सगळ्या वर्फाळ गारठ्यात एवढीच एक उबदार झुळूक. पुतण्या जेवल्याशिवाय हा जेवत नसे. कधी कधी पुतण्याची अन्ना-वरची वासनाच उडे, तो ताट दूर सारी. तेव्हा हा खरोखरच पुन्हा अन्न गरम करून आणी. आणि आग्रहाने त्याला जेवायला लावी. कधी कधी भयाण रात्री सरता सरत नसत ! दिवसचे दिवस घरभर सुतक दाटून राही. तेव्हा हा भसाड्या आवाजात सिनेमातली पांचट गाणी गात गात स्वयंपाक करीत असताना नकळतच त्याला स्वर्गातून ओढून आणून जमिनीवर खिळवून ठेवी. बोली भाषण काही नाही ! पण त्याचं रांगडं अस्तित्वच केवळ पुतण्याला या जगात जीव अडकवून ठेवायला भाग पाडी. पुतण्या मनातून कृतज्ञतेच्या ओझ्याखाली वाकलेला होता. काकाच्या खर्चाला नकार देणं त्याला कधीच शक्य झालं नसतं. तो मुकाट्याने खर्चाला मान्यता देई आणि नवे कर्ज काढी.

काकाच्या व्यक्तीगत खर्चांत अनेक काटे-कुटे होते – कागदावर मात्र 'खाजगी' एवढाच शब्द लिहिलेला असायचा.

या तीन वर्षांत गल्लीबोळातले जुगाराचे अड्डे, नाटकी तमाशाची थेटरं, पत्त्यांचे अड्डे, हातभट्टीच्या पाणपोया, शर्यतीच्या जागा, रांडांचे कुंटणखाने, अशा सगळ्या सगळ्या ठिकाणी त्याने आपल्या पावलांची धूळ झाडली. एकेकदा नव्हे ! अनेकदा ! अगदी वारंवार ! खर्च सगळा पुतण्याच्या नावावर. गावची हवा एकदम कोरडी ! दिवसरात्र पुतण्याबरोबर मस्त खुराक ! आणि कोणतंही बंधन नसलेलं मनाजोगतं आयुष्य जगायची संधी ! ह्याची तब्येत एकदम मस्त झाली ! पुतण्याही हळूहळू खूपच सुधारला – तीन वर्षांनी दोघे परत आले तेव्हा हा तरुण झाला होता. आणि पुतण्या मात्र मनाने खचल्यामुळे अंगी म्हातारपणाची कळा लेवून आला होता. पण मग पुतण्याच्या संसाराला नव्यानवलाईने सुरुवात झाली होती. कारण आल्याआल्याच त्याला घरच्यांनी घेरला होता. त्यावेळी हा मात्र आपोआप बाजूला फेकला गेला. आतां



त्याची कुणाला जरूरी नव्हती – आणि त्यालाही अर्थात कुणाची नव्हतीच. त्याची तीन वर्षं मस्त मजेत, विनासायास गेली होती. पैशांच्या अनेक उलाढाली त्याने केल्या होत्या, पुतण्याच्या जिवावरच! त्यातल्या काही अंगाशी आल्या होत्या. काही किफायतशीर ठरल्या होत्या. पण एक वर्षभर आरामात काढता येईल एवढी तरतूद मात्र झाली होती. मग निवांतपणे त्याने पुन्हा नोकऱ्या पहायला नि नोकऱ्या सोडायला जोरदार सुरुवात केली. एक त्यातली बरी टिकली. एकटा जीव सदाशीव! लागून लागणार किती? बरीच शिल्लक गाठीला जमली! नशिबानेही हात दिला. सगळ्या व्यवहारात खोट कुठं बसलीच नाही. चलतीच चलती झाली.

मग एके दिवशी ब्लेझरचा नवा तपकिरी कोट आणि परीटघडीचा पांढराशुभ्र पायजमा घालून तो पुतण्याच्या केबिनमध्ये एकदम घुसून त्याच्या समोरच रुबाबात उभा राहिला. पुतण्याही एव्हाना बड्या ऑफिसरच्या ग्रेडपर्यंत चढला होता. आजारपणी काढलेल्या कर्जाची फेड केव्हाच झाली होती. बंगला बांधला होता. दारात मोठी बाग, बागेत मोठी मोटार, मोटारीच्या भोवती भव्य पोर्च... मुलं कॉन्व्हेंटस्कूलमध्ये... बायको नोकराचाकरांच्या गराड्यात! दागदागिन्यांनी मढलेली.... ऑफिसात त्याला स्वतंत्र केबिन. हाताखाली चाळीस-पन्नास जणांचा स्टाफ. पुतण्या होता तसाच अबोल, परंतु मोठ्या रुबाबात आब राखून होता. भोवताली चार बडी धेंडं महत्त्वाच्या कामासाठी तातडीची बोलणी करण्यासाठी आली होती.

कुणाचाच मुलाहिजा न ठेवता हा गुर्मीत म्हणाला, "माझं लग्न ठरतंय! राहायला जागा नाही. एक बिऱ्हाडासाठी जागा बघितलेय. पण मालक तीन हजार डिपॉझिट मागतोय. तेवढे तू दे. नाहीतर मालक तुझ्या ओळखीचाच आहे म्हणे. त्याला फोन करून तूच काय ते ठरवून दे.... बघ... मरायला टेकला होतास तेव्हा एवढं तुझं सगळं केलंय. मग माझ्यासाठी एवढंसुद्धा नाही करणार?"

बाकीचे सगळे डोळे विस्फारून टकमक पहात असतानाच पुतण्याने चटकन् डायल फिरवून त्या ओळखीच्या गृहस्थाला फोन केला. आणि जागेचं निश्चित करून टाकलं. डिपॉफिट हजारावर आलं! आणि तेही पुतण्याने भरायचं असंच निश्चित झालं. शिवाय मुलगी कोण, कुठली, कुणाची याची कोणतीही चौकशी न करता त्याने लग्नाचा अहेर म्हणून काकाला तिथल्यातिथे शंभराच्या पाच नोटा काढून दिल्या. काकाने एकेकाळी जीव वाचवला होता म्हणून या शंभराशंभराच्या, हजाराहजारांच्या नोटांचा सुखद स्पर्श अनुभवायला मिळत होता. जीवच जाता तर या सुखसमृद्धीचं काय होय?

रुबाबात काका केबिनच्या बाहेर आला. त्यावेळी खरं म्हणजे त्याच्या खिशात बँकबुक होतं. आणि पंधरासोळा हजारांची रक्कम त्याच्यात शिलकी होती. शिवाय काकाची एक हमरस्त्यावर खोलीही होती. अर्धा भाग त्याने एका शिंप्याला दिवसा धंद्याकरता भाड्याने दिला होता. शिवाय आपले कपडे त्याच्याकडून फुकटात शिवून घेई ते निराळेच. रात्री तिथेच पत्त्यांचा अड्डा बसे. पुतण्याच्या वशिल्याने आणि खर्चाने नवी जागा मिळताच ही जागा जबरदस्त पागडी घेऊन शिंप्याला किंवा अड्ड्यामधल्या दोस्ताला विकण्याचा त्याचा मनसुबा होता. तो जर पार पडला असता तर बँकेत आणखी दहा-बारा हजारांची भर पडणार होती. मग हा कसलातरी बिझिनेस हाती घेणार होता. त्यातही अर्थात पुतण्याची परत मदत मागणार होताच. त्याच्या दीर्घ आजारात आपण केलेल्या सेवा सुश्रूषेची आठवण देऊन.

अशा स्थितीत त्यांचे लग्न झाले. म्हसोबाला नव्हती बाईल आणि सटवीला नव्हता घो अशातले ते लग्न! हा खरोखरच म्हसोबाच होता. पण सटवी मात्र खरोखरच गुणी मिळाली! दिसायला बेतशीर, शिक्षण नाही. आई-वडील वारलेले, अशा स्थितीत लग्न वारंवार लांबणीवर पडलेले! घरातल्या चुलत आते भावांची बहिणींची सर्वांची लग्न तिने कुवारपणी पाहिली! भावजयांची, बहिणींची बाळंतपणे निर्विकारपणे पाहिली. भाचसंडे प्रेमाने वाढवली. आणि मग कुणा मध्यस्थाने आणलेल्या या म्हसोबाशी लग्न करायला ती कशीबशी एकदाची तयार झाली. त्यावेळी तिची पस्तीशी नुकतीच संपली होती.

पण सर्वांनी हौसेने लग्नाचा थाट केला. आईचे जवळजवळ पस्तीस एक तोळे सोने तिच्या अंगावर होते. शिवाय तिच्या नावची काही रोकड! काही सर्टिफिकेटे! आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सटवाबाई खालच्या मानेची, मिटल्या तोंडाची, कामसू आणि काटकसरीने संसार करून मिळेल त्यात समाधान मानणारी होती. म्हसोबाचा संसार सुखाचा व्हायला काहीच हरकत नव्हती. पण हाच तिढ्या स्वभावाचा, तिरशिंग्या पडला ना? बोलून चालून म्हसोबाच!

लग्नानंतर पहिला पत्त्यांचा अड्डा बसला तेव्हा दोस्तांनी डोळे मिचकावीत विचारलं, "काय भाबड्या, कशी काय गेली पहिली रात्र?" हा गुरगुरत म्हणाला, 'ते तुम्ही विचारू नये... मी सांगू नये..."

"अरे यार, तरी पण...! तू तर दर्दी माणूस... प्रत्येक वेळी नवी चव पायजेल तुला...! अरे काही तरी बोलशील की नाही गंमतीचं! रात्रीच्या मजेचं?"

जिंकलेल्या पैशांचा एवढा मोठा गल्ला जमला होता जवळ तरी हा करवादून ओरडला. "अरे सोड रे बाबा गंमत बिमत! ती काय साली बायको आहे? नाही पाठ, नाही पोट, नाही छाती! छप्पन्न फासळ्यांचा सांगाडा नुसता! मजा कसली साली कर्माची! लाकडाचा सुका ओंडका जसा– आपण तर बाबा जाम वैतागलो. अरे नुसता हात लावायची खोटी की ओंडका अंगाखाली मुकाट्याने हजर. हूं नाही की चूं नाही. असल्या ओंडक्याशी खेळ खेळण्यात कसली मजा? अरे नुसता हात लागला तर जनावराचीसुद्धा कातडी थरथरते... इकडे सगळाच शुकशुकाट! कोरडा ठणठणीत–"

एवढं सगळं बोलूनही स्वयंपाक घरातून आलेल्या पोह्यांच्या बशा मागून बशा कशा फस्त झाल्या त्या झाल्याच. गोड शिऱ्याची फर्माईशही परत झालीच. परत परत चहाही झाला. जमलेले टोळभैरव जिभेवर खाल्ल्या पदार्थांची चव घोळवीत घोळवीत गेले. पण हा बशा गोळा करायला आलेल्या बायकोवर खेकसला "हे बघ, यमुना मी सांगितल्या शिवाय या बाहेरच्या खोलीत तू बिलकूल येता कामा नये. या मधल्या दारातसुद्धा उभं राहता कामा नयेस. एकदाच काय ते सांगून ठेवतो. हे तुझं कुरूप थोबाड बघायला नकोय कुणी मला, माझ्या नशिबी आलंय

तेवढं खूप झालं."

यमुना विस्फारित डोळ्यांनी पहातच राहिली. हातात धरलेल्या कपबशा खरे म्हणजे दचकून गेल्याने खाली पडून फुटायच्याच. परंतु तिने घाबरून त्या घट्ट धरून ठेवल्या होत्या. म्हणूनच केवळ बचावल्या.

"हे बघ माझ्या घरी दोस्त मंडळी येणार. आम्ही पत्ते पैसे लावून खेळत बसणार. कधीमधी दारूच्या बैठकीही होणार. मी शर्यतींना जातो, जुगार खेळतो. सर्व काही नाद मला आहेत. तेव्हा एकदाच सांगून ठेवतो. यासाठी रडारड, आदळ आपट केलेली मला चालणार नाही. तू फक्त स्वयंपाक घर संभाळायचंस! बाहेरच्या खोलीत तुझं काम नाही."

कपबशा, विड्याची थोटकं, जळक्या काड्या गोळा करून ती मुकाट्याने आत गेली. आणि तिने डोळ्यात भरभरून आलेले पाणी आतल्या आत जिरवून टाकलं. गळ्याशी आलेले हुंदके मोठ्या निग्रहाने आतल्या आत दडवून टाकले. त्यानंतर ती कधी रडली नाही. हसलीही नाही. कुणाशी कधी आवेगाने चार शब्द बोललीही नाही. कधी अपूर्वाईने नवं नेसून दागदागिने घालून बाहेर पडली नाही. सदोदित राहिली आतल्या स्वयंपाक घरातच. त्या दिवसापासून ती खरोखरच एक ओंडकाच बनली.

नंतरच्या काही वर्षात आपल्या रुक्ष, कलाहीन संसारात तिने यंत्रासारख्या निर्विकारपणे एवढ्याच गोष्टी केल्या. त्याच्या चार मुलांना जन्म दिला. त्याला आणि त्याच्या दैववान दोस्तांना, मनमानेल तसा आणि तेवढा, वाटेल त्यावेळी स्वयंपाक रांधून वाढला. घर स्वच्छ ठेवलं. आपणही स्वच्छ राहिली. आणि रात्री बेरात्री दारू पिऊन, गलिच्छ शिव्यागाळी करीत वाटेल त्या गलिच्छ अवस्थेत घरी परतलेल्या नवऱ्याच्या ताब्यात आपलं शरीर देऊन मनाने हजारदा ओंगळपणा सहन करीत राहिली.

परिणामी ती दिवसेंदिवस खचतच चालली. मुलांचं सुख म्हणावं तर तेही नाही. एक वेडा! एक जन्मापासूनच लुळापांगळा! एक धष्टपुष्ट, दिसायला चांगला पण शिक्षणाच्या नावाने शून्य! आणि स्वभावाने बापाची हुबेहूब प्रतिकृती जशी! तसूभरसुद्धा कुठं उणं नाही! उलट वरताणच! राहता राहिली एक मुलगी... तिचीही एक निराळीच तऱ्हा!

या सगळ्यांचा तऱ्हेवाईक शिकारखाना संभाळून संसार रेटता रेटता तिची सर्वस्वी दमछाक झाली! आणि एक दिवस ती बिछान्यावर आडवी झाली ती बऱ्याच दिवसांकरिताच! माहेरची लोकं कितीदा तरी तिला न्यायला आलेली होती. खरं म्हणजे आपल्या परिस्थितीबाबत तिच्या तोंडून एक अक्षरही कधी कुणाला कळलं नव्हतं पण बाहेरूनच एकसारखी कुणकूण कानावर येत होती. पण ती जाणून चौकशीसाठी ज्या ज्या वेळी ती आलो त्या त्या वेळी त्यांना परतून जावं लागलं होतं. हिनंच बावापुता करून समजावून त्यांना परतवून लावलं होतं. पुढला सगळा मनस्ताप टाळण्यासाठी फक्त! माहेरचा विनाकारण झालेला उद्धार तिला ऐकवत नसे. त्यापायी झालेला छळ सोसवत नसे. पण या खेपेला ती खूपच आजारी म्हणून तिला न्यायला आले तर ही आनंदाने निघाली. प्रथमच. खुशाल मुलांना सोडून. लगबगीने तिने कपडे वगैरे बांधून निघायची तयारी केलीसुद्धा. पण हा तिथंच विड्या फुंकीत बसला होता. तो वस्सकन अंगावर आला, 'चालली माहेरी, काय सोनं लागून गेलंय? काही जायचं नाही. या हरामखोराशी बिलकूल संबंध ठेवायचा नाही. तुला सांगून ठेवतोय! आज जर हट्टाने गेलीस तर या घरी तुला थारा मिळायचा नाही, मी परत घरात घेणार नाही सटवे, तुला शेवटचे सांगतोय.'

मग तिने निमूटपणे पायतल्या चपला काढून ठेवल्या. पिशवीतले कपडे काढून जागेवर ठेवले. आणि एक शब्द न बोलता डोक्यावरून पांघरून घेऊन बिछान्यावर अंग लोटून दिलं. पण यावेळी तिला न्यायला आलेला भाऊ गप्प बसला नाही. मेव्हण्याशी भांडभांड भांडला. तिलाही त्याने तऱ्हेतऱ्हेने विनवण्या, आग्रह करून पाहिला. थोरल्याला समजावून पाहिलं. हिला घेतल्याशिवाय जाणार नाही म्हणाला. संध्याकाळपर्यंत ठाण मांडून लोचटपणे बसूनच राहिला. चाळकऱ्यांना एकूण तमाशा तेवढा बघायला मिळाला.

तिला तर एक शब्द बोलायचं त्राण उरलं नव्हतं. पण हा निगरगट्ट, सकाळभर स्वयंपाक शिजवता शिजवता आत बाहेर करून तारस्वरात मेव्हण्याला आणि शेजारपाजाऱ्यांना शिवीगाळ करीत राहिला. दिवसभरात संध्याकाळपर्यंत बायकोला त्याने थेंबभर पाणीसुद्धा दिलं नाही. आपल्या आपण स्वयंपाक रांधून, मुलांना वाढून, स्वतः जेवून मागची झाकपाक करून तो मेव्हण्यासमोर स्वस्थपणे विड्या ओढीत राहिला. मधून मधून भांडणं उकरीत राहिला. संध्याकाळपर्यंत तिचा भाऊ आणि ती अन्न काय पण पाण्याचा घोटसुद्धा न घेता तसेच राहिले. अखेर भावालाच माघार घ्यावी लागली. कसकसणाऱ्या अंगाने तो उठला, आणि निघाला. पायात चपला सरकवीत म्हणाला, 'हे बघ ययूताई, मी निघतो. याच्यानंतर आमच्यापैकी कुणीही तुला बोलवायला येणार नाही. आता यायचं असलं तर तूच आपण होऊन ये. अगदी या तुझ्या नादान नवऱ्याला सोडून कायमची राह्यला आलीस तरी चालेल. आम्हाला काही तू जड जायची नाहीस. एक सोडून आम्ही सहा जण आहोत. याला केव्हाच धडा शिकवू. पण तू खंबीर असलं पाहिजेस. स्वतःशी! कशाला या गोठ्यात राबतेस? फुकट मरून जाशील. किती तुझी प्रकृती खालावलीय? यांना कुणाला आहे त्याची फिकीर? दे सोडून सगळ्यांना. आणि एकटी चल माझ्याबरोबर. पाहातो मग काय करायचं ते! चल, मी निघालो. तू निघणार? बघ येणार असलीस तर आताच चल.'

हा त्याच्या अंगावर धावून गेला. त्याच्या शर्टाची कॉलर पकडून शिव्यांची लाखोली वाहात ओरडला, अरे जारे, मोठ्या प्रेमाचा आव आणून बहिणीला न्यायला आलाय! हिंमत असेल तर नेऊनच दाखव ना! मग दाखवतो माझा हिसका कसा तो तुला! 'जर बापल्या, खरा मर्द असशील तर...' भावाने अगदी सहज स्वतःची कॉलर सोडवून घेतली. पुढचे त्याला काही बोलूच दिले नाही. फाडदिशी एक सणसणीत मुस्कटात लगावून जोराने त्याला ढकलून दिलं. म्हणाला, ताकदच अजमावयाची असेल तर ये असा पुढं! होऊनच जाऊ दे. असे तसे आम्हाला समजू नकोस. ही आमची यमूताईच पडली म्हणून. नाहीतर तुलाच दाखवला असता इंगा! समजलास? आणखी एक हवीय सणसणीत? बत्तीसच्या बत्तीस दातकड्या

उचकटून टाकीन! समजलास काय? सकाळपासून गप्प बसलोय म्हणून? बोलता बोलता त्याने अस्तन्या वर सारायला सुरुवात केली. त्याचा हा नवा पवित्रा पाहून मुलं घाबरली. बापाला जाऊन बिलगली. दारात जमलेले इतर चाळकरीही लगबगीने पुढे सरसावले. त्याची समजूत घालू लागले.

"शाम, तू आता घरी जा. खरच आता हा सगळा तमाशा पुरे. मी येत नाही बाबा तुमच्या घरी. मी एकटी तुमच्याकडे राहून करू काय? मी मेले असंच समजा. नाहीतरी माझं मरण याच खातेऱ्यात आहे. सुटका नाही कशातूनच. हे बघ माझ्या गळ्याची शपथ. रात्र झालीय. तू आता जा. आणि एक सांगते, असं काही झालं की मला फार त्रास होतो रे राजा. यानंतर पुन्हा तुम्ही कुणीही इथं येऊच नका...तुमचा असा वारंवार झालेला अपमान मला सहन होत नाही. माझ्यावर दया कर आणि आता जा घरी. एक क्षणभरसुद्धा राहू नकोस. तुझ्या पाया पडते' ती बिछान्यावर पडल्या पडल्याच म्हणाली...गळा दाटून आल्याने पुढे शब्दच उमटला नाही. पण आश्चर्य म्हणजे डोळ्यात थेंबभरसुद्धा पाणी जमलं नव्हतं. डोळे अगदी नजरशून्य होते. त्यामुळे ती जास्तच कुरूप आणि भेसूर वाटत होती. मग भाऊ एक क्षणभरही तिथं राहिला नाही. झपाट्याने तिच्या घराकडे पाठ करून जो निघाला तो बरीच वर्षं तिने सांगितल्याप्रमाणे तिच्या घराकडे पुढा करून पुन्हा कधी वळलाच नाही... या मधल्या वर्षात काय काय घडलं, तिची हालहवाल काय आहे याची विचारपूस करायला कुणीही मग आलं नाही. तिनंही काही कळवलं नाही. वर्षामागून वर्षं आपली जात राहिली,

अशाच एका दिवशी, संध्याकाळी, माहेरच्या दारात ती अवचित येऊन उभी राहिली. अनवाणीच! सर्वांना आश्चर्य वाटलं! अंगावर जुनेर! हाडांचा सापळा. अंगाखांद्यावर फुटका मणीदेखील नाही. मंगळसूत्रातदेखील पितळेच्या वाट्या. धांपा टाकीत आल्याने तिला मुळीच बोलवत नव्हतं.

"यमे, अग काय ही तुझी दशा? आणि आज कुठे बाई इतडे पश्चिमेकडे सूर्य उगवला? एवढं झालं तरी काय?' अधू डोळ्यांनी टकामका न्याहाळीत आजी थरथरत्या खरखरीत आवाजात म्हणाली—

'मला थोडे तांदुळ हवेत! पेजेसाठी. चार दिवस झाले. घरात अन्नाचा कण नाहीये. आम्ही सर्वच उपाशी आहोत." टकटकीत निर्विकार नजरेने ही म्हणाली. तिचा आवाजही इतका कोरडा, इतका भकास होता की सर्वांच्या अंगावर नुसता सरसरून काटा फुलला.

"तुझ्या त्या खवीसाने यायला बरं दिलं? आश्चर्य आहे? नाकाने कांदे सोलीत होता हरामखोर मिशीला तूप लावून! मिजास उतरली?" शामने चिरडीला येऊन विचरले.

"जुनं उकरून काढू नको रे शामा! तिचा काही दोष आहे का त्यात?"

जाऽऽग राधिके, यमूला गरम गरम चहा करून आण. बरोबर चांगलंसं खायलाही आण." आजीने सावरून नेलं सगळं.

मग आजीनेच तिचा कबजा घेतला आणि हळूहळू विचारून तिच्याकडून सारं काढून घेतलं. म्हसोबाची नोकरी गेल्याला चार वर्षं झाली होती. धंदाही बसला होता. जुगारात सगळी शिल्लक खलास झाली होती. हिचे सारे दागिने गेले होते. घरातली हरेक चीजवस्तू गहाण पडली होती. हिची तब्येत तर पार उतरणीलाच लागली होती आणि शाळेत तर मुलांपैकी कोणीच शिकत नव्हतं. हा नुसता घरी बसून विड्यामागून विड्या ओढीत होता. तिच्या स्वच्छ घराची नुसती धर्मशाळा झाली होती. उकीरडा बरा अशी या धर्मशाळेची अवस्था झाली होती. फुंकून मोडून तोडून, साऱ्या वस्तू खाऊन संपल्यानंतरच्या उपासाचा आजचा चौथा दिवस होता. घरात स्मशान शांतता होती.

भावजयीने आणलेला चहा तिने घटाघटा घेतला. आणखीही मागून घेतला. खायला दिलेलं मात्र केळीच्या पानात बांधून घेतलं, घरी न्यायला म्हणून. मग उठली. भाऊ घरापर्यंत पोहोचवायला आला. बरोबर चहा, साखर, वाण सामान आणि तांदूळ, गहू, वगैरे घेऊन.

"आम्ही काही भिकारी नाही अन्नधान्य मागायला. मी हिला पैसे मागून आणायला पाठवली होती." कळिद्री भिकाऱ्याच्याच अवतारात हा खेकसला. चार दिवसांचा भुकेला असूनही आवाज अजूनही खणखणीत होता. भोवती विड्यांच्या थोटकांचा हा खच पडला होता.

"पैशांची भीक मागितली तर चालते?" भाऊ संतापून ओरडला.

"पैशांची भीक नव्हे. हक्काचे पैसे! हिच्या वाटणीचे इस्टेटीचे पैसे ताबडतोब आम्हाला हवेत. हिची आजी हिला स्वतःची पुतळ्यांची माळ देणार होती तिचं काय झालं?" उंच चढ्या आवाजात हाही ओरडला.

"पैसे वगैरे काही मिळणार नाहीत. दिलं होतं तेवढं राखण्याएवढी तरी अक्कल वापरली का? सगळं घालवलं. जुगारी माणसाला पैसे देण्याइतके आम्ही मूर्ख नाही आहोत समजलास? आम्ही आणि आमची यमूताई तो सारा व्यवहार आपापसात पाहून घेऊ. तुला मध्ये पडायची काही जरूरी नाहीये."

"मग ते सामान उचल आणि घेऊन जा मुकाट्याने. कुणाची मेहेरबानी नकोय. उचल म्हणतो ना! आणि चालता हो नजरेसमोरून." सुंभ जळला तरी पीळ कायम होता.

भावाने ताबडतोब पिशव्या उचलल्या आणि तो आल्या पावली परत निघाला. अर्ध्या वाटेत त्याला मुलांनी गाठलं आणि पिशव्या हस्तगत केल्या आणि मागच्या दाराने हळूच घरात आणून माळ्यावर लपवून ठेवल्या. जवळ जवळ चार पाच दिवसांनी घरात अन्न शिजलं. जेवतांना त्याला संशय आलाच. परंतु ताटात थोडासाच का होईना पण वाफाळलेला भात आणि गरमगरम पिठलं पहाताच भुकेपोटी राग रिचवला गेला. अभिमान गिळला गेला.

मग वारंवारच असे प्रसंग घडू लागले. सहा माणसांच्या कुटुंबाला कोणी झालं तरी किती पुरे पडणार? हळूहळू खटके वाढले, नातेवाईकांवरची शिवीगाळ वाढली. हा घरातून उठून बाहेर जाईना. कामधंदा शोधीना. मुलांना आजोळी रहायला बोलावलं तर हटवादीपणाने तिथंही पाठवीना. घरावर नुसती स्मशान कळा आली. आजूबाजूचे चाळकरीही मग कटाक्षाने या कुटुंबाला टाळू पाहू लागले.

अर्थातच मग हिच्या माहेरीच्या खेपा

वाढल्या. आजीने दरवेळी आपल्याकडून काही ना काही मदत केलीच. पुतळयांची माळही दाखवली, देण्याचं कबूलही केलं. पण फक्त मुलीच्या लग्नाच्या वेळीच ! गरजे पोटी, पैशाअभावी मोडून खायला नाही. थोडे बहुत धान्य, थोडेबहुत कपडेलत्ते, थोडेबहुत वाण सामान, थोडेबहुत पैसे अशी चारही बाजूनी मदत झाली. पण आभाळच फाटलं होतं त्याला ठिगळं कोण लावणार ? जगण्यासाठी माणसाला काय लागत नाही. अशात तीन वर्षाचे भाडं थकलं म्हणून घरमालकाने नोटीस बजावली. भांड्याकुड्यांसह घराबाहेर काढण्याचा दम दिला. त्याचवेळी याला अर्धांगवायूचा सौम्यसा झटका आला आणि ते निमित्त साधून याने बिछान्यावर जे अंग आडवं केलं ते शेवटपर्यंत.

एके दिवशी ही उठून पुतण्याच्या घरी गेली. घरात कुणी हिला ओळखलंच नाही. पुतण्याने विचारलं, "आपण कोण ?" काय काम आहे आपलं ?"

"मी यमुनाकाकी !"

पुतण्या चकीत झाला. पूर्वी कधी एकदा अपूर्वाईने येऊन काकाचं नवं बिऱ्हाड पाहून गेला होता. काकीच्या हातचं चमचमीत जेवून गेला होता. तेव्हा काकीचा अवतार असा नव्हता.

"काय झालं ? तुम्ही अशा कशा ? काही होतंय का तुम्हाला ?" त्याने काळजीने विचारलं.

तिने रुक्ष आवाजात, मोजक्या शब्दात सारं सांगितलं. जास्त बोलायची तिला संवय नव्हती. अखेर कोरडी, निर्विकार नजर लावून तिने विचारलं, "मी आता काय करू ?"

पुतण्यानेच मग तीनही वर्षांचं भाडं भरलं. आणि यापुढे महिन्याच्या महिन्याला थोडे-बहुत पैसे पाठविण्याचं आणि खोलीचं भाडं भरण्याचं आश्वासनही दिलं. आणि महत्त्वाचं म्हणजे सतत पंधरा वर्षं ते पाळलं. असा पुतण्या विरळा असा काकाही विरळाच.

पंधरा वर्षं त्याने नुसती बिछान्यावर लोळून काढली. तशी हालचाल करता यण्या-सारखी होती. पण कधी मुद्दामच केली नाही. नोकरीधंदा वगैरे मुळात काही करायचा नव्हताच. त्यात आजाराचं हे आयतं निमित्त मिळालं. चोवीस तास मशेरीने दात घासणं, तशात थुंकणं, दोन्ही तिन्ही वेळ भरपेट गिळणं, आणि शौचासाठी बायकोला दिवसा-तून दोनदा-तीनदा तरी हैराण करणं या-पलिकडे पंधरा वर्षांत त्याने दुसरा उद्योगच कसला केला नाही. या नित्याच्या कार्यक्रमात जरा जरी उणीव राहिली तरी आरडा ओरडा, शिवीगाळ केल्याखेरीज, आदळआपट माजविल्याखेरीज तो कधी राहिला नाही.

परिस्थिती अती अती बिकटच होत गेली. मुलांपैकी कुणाला शिक्षण नाही म्हणून कसला कामधंदा नाही, नातेवाईक याच्या तऱ्हेवाईक-पणामुळे दुरावलेले, मित्रमंडळ केव्हाच्या केव्हाच पांगून गेलेलं. कुणाचा आधार नाही. अशा परिस्थितीच्या विचित्र कात्रीत तिच्या आयुष्याच्या चिंध्या चिंध्या झाल्या. त्या खरं तर वाऱ्यावरच उडायच्या. परंतु त्या एकत्रित राहिल्या पुतण्याच्या सदिच्छेने आणि नातेवाईकांनी चोरून मारून केलेल्या मद-तीने !

नाहीतर एक साधीसुधी स्त्री म्हणून या संसारात तिला काय लाभलं होतं ? ना सुख ना समाधान ! मिळाला होता फक्त मन-स्ताप ! यातनाच फक्त. अतोनात कष्टांनी देह नुसता पोखरून काढला होता ! यंत्रा-सारखी उभी रहात होती, दिवस-रात्र कामं रेटीत होती एवढंच. हाडांचा सापळा, निर्जीव डोळे, दात पडलेले, केस विरळ झालेले, सदोदित श्वास लागलेला, शब्द विसरलेली, गळयाच्या शिरा ताठरलेली ही बाई कशा-साठी जगत होती ? कुणासाठी राबत होती ? खरं तर या घरात कुणालाच तिची कदर नव्हती.

अखेर एका भल्या पहाटेस हा वारला. त्यावेळी केवळ हिच्यासाठी सारे जमले. थोरला एकदम गंभीर बनला होता. काही नोकरीधंदा करू पाहत होता. त्यानेच सर्व विधी यथासांग पार पाडले. सर्व जबाबदारी अंगावर घेऊन.

अखेरच्या यात्रेला बरेच लोक होते. अनेक मोटारी होत्या. शववाहिनीतून यात्रा निघाली. कित्येक वर्षात घातले नव्हते असे अंगभर नवे कपडे होते. त्याला उचलून नेताना ही चक्क उघडया, निर्विकार डोळयांनी पाहात होती. पाण्याचा एक थेंब त्या कोरडया ठण-ठणीत डोळयात नव्हता. सारे मनात म्हणाले असतील, "सुटली बिचारी या खवीसाच्या तडाख्यातून ! सगळ्या घरादाराची राख-रांगोळी करणारा हा माणूस. एक तर हिने घटस्फोट घेऊन मोकळं व्हायला पाहिजे होतं. नाहीतर...नाहीतर... एक दिवस चहातून काहीतरी घालून....बरं झालं एकदाचा आपण होऊनच मेला तो...देव तरी असा आहे...न्यायचं तर यापूर्वीच, कितीतरी अगोदरच नाही का गठडी वळायची ? बाकीच्यांना किती छळ सोसायला लावा-यचा ?" सगळ्यांनी हसत खेळत, गप्पा मारीत सगळे विधी आटोपले.

मग घर स्वच्छ झालं. ते थुंकी, खाका-ऱ्यांनी भरलेलं तस्त, ती जुनी, जीर्णशीर्ण फाटकी चादर, ते मशेरीची लाळ पुसण्याचं घाणेरडं फडकं, ते एनिमाचं भांडं, त्या आरोळ्या, ते खेकसणं, सारं सारं नाहीसं झालं. घर स्वच्छ झालं आणि एकदम शांतही झालं. ही आधी अबोलच ! पण आता तर अगदीच मुकी झाली. एके दिवशी भावजय काहीतरी घेऊन भेटायला आली होती. आल्या आल्या आणलेलं सामान स्वयंपाक घरात सगळीकडं व्यवस्थित जागच्या जागी ठेवून ती बाहेरच्या खोलीत हिच्याजवळ येऊन बसली. खूप जुन्या जुन्या गोष्टी काढल्या. आपणच बोलत बडबडत बसली. मग तिच्या लक्षात आलं की ही डोळे सताड उघडे ठेवून, निर्विकार नजरेने नुसती टका-मका पहातच बसल्येय. एक अक्षर बोलत नाहीये.

"यमूवन्स, तुम्ही एकदम गप्पच त्या ? सगळं झालं ते एकापरीने उत्तमच झालं नाही का ! त्यांचीही सुटका, नि तुमचीनी


**मोफत ! मोफत ! मोफत !**

# पांढरे डाग

"श्वेतारीने" गेली ६१ वर्षे पांढऱ्या डागाच्या रोग्यांना पूर्ण फायदा देऊन संसार सौख्य प्राप्त करून दिले आहे. आपणसुद्धां लावण्याचे एक पॅकेट मोफत मागवून लाभ घ्या. डागाचे वर्णनासह पत्रव्यवहार करा.

**मृत्युंजय सुधा औषधालय, (४०)**
(४०) पो. कतरीसराय (गया)

सर्वांची सुटकाच ती एकंदरीत एका दृष्टीने पाहता ! खरं की नाही ? आता तुम्हाला जरा निवांतपणा मिळेल. खरं म्हणजे... उपाधी काही कुणाच्याच मागच्या सुटल्या नाहीत. अजून मुलीचं लग्न व्हायचंय, हा गोळा इथं पडलाय लोळत त्याचीही काळजी आहेच, शिवाय हे ध्यान सुधारायचंय, पण एक गोष्ट जमेची आहे. यमूवन्स, थोरला मार्गाला लागतोय, सगळी जबाबदारी आपण होऊन घेतोय, हे काय थोडं झालं ? शिवाय घरातली मुख्य बला निघून गेल्येय. आता जरा आराम करा. प्रकृतीची काळजी घ्या ! काय चार दिवस उरलेत ते जरा हसत खेळत घालवा...बोला सर्वांशी मोकळेपणी...किती दिवस गप्प गप्प राह्यचं म्हणते मी ?"

'अग, हा रिकामपणाच मला झेपत नाहीये. मला सहन होत नाहीये. मला सवय नाही त्याची ! दिवसरात्र कामाची सवय ! धुणी, भांडी, केरवारा, स्वयंपाकपाणी, रेशन, दळण यातच सारा दिवस संपायचा ! शिवाय यांचं सारं करायचं ! ताकद नव्हती तरी यांना तपकीर, पानतंबाखू, विड्या आणून दे, यांची तस्तं साफ कर, एनिमा दे; बेडपॅन टाकून दे, जेवणं भरव, पाच पाच मिनिटांनी चहा करून पाज, अशी कंबर मोडून काढणारी शंभर कामं ! ते सगळं संपलं ना म्हणून ही उसंत जीव खातेय माझा. शिवीगाळ नाही, आरडाओरडा नाही, तणतणणं नाही, ही शांतताच घर उदास करतेय ! मन या सगळ्यात गुंतलं होतं हेच बरं होतं. आता रिकामं राहिलंय तर नव्या काळज्या आत घुसताहेत. काय करू ? काही करावंसं वाटत नाही, काही बोलावंसं वाटत नाही आणि राधिके, एक गोष्ट फार खातेय जिवाला, जायच्या आधी आठ दिवस पोट फार बिघडलं होतं त्यांचं ! तरी सारखी भजी तळून मागत होते, 'मासळीची झणझणीत आमटी करून वाढ, मासे चांगले चुरचुरीत तळून वाढ, सुरमय आण, पापलेट आण,' असा सारखा धोशा लावला होता. एक तर घरात तेल थोडे, नारळ तर कित्येक दिवसात आणलेले नाहीत आणि मासे झाले तरी ते स्वस्त का आहेत ? पण काहीही करून, एक वेळ आणलं असतं आणि करून घातलं असतं, पण यांचं पोट पार बिघडलेलं ! खरं सांगू, एकसारखं बेडपॅन देऊन पुन्हा पुन्हा ते बाहेर जाऊन संडासास साफ करून आणण्याची ताकदच नव्हती राहिली माझ्यात बघ ! म्हणून एवढा गोंगाट केला, शिवीगाळ केली तरी कानाडोळाच केला मी. नसत्या सबबी सांगितल्या. म्हणजे वर्षानुवर्षं सगळं त्यांचं मनापासून केलं आणि अखेरच्या वेळी असा विश्वासघात केला. जाणून बुजून आळसच केला. खरं म्हणजे जग सोडून जाणार तर होते, पण आळसापायी त्यांची शेवटची इच्छा काही मी पुरी केली नाही. माझ्या मनाला ते फार खातंय...फार खातंय...मी कधी कुणाला फसवलं नाही. पण शेवटच्या दिवसात यांना फसवलं. मोठं पाप हातून घडल्यासारखं वाटतंय.' आणि कधी नव्हे ते तिचे रुक्ष, निर्विकार डोळे पाण्याने गच्च तरारून आले.

□ □




## वर्गणी

□ 'चित्र, वार्ता पुस्तक' ही पुरवणी महिन्यातून दोनदा, साप्ताहिक माणूस व्यतिरिक्त प्रसिद्ध होईल.

□ या पुरवणीची वार्षिक वर्गणी रुपये पंचवीस वेगळी पाठवावी.

□ साप्ताहिक माणूस वर्गणीदारांसाठी पाक्षिक पुरवणी वर्गणीत वीस टक्के सवलत ठेवली आहे.

□ म्हणजे साप्ताहिक माणूस वर्गणीदारांनी आपला वर्गणीक्रमांक कळवून फक्त वीस रुपये चित्र, वार्ता, पुस्तक पुरवणी वार्षिक वर्गणीप्रीत्यर्थ पाठवावेत.

—व्यवस्थापक

# मोझांबिकमधील स्वातंत्र्यलढा

वा. दा. रानडे

पोर्तुगीज साम्राज्यशाही ही जगातील सर्वात चिवट साम्राज्यशाही. ब्रिटिश, फ्रेंच, डचांनी आपल्या वसाहतीवरची सत्ता सोडली पण पोर्तुगीजांची मात्र तशी तयारी नाही. लष्करी कारवाई करून गोवा मुक्त करावा लागला. त्याला बारा वर्षे उलटली तरी मोझांबिक व अंगोला या आफ्रिकेतील आपल्या वसाहतीवरची सत्ता पोर्तुगीजांनी अजून सोडलेली नाही. गिनी-बिसाऊ ही आफ्रिकेतलीच त्यांची तिसरी छोटी वसाहत. तेथील जनतेने मात्र बंड करून पोर्तुगीज सत्ता झुगारून दिली व आपले स्वतंत्र प्रजासत्ताक घोषित केले.

मोझांबिक आणि अंगोलामध्येही स्वातंत्र्य लढ्याचा जोर वाढत आहे 'फ्रेलिमो' फ्रंट फॉर दि लिबरेशन ऑफ मोझांबिक या मोझांबिकमधील राष्ट्रवादी गनीम संघटनेने आपले कार्यक्षेत्र वाढविले आहे. या वर्षाच्या सुरुवातीला त्यांनी नवी चढाई सुरू केली. बेराबंदरापासून पश्चिमेस ऱ्होडेशियापर्यंत आणि उत्तरेस झांबिया व मालावीपर्यंत सर्व महत्त्वाचे रस्ते आणि रेल्वे मार्गावर ते हल्ले करीत आहेत. ऱ्होडेशियन सीमेजवळ असलेल्या व्हिला पेरी आणि व्हिला द मॅनिका या महत्त्वाच्या शहरांच्या आसपास असलेल्या गोऱ्यांच्या मालकीच्या शेतावर हल्ले करण्याकडे त्यांनी सध्या लक्ष केंद्रित केले आहे. चकमकीत तीन गोरे पोर्तुगीज ठार व अनेक जखमी झाले. बरीच शेते त्यांनी नष्ट केली. रशियन बनावटीचे ग्रेनेड, लाँचर्स व मशीनगन्स वापरून त्यांनी हामिंगा येथील पोर्तुगीज लष्करी तळावर दोनदा हल्ले केले. शहामिंगा बेटाच्या उत्तरेस ९० मैलावर मालावीकडे जाणाऱ्या रस्त्यावर आहे. रेल्वे मार्गावर सुरुंग पेरण्यात आले असून गाड्यावर हल्ले होतात त्यामुळे बेटाच्या उत्तरेकडे रात्रीची रेल्वे वाहतूक बंद असते.

गेल्या उन्हाळ्यापर्यंत फ्रेलिमोच्या हालचाली टेट प्रांत आणि ईशान्य भागातच मर्यादित होत्या. पण आता दक्षिणेकडच्या टोकापर्यंत मोठ्या संख्येने त्याच्या हालचाली सुरू आहेत मोझांबिकमधील गोऱ्यांची वस्ती मुख्यत: मध्य व दक्षिण भागात केंद्रित झालेली असून मध्य भागातील मॅनिका ए सोफाला प्रांतांत फ्रेलिमोचे वारंवार हल्ले होऊ लागल्याने त्यांना चिंता वाटत आहे. गेल्या महिन्यात रेल्वेवर किमान तीन हल्ले झाले व एका हल्ल्यामुळे एक गाडी रुळावरून घसरली. या हल्ल्यांचा गोऱ्यांनी एवढा धसका घेतला आहे की त्यांचे स्थलांतराचे प्रमाण वाढले आहे.

मोझांबिकमध्ये ६०,००० पोर्तुगीज सेना आहे. फ्रेलिमोच्या वाढत्या हल्ल्यांना तोंड देण्यासाठी या वर्षीच्या अंदाज पत्रकात लष्करी खर्चात सहा लाख पौंड वाढ करकरण्यात आली आहे. फ्रेलिमोचे तळ झांबियात तांझानियामध्ये आहेत. तेथून तीनशे मैलापेक्षा अधिक दूर जाऊन ग्रामीण भागात ते ठाण मांडून बसू शकतात आणि पोर्तुगीजांच्या महत्त्वाच्या केंद्रावर हल्ले करू शकतात हे त्यांनी दाखवून दिले आहे.

काही भागात शहरे पोर्तुगीज सैनिकांच्या ताब्यात पण खेड्यात फ्रेलिमोचा मुक्त संचार असतो. स्थानिक लोकाकडून ते धान्य, वाहने मिळवितात. खेड्यातील रस्त्यांचा उपयोग ते पोर्तुगीजांना करू देत नाहीत. पोर्तुगीज सैनिकांनी वाहने नेणे धोक्याचे असते. कारण सुरुंग केव्हा उडतील आणि छुपा हल्ला केव्हा होईल याचा नेम नसतो. बहुतेक ग्रामीण भाग फ्रेलिमोच्या हाती असून पोर्तुगीज फक्त आपल्या तळावरून हालचाली करतात.

टेट जिल्ह्याच्या चार भागापैकी वायव्य, ईशान्य आणि नैऋत्य भाग फ्रेलिमोच्या हाती आहे. त्यांनी तेथे सर्कल म्हणजे खेड्यापासून ते प्रोव्हिन्शिअल कौन्सिलपर्यंत मुलकी कारभार यंत्रणा उभारली आहे. प्रांतिक कौन्सिलमध्ये नागरिक आणि फ्रेलिमोचे प्रतिनिधी असतात. या भागात त्यांनी शाळा, हॉस्पिटल, सहकारी संस्था काढल्या आहेत. गनिमी सैनिकात शिक्षणाबद्दल बरीच ओढ दिसून येते. रसोईखात्याच्या झोपडीत मेणबत्तीच्या प्रकाशात दारूगोळ्याच्या रिकाम्या पेट्यांची बाके बनवून फ्रेलिमोने पुरविलेली पुस्तके हे सैनिक वाचीत असल्याचे एका ब्रिटिश वार्ताहरास दिसून आले.

फ्रेलिमोच्या गनिमी लढ्यास सप्टेंबर १९६४ मध्ये प्रथम सुरुवात झाली. गेल्या दहा वर्षात त्यांच्या चळवळीचा जोर हळूहळू वाढत गेला आहे. उत्तरेकडच्या काबो डेलगाडो प्रांतांत त्यांनी प्रथम चकमकींना सुरुवात केली. हा प्रांत जवळजवळ त्यांच्या ताब्यात असून तेथून शेंगदाणे, तीळ, एरंडी, काजू, मेण, हस्तीदंती कलाकृती यांची निर्यात फ्रेलिमो टांझानियास करतो.

टेटमधून अजून निर्यात होत नाही पण शेतकऱ्यांना उत्पादन वाढीस उत्तेजन देण्याकरीता फ्रेलिमोने त्यांना १०० पोती तीळ व २०० पोती शेंगदाणा वाटला. टेटमध्ये त्यांनी ४० प्राथमिक शाळा काढल्या असून ९ ते १५ वयाची सहा हजार मुले तेथे शिकतात. या भागात पोर्तुगीजांनी शाळा काढल्या नव्हत्या. शिक्षणाची सुरुवात फ्रेलिमोनेच प्रथम केली. अभ्यासक्रमात राज्यशास्त्र, पोर्तुगीज भाषा, गणित, भूगोल, जीवशास्त्र व इतिहास हे विषय असतात. क्रमिक पुस्तके दारेसलाममधील मोझांबिक इन्स्टिट्यूटने तयार केली आहेत. फ्रेलिमोचे दिवंगत अध्यक्ष मॉंडलेन यांच्या पत्नी श्रीमती जेनेट मॉंडलेन ही संस्था चालवितात. एका पुस्तकात दडविलेल्या बाँबचा स्फोट होऊन मॉंडलेन यांचा खून झाला. इंटर पोलने केलेल्या तपासात पोर्तुगीजांनी हा बाँब ठेवला होता असे दिसून आले. मॉंडलेन यांचा बळी घेतला की फ्रेलिमोची चळवळ विस्कळित होऊन थंडावेल असा पोर्तुगीजांचा अडाखा होता पण तो खरा ठरला नाही. मॉंडलेनच्या सहकाऱ्यांनी चळवळ पद्धतशीरपणे पुढे चालू ठेवली आहे.

फ्रेलिमोचे गनिमीदल कडवे, शिस्तबद्ध चपळ आहे. त्यांच्याजवळ ७५ एम. एम व ८५ एम. एम. च्या तोफा आहेत पण त्यांना आणखी शस्त्रे हवी आहेत. सैनिक शस्त्रांचे शिक्षण घेऊन तयार आहेत. पण जवळ शस्त्रेच नाहीत. पोर्तुगीज व ऱ्होडेशियन विमाने पाडण्यासाठी विमानविरोधी तोफा त्यांना हव्या आहेत.

फ्रेलिमोचा स्वातंत्र्य लढा दडपून टाकण्यासाठी पोर्तुगीजांना ऱ्होडेशिया व दक्षिण आफ्रिकेच्या गोऱ्या राजवटींची मदत होत आहे. कारण पोर्तुगीज मोझांबिक टिकवू शकले नाहीत तर ऱ्होडेशियाला काळ्या आफ्रिकन राष्ट्रांचा गराडा पडेल आणि दक्षिण, आफ्रिकेच्या सीमेवर गनिमांच्या हालचाली सुरू होतील व आपणास सत्ता टिकविणे कठीण जाईल अशी भीती त्यांना वाटते. पण हे तिन्ही गोरे सत्ताधारी एकत्र आले तरी आफ्रिकनांच्या स्वातंत्र्य लढ्याची लाट ते आता फार काळ थोपवू शकणार नाहीत. ◻



आठवणी भोवतालची रंगीबेरंगी वलयं त्याला पुन्हा नेतात, पुनः पुन्हा...

मधुर चाली, ऊर भरून आनंदून टाकणारा ढोलकीचा ताल, (अश्लील असे न म्हणता आली तरी) रसांनी ठिबकणारी शब्द रचना, चित्तवेधक अंगविक्षेप, छुमछुमणारा पदन्यास या गर्दीत साद-प्रतीसादाच्या आंदोलनात वैफल्यापार काही गवसल्याची जुळण त्याला आधार देते, पुढे सारते, मग त्याने ते आधार गच्च पकडून ठेवलेले असतात. गंमत म्हणून कौतुक करता करता, खूश होत, होत स्वतःची लूट करायला तो अधीर होतो, स्वतःच्या लक्तरापर्यंत लूट करायला सिद्ध होतो. पण तिथले लुटावयाचे आदर्श फार उंच, गगन भेदी उंच असतात. तिथल्या प्रेमाच्या प्रतिसादाच्या धाग्यांना नर्तिकेच्या आयुष्याची करुण उकल असते, तिची तो उत्तरे देऊ लागतो, स्वतःच्या कुवती पलीकडे, ती उत्तरे त्याच्या त्या भारावलेल्या दिसांची एक अंग बनतात. त्या धाग्यात त्याला निर्विकारपण आढळले की तो पेटतो. 'दौलत जादा' करून 'फर्माईश' ऐकत बसण्याचा कैफ त्याला दर्जेदार वाटतो. तिच्याशी हितगूज करणे, तिच्या आमंत्रणांने 'पान खाणे' हे त्याला गुरफटवते. तिच्या 'बैठकी'चा कैफ धुंद करणारा, नंतर त्या धुंदीशिवाय त्याच्यापुढे काहीच नाही.

नाचणारणीचा नादानी संसार उध्वस्त झाल्याचे आपण खूप ऐकतो, त्यात भर पडते. चुली वेळेवर पेटणं बंद होते. माणसे अक्षरशः आयुष्यातून उठतात. या उध्वस्त होणाऱ्यात सामान्य माणसाचे प्रमाण अधिक, तो वैफल्याच्या अधिक जवळ असतो.

# यांना मैत्रीचा हात हवा....


● विजय कोंडेकर ●

एक स्त्रियांचा वर्ग जो आज शालीनपणाचे आभास निर्माण करीत नाही. त्याने स्वतःचे उपेक्षीत रूप केव्हांच मंजूर केले आहे, त्याच बरोबर सेवेची सगळी दालनं उघडी ठेवली आहेत. आज त्याच सोबतीने उपजीविकेची आजमाईश बांधली आहे. हा नाचणाऱ्या स्त्रियांचा वर्ग असून तो महाराष्ट्रभर खेड्यापाड्यातून पिढ्यान-पिढ्या पैदा होत आला आहे. ही कुणा शाही सल्तनतची मेहरनजर आहे सांगता येणार नाही. पण या स्त्रियांना हे आयुष्य पदरी घ्यावे लागले आहे.

स्वतःला कलासक्त म्हणविणारा माणूस, दगदगीतून विरंगुळे चाचपणारा माणूस, वैराण झालेला माणूस, एखादा दिलेर, एखादा छंदीफंदी, यौवनाच्या चढणीवरचा कुणी तरुण अथवा एखादा मस्तवालही जेव्हां कधी लयबद्ध सुरांच्या तालावर नाचणाऱ्या ललनांचे नाच पाहायला निघतो, जातो, व बसतो तेव्हा तिथे ते सारे त्याच्या मनाला बरे वाटण्यासाठी असते. निरखता निरखता, त्याच्या मनोभूमीची अस्पष्ट जाण चाळवते, समोरील चार कमी अधिक सुंदर मुलीत एकी भोवती त्याची नजर लपेटू लागते, त्याच्या मनाचे असंतुष्ट कोपरे जागे झालेले असतात. अन् रेंगाळत्या मनाची रात्र घेऊन तो परततो.

कोल्हाटणी, डोंबारणी, कलावंतणी (देवदासी) यांची लग्ने होण्याची प्रथा नाही, त्या 'मालक' मानतात. जो जास्त मोजील तो मालक. त्याचे वय, आरोग्य याचाही विचार नसतो. यांची आयुष्ये भटकी. तंबू, पाले, यात्रा, उरूस, लग्ने (श्रीमंती), हल्ली थिएटर्स झालीत, पण भटकावे लागतेच, त्यात लक्षणीय फरक नाही. लोकांना कंटाळा येणारसे दिसले की मुक्काम हलवायचा.

प्रत्येक नाचणार मुलीच्या जिवावर पंचवीस एक माणसे बसून खातात. मोहाचे आभास निर्माण केल्याशिवाय जगणे त्यांना उपास



करायला लावते. मग त्याची किमया त्यांना कळते. तशी खूणगाठ त्यांच्या उरार्शा असते. बाकीचे उरले सगळे झूट, फोल, याचा पाठपुरावा करता करता आयुष्याच्या सुरुवातीची तीस वर्षे कशी संपतात ते त्यांना कळत नाही, पण वर्षे निसटून गेलेली असतात. लहानपणची चौदा पंधरा वर्षे घराबाहेर पडतील ती कामे ऐकावी, कारण मोठ्या 'बायांनी' किरकोळ कामासाठी बाहेर निघायचे नसते. अन उरलेल्या वेळात नाचणारणीचे आयुष्य' शिकायचे, नाच शिकायचा. मुलगी चौदा पंधरात आली की स्टेज.

रात्री पहाट होईपर्यंत नाचायचे. दारुड्यांच्या चेहऱ्याची, वासनांनी भरलेल्या डोळ्यांची प्रत्येक रात्र. (सरावलेला प्रेक्षक दारु न पिता जाणे कमीपणाचे, चुकीचे समजतो.) पहाटे डोळा लागला की उठायला दहा होऊन जातात. नंतर जेवण वगैरे व्हायला दोन. पुन्हा कुणी 'पान खायला' आलेले असतेच. पत्ते खेळणे, पत्यात हरवणे; हरवणे म्हणजे हुशारीचे समजले जाते. रात्रीचा शीण घालवायला वयस्कर बायकाबरोबर पुन्हा झोप. नंतर उठले की सहापासून 'मेकप', पायातील चाळ, स्टेज, 'बैठक', अशी दैनंदिनी. या रहाटीत बेमालूमपणे तारुण्य ओसरलेले असते. त्यात, अहंकार, द्वेष, फितुरी, स्पर्धा या सुलभ भावना, उरले सुरले वाईट व्हायला मदत करतात. साड्यावर शेकडो खर्चायचे पण उजळणीच्या पुस्तकासाठी दीड आणा देताना जिवावर यायचे, ते पुस्तक म्हणजे त्यांना कचरा.

पुस्तके, तारीख, जिल्हा, तालुका, देश, लोकशाही आदींचे कसलेही सोयरसुतक त्यांना असत नाही. एकूण आयुष्यावर दैवी पगडा. नशीब अखेरचे. दैवी कौल प्रत्येक बाबतीत मागणार, तेव्हा सारेच विवेकशून्य. कसल्याही संवेदनेपलीकडे बधीर, ठार, बेसुमार, बेहद्द आंधळे आयुष्य पिढ्यानपिढ्या जगत रहायचे. वेगळ्या आयुष्याच्या आशा, आकांक्षा त्यांना दुर्दम्य, अवास्तव वाटतात. पददलीत आयुष्य, देवाकडून मिळालेले, मग ते अटळ अन् कबूल. त्या आयुष्याला त्या कवटाळतात, ते त्यांना मोलाचेही दिसू लागते, त्याचा सराव होऊ लागल्याने ते सोपे अन् हुशारीचे वाटते. पुरुषी असुरीपण त्यात शाश्वततेची हमी आणून देते. बुद्धीला ताण नाही, सांसारिक स्त्रियांचे हाल नाहीत. वेड्या झालेल्या नजरांच्या काठावरचे हे आयुष्य त्यांना वरदान वाटते. या आयुष्याचा लोभस रंग त्यांच्यापुढे असतो, कौशल्य जमू लागते, सहजपण जमते, सरलता येते त्यात, आणि त्याचे मोबदले सुखावून जातात. यौवनाची मानी जिद्द, त्याची परिसीमा उंचावण्यात थरील. प्रेक्षक नाना रूपे धारण करतो, कुठल्यातरी मार्गाने ती मिळावी असे त्याला वाटते, कुणीतरी मनसोक्त प्रेम करावे, हक्काने हट्ट करावेत, वाट पहावी अशा भावनानी तो गुलाम होतो, गुंततो. नर्तकीला ते जमलेले असते, सराव झालेला असतो. दोन्ही बाजूंनी सौदा पुढे सरकत असतो, आयुष्ये कापत, कापत हळुवारपणे. फिदा होण्याची स्पर्धा पहात, पहात आयुष्याची ओसरण न कळण्याइतकी त्यांची मानसिक उभारी निद्रिस्त असते. आयुष्ये गेली, पिढ्या गेल्या तरी त्यांच्या जगण्याचे कारुण्य अजून 'आ' पसरूनच आहे. सदैव, पूर्ववत.

या निमित्ताने चारित्र्याच्या कल्पनेला एक नवे रूप मिळाले आहे, ते सबळ होतेय. प्रेमाच्या अभिनया खालचे आयुष्य खरे आणि बोलके आहे, त्यामुळे चारित्र्याला मिळालेले हे नवे रूप वस्तुनिष्ठ, भक्कम मजबूत अन विश्वासार्ह ठरते. ते आव्हानात्मकही आहे. त्याचे समाजजीवनावर काय परिणाम होतील याचा विचार करण्याआधी त्याची स्वतःची प्रवाही गती सर्वप्रथम लक्षात घ्यावी लागणार आहे. चारित्र्याचे हे वळण समाजजीवनातील सुखाचे क्षण हिसकून नेणार असेल वा काळवंडून टाकणार असेल तर त्याच्या परिणामाचे अंदाज तपासून पहाण्याचे जिवंतपण आपणाकडेतरी सापडेल काय ? किमान समाज त्याची नोंद घेणार नाही काय, हा सवाल नाही, हो आर्त सुराची पृच्छा आहे.

चारित्र्याच्या या कल्पनेच्या मुळाशी असलेल्या आयुष्याचा कुणी विचार करीत नाही, सारे तिरस्कार करून थांबतात. लुटणाऱ्या, बर्बाद करणाऱ्या स्त्रिया म्हणून एकूण सारे दुर्लक्ष. 'तमाशा परीषदेने' यांना काहीच दिले नाही. फक्त हार आणि अधिवेशने. त्यातही वशीलेबाजी, गळचेपी, गटबाजी. यांच्यातील लोकनाट्य, वग करणारा थोडाफार पुढे आलेला वर्ग वेगळा अन् आयुष्यभर गाणी म्हणून नाचणारा हा वर्ग वेगळा. याला कुणीही वाली नाही. सारे उन्हातले आयुष्य.

अशा उपेक्षित आयुष्याच्या पाठीवर माणुसकीचा ऊबदार हात कुणी ठेवणार आहेत का ? त्यांना नात्याची, मानाची वागणूक मिळेल का ? अर्वाच्य शब्द, दारूडे चेहरे, असूयेने भरलेले डोळे, फितुरी, गळचेपी यांचे घेर त्यांच्या आयुष्याला कुठवर पडणार ? आयुष्याच्या या वाटचालीचे, चारित्र्याच्या अप-अविष्काराचे वादळ समाजस्वास्थ्यावर किती घोर, किती दूरगामी परिणाम करील ? त्याची दखल घेण्याची कोणत्या प्रेषिताची आपण वाट पहात आहो ? त्यांना आयुष्याचा वेगळा विश्वास निर्माण करून देता येणार नाही का ?

कैक वर्षे उपेक्षितांच्या तळाशी लोटलेल्या या अबला बेवारशी आयुष्य जगताहेत. त्यांना मैत्रीचा हात पाहिजे. त्यांच्या पोटी येणाऱ्या अर्भकांना जीवनाचे अग्रक्रम पाहिजेत. हा लोकशाहीस कलंक होय. स्वातंत्र्यांच्या पावशतकानंतरही न पुसलेला हा कलंक माणुसकीची अखेर सांगणारा अक्षम्य द्रोह आहे. तातडीने त्याचे निराकारण झाले पाहिजे, निष्पाप आहुतींचो ही रेस थांबो ! त्यांच्याही आयुष्यात निस्सीम प्रेमाची भूक जागी होत असेल, त्यापासून दूर किती दिवस फरफटत ठेवणार ! □ □


पूर्णिया

अनिल अवचट

सहा रुपये

राजहंस प्रकाशन

# उत्कृष्ट वकिली सल्ला

दहा वर्षांपूर्वीची गोष्ट. इस्रायलमध्ये घडलेली.

माझ्या एका मित्रानं माझ्याकडे वीस पौंड उसने मागितले. मागायला कसली हरकत!

'दोन तासात परत करतो... दे ना प्लीज.' मित्र.

मी दिले. मित्राला नाही कसे म्हणायचे हो!

दोन तासांनी मी ते परत मागितले.

'एक दिवसात परत करण्याचे आश्वासन देतो.'

एक दिवसाची मुदत संपल्यावर मी त्याला फोन केला.

'कृपा करून एक आठवडा देशील?' मित्र.

आठवडा संपला. मी त्याला भेटलो. करता काय!

'सोमवारी दुपारी नक्की देतो...प्लीज...'

मंगळवारी संध्याकाळी मी एका सॉलिसिटरला गाठले. त्याने मित्राला नोटीस दिली, 'ही नोटीस मिळाल्यापासून बहात्तर तासांच्या आत पैसे परत न केल्यास कायदेशीर इलाज केला जाईल...'

दोन महिने गेले. मित्राकडून उत्तर आले नाही.

'अधिक काहीही मी करू शकत नाही...मित्र पैसे परत करण्याचे नाकारतोय, हे उघड आहे...' सॉलिसिटर.

मी दुसऱ्या चांगल्या सॉलिसिटरच्या हातात केस दिली. त्याने मित्राविरुद्ध केस कोर्टात दाखल केली.

पाच महिन्यांनी केस हियरिंगला निघाली.

आजाराचे निमित्त करून मित्र कोर्टात हजर झाला नव्हता. हियरिंगला पुढील वर्षातली एक तारीख पडली. पण हेही हियरिंग होऊ शकले नाही. कारण मित्र परदेशी गेला होता दरम्यानच्या काळात!

दीड वर्ष वाट पाहून, मित्र परदेशाहून न परतल्यामुळे, मी आणखी एका सुप्रसिद्ध वकिलाला गाठले. त्याने केस रीओपन करण्याची शर्थ केली.

'प्रतिवादी कोर्टात हजर झाल्याशिवाय केस कंडक्ट केली जाणार नाही...' न्यायमूर्ती.

मी वरच्या कोर्टाकडे गेलो.

'पन्नास पौंडापेक्षा कमी रक्कमेचे दिवाणी दावे ह्या पातळीवरचे कोर्ट चालवू शकत नाही, असा रेग्युलेशन आहे...सबब हा दावा काढून टाकण्यात येत आहे...' न्यायमूर्तींनी दावा रिजेक्ट केला.

मित्र परत येण्याची मी दोन वर्षे वाट पाहिली. तो परतल्यावर मी त्याला वकिलामार्फत आणखी तीस पौंडाचे कर्ज पाठवून त्याचे येणे पुरे पन्नास पौंड केले. वरील कोर्टाच्या मोनेटरी ज्युरीसडिक्शनमध्ये कायद्यान्वये बसेल अशी तजवीज केली. अडलो होतो ना!

आता मात्र हायर कोर्टाने दावा दाखल करून घेतला नि हुकूम केला, 'खालच्या कोर्टाने दावा चालवावा...प्रतिवादी गैरहजर राहिला तरीही चालवावा...'

तथापी, 'प्रतिवादी-मित्र परदेशाहून परतला असूनही कोर्टात हजर का राहू शकत नाही, याची चौकशी प्रथम व्हावी.' अशी भूमिका घेऊन मूळ कोर्टाने हियरिंगला पुढची एक तारीख दिली.

मी वैतागलो. कुणीही वैतागेल की!

आणखी एका नाणावलेल्या वकिलाला गाठले नि सुप्रिम कोर्टाला अर्ज केला, 'मित्राने माझे पैसे परत करण्यास कुठला प्रत्यवाय आहे, याची कारणे दाखविण्यास न्यायमंत्र्यास ऑर्डर करावी...' आम्ही उच्चतम पातळी गाठली.

सुप्रिम कोर्टाने तसा हुकूम काढला.

'मी याबाबतीत काहीच कारणे देऊ शकणार नाही... वादीने रीतसर कोर्टात दाद मागावी...' न्यायमंत्र्याने सुप्रिम कोर्टात सांगितले. न्यायमंत्रीच तो!

मी पुन्हा मूळ कोर्टात दावा उघडला.

'अमुक अमुक कारणाकरिता मला ॲडजर्नमेंट हवीय...' मित्राने विनंती केली. विनंती मानली गेली.

पुढची तारीख पडली. मी आता जाम तापलो. इस्रायलमधल्या सर्वात मोठ्यात मोठ्या वकिलाला पकडले. त्याला सारे महाभारत कथन केले. सविस्तरपणे!

'उत्तम सल्ला देऊ? मित्राला ठोकून काढ...तोच एकमेव मार्ग उरलाय...' 'मोठ्यात मोठ्या' वकिलाने सल्ला दिला.

मी मित्राला बदडून काढले. त्याची हड्डीच नरम केली. कामची आठवण राहील अशी!

मित्राने त्वरित पन्नास पौंड रोखीने परत केले, हे सांगणे नलगे!

तात्पर्य : खरोखर 'चांगल्या नि सुयोग्य' वकिलाचाच सल्ला घ्यावा...हवाच असेल तर हं! ◘

(एक इस्रायली कथा) —चित्तरंजन घोटीकर

# के. नारायण काळे गेले

के. नारायण काळे हे बरेच दिवस माझ्यालेखी केवळ एक नाव होते? मराठी रंगभूमीच्या इतिहासात ‘ नाटचमन्वंतर ’च्या संदर्भात घ्यायचे. हे नाव ताठ मानेने उच्चारल्यानंतरही समोरच्या कोऱ्या नजरा पाहिल्या की पोटात खड्डा पडायचा. रंगभूमी, चित्रपट या दोन्ही क्षेत्रात माणसे नजरेआड झाली की खरोखरच मनाआड होतात का? के. नारायण काळयांचे लेखन मी वाचत असे. ते वाचताना वाटायचे की या माणसाचे नाव केवळ विशिष्ट नाटक, विशिष्ट चित्रपट, विशिष्ट संस्था याला चिकटलेले नाही, महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनात या माणसाच्या विचाराला, संवेदनेला निश्चित स्थान आहे. याच सुमारास विजया मेहता पुण्याला प्रयोग घेऊन गेली की काळयांशी झालेल्या चर्चेचा आदरेखून उल्लेख करायची त्यामुळे त्यांना भेटायची उत्सुकता होती. पण योग आला नाही.

हा योग आला तो अवघा दोन वर्षापूर्वी, ‘ मुंबई मराठी साहित्य संघा ’ने आयोजित केलेल्या हौशी नाटचसंस्थांच्या मेळाव्याच्या निमित्ताने! पहिले सत्र सुरू होण्यापूर्वी संघाच्या कार्यालयात आम्ही अनेकजण बसलो होतो. कोणीतरी माझी ओळख करून दिली. मांसल घडचात खोल रुतलेल्या त्या डोळचात ओळख दिसली. ‘ मी वाचतो तुमचं लेखन, कधीतरी भेटा निवांत.’ मला अगदी परीक्षेची उत्तरपत्रिका देताना शिक्षकाने भेटायला सांगावे तसे वाटले. एवढचात कोणीतरी ‘ सखाराम बाइंडर ’चा विषय काढला, सहज उठवळ अशी चर्चा सुरू झाली. त्यात तत्त्वापेक्षा नावाचेच उल्लेख जास्त होते. काळे शांतपणे कोपऱ्यात बसलेले होते, अतिशय शांत आवाजात ते म्हणाले ‘ यातले तुमचे नित्य काय आणि नैमित्तिक काय तेवढे सांगाल काय ’ साऱ्या उत्तेजित वातावरणावर गार पाण्याचा सपकारा बसला. तिथून उठताना मी मागे राहिले होते. ते हलकेच मला म्हणाले, ‘ अहो हेच चुकते, प्रसंगापुरते बोलून काय उपयोग ? ’ नंतरच्या दोन वर्षात आमच्या अनेक भेटी झाल्या. प्रत्येकवेळी ते मला सांगत राहिले, नाटचविषयक तात्त्विक लिखाण करा. पण आजच्या काळात कुणालाच त्यांचे संथ, तात्त्विक विवेचन ऐकून घ्यायला सवड नव्हती. आज चलती होती चलाख युक्तिवादाची ! असे वाटले होते की निदान रंगमंचावर वावरणाऱ्या माणसांना काळयांच्या विचारांची कदर वाटेल, पण तसेही त्या मेळाव्यात घडले नाही. सूत्रचालनाचे काम करणारी आम्ही मंडळी अस्वस्थ झालो तेव्हा काळयांनीच आमची समजूत काढली. खरे तर अनेकदा प्रवाहाबाहेर पडल्यानंतर वृद्ध माणसे सोबतीसाठी, कोणी दखल घ्यावी यासाठी आसुसलेली असतात. पण काळयांचे तसे कधीच झाले नाही. कारण ते छान रमलेले असत. त्यांच्या वाचनात, चिंतनात, लेखनातही. म्हणून ते तुसडे, एकलकोंडे असतील असाही एक अपसमज त्यांना न ओळखणाऱ्या लोकात होता. पण नानांकडे जाणाऱ्या अनेक तरुण अभ्यासकांचा अनुभव अगदी वेगळा होता. मग तो हौशी रंगमंचावर काही करणारा माधव वझे असो की प्राध्यापकीचा व्यवसाय नव्याने करणारी विद्युत भागवत असो. रंगमंचावर जे काही होत आहे ते डोळसपणाने व्हावे याची ओढ इतकी की कोणी आपल्याकडे विचारायला यावे याचीही वाट ते पाहात नसत. काही वर्षापूर्वी एक मातब्बर संस्था डॉ. लागू व प्रा. तोडरमल यांना घेऊन ‘ ऑथेल्लो ’ पुन्हा करण्याचा नुसता विचार करीत होती तोच के. नारायण काळयांचे ‘ ऑथेल्लो ’ची चर्चा करणारे एक विस्तृत पत्र डॉ. लागूंच्या हाती पडले. ‘ पाहा उपयोग होतो का ’ हा दृष्टिकोन. अशोक केळकर आणि अशोक रानडे हे नानांच्या प्रेमाचे खास विषय होते. त्यांच्याविषयी बोलताना त्यांची नजर मृदु व्हायची. तसेच विजया मेहता आणि डॉ. लागू यांचे काय चालले आहे यावर करडी नजर सतत असे. एकदा नाना विजयावर खूप रागावले. काही लोकांच्या देखत तिला खूप बोलले. त्यानंतर आमची भेट झाली तेव्हा ते विद्ध झाले होते. ‘ नाही. मला तरी तुम्हा मंडळींवर रागावण्याचा काय अधिकार ? ’ खरे तर नानांच्या रागावण्यापेक्षाही त्यांचे असे बोलणे अधिक लागत असे. कारण विजयावर त्यांची अपार माया होती ती अलीकडे फार काही करू शकत नाही, डॉ. लागू बुद्धिमान नट असूनही त्याला आव्हान देणाऱ्या भूमिका नाहीत याविषयी त्यांची कुरकुर सतत चालू असे. बरे कोणी काही नवीन करायला घेतले आणि त्यामागचा हेतू स्पष्ट नसला तरी त्यांना चालत नसे. मागे एकदा मी एका परिसंवादाची पूर्वतयारी करण्यासाठी मदत मागण्यासाठी गेले तेव्हाही पहिला प्रश्न ‘ या विषयावर का परिसंवाद ? ’ मी थोडे सांगितले आराखडा समोर ठेवला, मग अगदी खूश. उत्साहाने चर्चेला सुरुवात केली. बोलता बोलता म्हणाले ‘ खरं तर तुम्ही माझ्यापेक्षाही आमच्या अशोकशी (केळकर) बोला ’ मग दुसऱ्या दिवशी सकाळी चालत तिथपर्यंत यायलाही तयार ! तसेच अगदी परवापरवा ते आजारी असताना मी भेटायला गेले तर पहिला प्रश्न ‘ विजयाने ‘ अजब न्याय वर्तुळाचा ’ का केले ? तुमचे काही बोलणे झाले का ? मला तिच्या नाटचतत्त्वज्ञानाशी हे सुसंगत दिसत नाही. ’

नाना आजारी पडले आणि सारखे त्यांच्या घरी जाणाऱ्या संबंधितांकडून निरोप यायला लागले. तुला बोलावलंय– आठवण काढीत होते. याचसुमारास मी ‘ मराठी नाटक ’ या पुस्तकावर ‘ सत्यकथे ’त प्रतिकूल अभिप्राय लिहिला होता कदाचित ते दुखावले असतील असेही मला वाटत होते. मी नानांकडे गेले. नेहमीप्रमाणे चिरुटाचा सरंजाम समोर घेऊन नाना बैठकीच्या खोलीत बसले नव्हते; लिंबाऱ्या पातळ चकत्यांबरोबर येणारा स्वादिष्ट चहाही नव्हता. नेहमी निवांत असणाऱ्या त्या घरात एक विचित्र शांतता होती. मी वर नानांच्या खोलीत गेले– नाना अंथरुणावर दिसतच नव्हते. दिसत होते

फिक्कट अशक्त हातानी कसेबसे पेललेले एक अवजड पुस्तक! थोडावेळ बसणार असे सांगत मी बसले. "नाना"– माझ्या हाकेला नकळत भयाचा स्पर्श झाला होता. "अरे वा –या वाट पाहात होतो. तुमचं परीक्षण मला आवडलं– विशेषतः इतिहास कसा लिहिला जावा याविषयीच्या सूचना..."

'नाना– मला वाटत होतं तुम्ही रागावला असाल.'

'नाही अहो राग कशाचा– पुस्तक वाईट होतंय मला पण कळत होतं– पण लोक... मोठेमोठे लोकही फार थिल्लरपणा करतात.'

मला आसपासच्या नजरांवरून कळत होते की नाना फार बोलताहेत - तेव्हा आपण निघावे– मी चुळबूळ करू लागले.

'हे पाहा– मी सगळ्यांशी बोलत नाही पण तुम्हाला काही सांगायचंय...'

त्या विश्वासानेही मला दाटून आले होते– मी लहान मुलाची समजूत घालावी तसे म्हटले– 'मी पुन्हा निवांत येईन– तुम्हाला जरा बरं वाटल्यावर...'

तरी मला थांबवून ते निकराने सांगत राहिले– आम्ही 'नाटचमन्वंतर'च्या काळात केल्या त्या चुका करू नका– विचार लख्ख करून घ्या– निदान प्रायोगिक रंगमंचापुरता तरी–'

ते मला सारखे माझ्या लेखनाविषयी सूचना करीत होते– मी नजरेआड झाल्याशिवाय ते स्वस्थ होणार नाहीत म्हणून मी तिथून उठले ती पुन्हा निवांत येईन या कबूलीवर पण प्रत्यक्षात पुन्हा जाणे घडलेच नाही– त्यांना जे सांगायचे होते ते त्यांच्यापाशी राहिले. माझ्यापाशी फक्त दोन वर्षातल्या काही भेटींच्या आठवणी– गतवर्षीच्या संक्रातीला आलेले एक मायाळू पत्र आणि खांद्यावरून कोणीतरी आपल्या लिखाणावरून सक्त नजर ठेवते आहे अशी जबाबदारीची जाणीव.

आज मी पुण्याला गेले नाही– आज जाऊन काय करायचं? नानांकडे जावयाचं ते चर्चा करायला, त्यांच्या कपाटात लपवलेली रंगभूमीवरची नव्यातनवी पुस्तकं पाहायला. त्यांचं क्वचित् लाभणारं कौतुक ऐकायला. आपआपल्या काळात कर्तृत्व गाजवून मालवणारी अनेक मोठी माणसे होतात; पण आपल्या काळाच्याही पलिकडे जाऊन आपला छंद हाच व्यासंग करणारी नानांसारखी माणसं सहसा भेटत नाहीत. ते स्वतःत असत आणि तरी साऱ्यांशी संपर्क राखून असत. नानांसारख्या एखाद्या व्यक्तीचा व्यासंगासाठी व्यासंग पाहिला की आपल्या मनालाच दहशत वाटते. त्याबरोबरच आज आपल्याला हवा असणारा शिक्षक भेटला तेव्हा फार उशीर झाला होता ही खंत काही केल्या जात नाही.

–पुष्पा भावे

---

# आयुर्वेद कॉलेज संप : पृष्ठ ११ वरून

टिळक कॉलेजमधील आयुर्वेदविरोधी असणाऱ्या ॲलोपॅथी गटाच्या डॉक्टरांची विद्यार्थ्यांना फूस आहे. काही भ्रष्टाचारी डॉक्टर मंडळीही विद्यार्थ्यांना भडकवितात व महापौरांच्या कानी लागून महानगरपालिकेने हे हॉस्पिटल ताब्यात घ्यावे अशा खटपटीत आहेत असेही त्यांचे म्हणणे. अमेरिकेतून हे शिक्षण घ्यावयास एक विद्यार्थी येणार असल्याचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला. नवा अभ्यासक्रम घिसाडघाईने सुरू झाला. लॅबोरेटरीज नाहीत. पाठचपुस्तके नाहीत. अनेक शिक्षणसंस्थांतून अनागोंदी आहे. विद्यार्थी हिताला प्राधान्य नाही. हे सर्व त्यांना तत्त्वतः मान्य दिसले. मग आपणच विद्यार्थ्यांबरोबर उपोषणाला का नाही बसत? माझा प्रश्न. त्यावर संपाने काही साधणार नाही. मागच्या इतिहासाचीच पुनरावृत्ती होईल या भीतीने चळवळ थांबविण्याचा प्रेमळ सल्ला ते देतात. प्राचार्यपदाच्या स्वाभाविक मर्यादांमुळे होणारी अडचण मी समजू शकतो. परंतु संस्कृतीप्रेमाने पुनरुज्जीवनवाद लादणे कदापी मंजूर होण्यासारखे नाही. तसेच त्यांचे लेखातील 'लोकशाही तत्त्वाने शिक्षणक्षेत्रातील प्रश्न सुटणार नाहीत' या विधानाचीही दखल घेणे आवश्यक वाटते.

कुठल्याही शास्त्राला कालाच्या अगर भौगोलीक सीमा नसतात. अमेरिकेतले, रशियातील व भारतातील रसायनशास्त्र वेगवेगळे असत नाही. तद्वत आरोग्यशास्त्रालाही शास्त्र म्हणून भौगोलीक सीमा नाहीत. शास्त्राचा निस्सीम उपासक दुराभिमानीही असत नाही. कारण वैद्यकीय दृष्टिकोनातच नवीन प्रयोगांनी सिद्ध होणारे नवे नियम व जुन्यांची दुरुस्ती पचविण्याची सहिष्णुता असते. अधुनिक ॲलोपॅथीने लावलेले सर्व शोध आमच्या महाभारतात पूर्वीच लिहिले आहेत असे म्हणून स्वस्थ बसणे हे भाबडेपणाचेच नव्हे तर मूर्खपणाचे लक्षण आहे. जे केवळ भूतकाळात रममाण होतात व वर्तमानात क्रियाशून्य बनतात त्यांचा भविष्यकाळ निश्चितच अंधःकारमय असतो. पुराणातला त्रिशंकू हा पहिला अंतराळवीर असेल अगर नसेलही. परंतु अवकाश विज्ञानतंत्रात इतर देशांच्या बरोबर प्रगती साधावयाची असेल तर त्यासाठी शास्त्रीय पद्धतींची कासच धरावी लागेल. सदाशिव पेठेत होमहवनादी कृत्ये करून व त्रिशंकूच्या गोष्टी सांगून ते साधणार नाही. निरनिराळ्या पॅथीतील अशास्त्रीय गोष्टींना फाटा देऊन सर्व ज्ञात शास्त्रीय सत्यांचा समावेश करून नवीन आरोग्यशास्त्र तयार करणे कठीण बिलकुल नाही. चीनसारख्या देशांनी हे प्रयोग यशस्वीरीत्या केलेही आहेत. जनतेच्या आरोग्याची पर्वा असेल तर लोकहितार्थ अशा स्वरूपाचे धोरण राबवणे आवश्यक आहे. मात्र हरेक पॅथीच्या दुराभिमानी बुजुर्गांना न भिता हे कठोरपणे करावे लागेल. ती हिम्मत बोटचेप्या शासनाकडून अपेक्षिणे मूढतेचेच लक्षण आहे. परंतु चळवळीचा विद्यार्थ्यांचे क्षात्रतेज कायम टिकले व लढ्याला योग्य दिशा लाभली तर सत्याचा विजय होतो व धोरणविषयक बदल, सुरुवातीला अशक्य वाटले तरी घडून येतात हा आजवरचा अनुभव आहे. साम-दाम-दंड भेदादी मार्गाने लढा फुटला व विद्यार्थ्यांचे नीतिधैर्य खचले. तर मात्र सायलेन्स झोन. अन्य पर्याय नाही.

□ □

**मध्यंतर**

# जंगली कबूतर

## नटेश्वरचे पहिले नाटक

वसू भगत या नाटककाराचे नाव सर्वसाधारण प्रेक्षकास फारसे ओळखीचे वाटणारे नाही. कारण 'वासवदत्ता' हे त्यांचे नाटक मोठ्या दिमाखाने रंगमंचावर येऊनही, दिग्दर्शिका मीना पेठे यांच्या अपमृत्यूमुळे, तग धरू शकले नव्हते. त्यानंतरही भगत यांनी हौशी संस्थांसाठी संस्कृत-इंग्रजी, नाटकांची रूपांतरे केली होती–परंतु व्यावसायिक रंगमंचावर त्यांचे नाटक पुन्हा आले नव्हते. 'जंगली कबूतर' हे त्यांचे नवे नाटक 'नटेश्वर' या नव्या संस्थेने व्यावसायिक रंगमंचावर आणले. संस्था नवीन असली तरी दिग्दर्शक कमलाकर सारंग आणि लालन सारंग, सरला येवलेकर, निळू फुले हा नटवर्ग प्रेक्षकांना परिचित आहे.

'जंगली कबूतर' या नावात संस्कृतीपासून दूर असणाऱ्या एखाद्या व्यक्तीचा सुसंस्कृत (अथवा तथाकथित सुसंस्कृत) वातावरणाशी आलेला संपर्क सूचित होत होता. प्रत्यक्षात नाटकाला प्रारंभ होतो तो सुखवस्तू घरात विमनस्कपणे बसलेल्या एका मध्यमवयीन स्त्रीपाशी–पलीकडे घरात त्या स्त्रीचेच तरुणपणचे एक टवटवीत छायाचित्र टांगलेले आहे. (या छायाचित्रातील पोषाखावरूनच ते चित्रपटातील आहे हे स्पष्ट आहे.) एका छायाचित्राच्या आधारे दिग्दर्शकाने व नेपथ्यकाराने त्या स्त्रीच्या भूतकालाच्या एका स्वरूपाशी प्रेक्षकांचे नाते जोडले आहे. तर तिला अगत्याने चहा आणू का असे विचारणारा मुलगा तिच्या वर्तमानाचे रूप उभे करतो. या मुलाच्या होस्टेलमध्ये राहण्याचा उल्लेख, त्याने तिची सेवा करणे, यातून ती स्त्री आपल्या प्रदर्शनीय व्यवसायापासून अलिप्त होऊन माता म्हणून जगायला तयार नाही हेही कळते. पहिल्या अंकातील तिचे फोनवरील संभाषणही तिच्या वर्तमानकालीन व्यवसायाचे स्वरूप स्पष्ट करायला मदत करते. या पार्श्वभूमीवर देशभक्ताच्या वेषात येणारा 'किसन अंकल' त्या प्रौढेला जुन्या नावाने हाक मारतो. त्या नावाच्या स्वरूपावरूनच आज जरी ती अशा घरात अशा वस्तीत राहत असली तरी तिची मुले बकालवस्तीतील आहेत आणि ते तिला विसरायचे आहे, आपल्या मुलांपासून लपवायचे आहे हे लक्षात येते. एरवी ताठ असणारी बाई या माणसापुढे गरीब होते. तो मागेल ते पैसे देते. किसनअंकल आणि बाई यांच्या संवादातून बाईंची मुलगी दूर कुठेतरी मोठी होते आहे, तिच्या आठवणीने बाई विद्ध झाल्या आहेत, हेही कळतं. तिला आपल्या घरी आणले तर काय होईल या विचारात ती गर्क आहे. या अस्वस्थ मनस्थितीत ती असतानाच तिचा एक मध्यमवयीन मित्र येतो. त्या दोघांच्या संभाषणातून बाईच्या व्यवसायाचे स्वरूप स्पष्ट होते. विविध उद्योगपतींकडून मोठमोठी कामे मिळविण्यासाठी 'बाई'चा उपयोग तिचे मित्र करतात आणि तिला आपल्या कमाईचा अंशही देतात. पण आता बाई उताराला लागली आहे त्यामुळे तिने केलेल्या अनुरंजनाचा फारसा उपयोग होत नाही अशी तिच्या व्यवसायबंधूंची तक्रार आहे. एखादी तरूण मुलगी ठेव अशी सूचना आहे. इथे बाई भडकून उठतात. त्यांच्या तारुण्याच्या रूपाचा अपमान झाला म्हणून आणि आपल्याला आपल्या सहकाऱ्याने एखादी हलक्यादर्जाची कोठीवाली समजावे म्हणून! ही चीड हे दुःख विसरण्यासाठी ती खूप मद्य घेते त्या बेभान अवस्थेत मोहनचा (मुलाचा) मित्र पंडित येतो तो तिच्या अवताराने घाबरलेला आहे, इतक्यात पाठीमागे एक परकर-पोलका घातलेली कोवळ्या चेहऱ्याची व रासवट आविर्भावांची एक मुलगी येते. ती आपण बाईंची मुलगी असल्याचे जाहीर करते आणि पहिल्या अंकाचा पडदा खाली येतो. म्हणजे किसनअंकलने केलेले बाईंच्या मुलीचे, 'सोना'चे–वर्णन, तिच्या हुशारीची-अभ्यासाची हकिगत सारे खोटेच असते. ती इतक्या लहान वयात निर्ढावलेली वेश्या झालेली असते. तिथून पळून ती आपल्या श्रीमंत आईकडे येते. ती आईसुद्धा वेगळ्या पद्धतीने वेश्या व्यवसायच करते आहे. फक्त सभ्यतेच्या बुरख्याआड अशी आई आणि अशी बहीण यांच्यासमोर मोहनः एक साधा हळवा वाटणारा कॉलेजकुमार आणि त्याचा गरीब पापभीरू मित्र पंडित हे उभे आहेत. म्हणजेच नाटकाच्या पहिल्या अंकावरून त्या नाटकाच्या विकासाविषयी काही अपेक्षा बाळगायला हरकत नव्हती. पण प्रत्यक्षात मात्र वेगळेच घडते. नाटककाराने आपले सारे लक्ष हुलकावणीच्या खेळावर केंद्रित केले आहे. प्रेक्षकांच्या अपेक्षा एका दिशेला न्यायच्या, मग त्याला हुलकावणी द्यायची हे नाटकात अनेक वेळा घडते. पण त्यामुळेच विविध व्यक्तींतील, परिस्थितीच्या उपरोधातील ताण कथाबीजात असूनही वाया गेले. वर वर पाहता नाटकाची बांधणी फार नीटस वाटते. पण खरे पाहता व्यक्तिरेखा आणि सामूहिक अनुभव दोन्ही अर्थाने नाटककाराने कथाबीज फारसे उमलू दिलेले नाही. विशेषतः सोनाची व्यक्तिरेखा उभी करताना, ती कामाठीपुऱ्यात लहानाची मोठी झाली आहे, या विशेषाच्या काहीशा उथळ अशा दर्शनापलीकडे लेखक, दिग्दर्शक व सरला येवलेकर (सोना) यांनी लक्ष पुरवलेले नाही. बाकी कथारचनेत दुवे पक्के आणि चलाखपणे जोडलेले आहेत. बाईच्या व्यवसायमित्राने मुली ठेवण्याचा उल्लेख करणे–बाईने चिडून मला हलकी कोठीवाली समजतोस काय असे म्हणणे–बाईंची मुलगीच अशा कोठीवालीकडून इकडे येणे–तिला पाहताच बाईने आपले म्हणणे ऐकले असे मित्राला वाटणे हे चक्र अथवा बाईला बक्षिस मिळालेल्या हिऱ्याच्या हाराचा उल्लेख–तो हार सोनाने लग्न ठरल्यानंतर घालणे–बाईने (त्या हाराशी संबंधित वाईट आठवणीमुळे) तो काढून टाक म्हणणे–आपला कशावर अधिकार नाही या कल्पनेने चिडून पैशाच्या मोहाने सोनाने एका बड्या 'पार्टी'कडे जायला तयार होणे–बाईने स्वतःच आपल्या मुलीला ठार मारणे (तिला पुढच्या यातनापासून मुक्त करणे) हाही प्रसंगसंबंध

चातुर्याने रचला आहे. परंतु बाई–सोना–मोहन यांचे संबंध दुर्लक्षित राहिल्यामुळे सोना, मोहनच्या व्यक्तिरेखा अधांतरी राहतात. वसू भगतांचे संवादलेखनही व्यक्तित्त्व अभिव्यक्त करू शकत नाही–फक्त कथन करते.

या मर्यादित नाटयसंहितेचे दिग्दर्शन मात्र कमलाकर सारंग यांनी परिश्रमपूर्वक आणि चोख केले आहे. त्यामुळे प्रयोग सुबक होतो. लालन सारंग यांनी प्रदर्शनीय व्यवसायातील अडाणी वस्तीतून आलेल्या स्त्रीचा म्हणून जो एक कृत्रिम स्वर या नाटकात स्वीकारला आहे तो सर्वत्र सारखा रहात नाही. त्यामुळे एक स्वतंत्र उच्चारशैली निर्माण न होता त्या उच्चारातील दोषच खटकत रहातात. दुसऱ्या तिसऱ्या अंकातील 'मम्मी'ची मनःस्थिती लालन सारंग यांनी संयतपणे पण नेमकी व्यक्त केली. नेहमी त्या एखाद्या भूमिकेत स्वतःला झोकून देतात तसे मात्र या नाटकात झाले नव्हते. एक कलावंत म्हणून त्या सतत चाचपडत होत्या असे वाटले. मोहनची भूमिका लेखनातच कच्ची असल्यामुळे अच्युत देशिंगकर या तरुण नटालाही पुरेसा वाव मिळाला नाही. निळू फुले यांनी पहिल्या अंकातला 'किसन अंकल' आणि दुसऱ्या तिसऱ्या अंकातला 'किसनदादा' ही दोन्ही रूपे त्यातला फरक आणि संबंध या दोन्ही अंगांनी चांगली रंगवली. विशेषतः पहिल्या अंकातील मऊ सुरातल्या धमक्या (Black-mailing) त्यांनी चांगले पोचवले. सोनाचे–जंगली कबुतराचे काम सरला येवलेकर यांनी व्यवस्थित, प्रेक्षकांवर नजर ठेवून, टाळ्या घेत केले. पण खरे तर त्यात अभिनयापेक्षा एका कामाठीपुऱ्यातील वेश्येची नक्कल हा भाग बराच होता–जो नाटककार व दिग्दर्शक या दोघांनीही वाजवीपेक्षा जास्त वापरला असे मला वाटते. नारायण पै व कमलाकर सारंग यांनी आपली छोटी कामे या पूरक भूमिका आहेत याचे भान राखून केली.

सखाराम भावे यांचे नेपथ्य आणि सजावटीत बाईसाठी वापरलेली झोपाळाशैलीतील वेताची खुर्ची दोन्ही केवळ प्रेक्षणीय नाही तर नाटयानुकूल होते.

–पुष्पा भावे

# खोटं नाटकचा स्मरणीय प्रयोग

## कलोपासक : फेब्रुवारी

कलोपासकांनी फेब्रुवारी महिन्यात वृंदावन दंडवते यांची 'खोटं नाटक' ही एकांकिका सादर केली.

या एकांकिकेचे स्वरूप रूढ लेखन पद्धतीपेक्षा सर्वथा भिन्न आहे. दृश्य आणि ध्वनी यांच्या मिश्रणातून सिद्ध झालेला हा नाटयप्रकार आहे. यामध्ये गुणगुणणे, आरडाओरड, कोरस, वेगवेगळे आवाज आहेत. अगदी अल्प प्रमाणात शब्दांचा वापर आहे. मिताक्षरी स्वरूपाचा असलेला हा प्रकार एका अर्थी मूकनाटयालाच जवळचा आहे.

मुंबईसारख्या यंत्रयुगातील असलेल्या शहरातील समूह जीवनाचे दर्शन घडवण्याचा एक प्रयत्न. त्यातही परिस्थितीच्या एका आवर्तात फिरण्याने समूह जीवनाला आलेले बधीरपण, निरर्थकपण व्यक्तवण्याचा प्रयत्न आहे. समूह जीवनात व्यक्तिजीवनाची होत असलेली होलपट, व्यक्तिगत जीवनाचा पृथक्पणे शोध घेण्याचा केविलवाणा चाललेला प्रयत्न आहे. समूह जीवनात हरवलेले, हेलपाटलेले जीवन दर्शविण्यासाठी काही प्रसंगांची निवड आहे. भातुकली पद्धतीचा संसार, मुंजीला जाणे, काश्मीरची सहल, अपघात, रेल्वे फलाटावरील धावपळीचे जीवन, बागेतील प्रेम इत्यादी. ह्या साऱ्या प्रसंगामध्ये दर्शनी विसंवाद वाटत असला तरी त्यामध्ये एक प्रकारचे आंतरिक सुसंवादीपण आहे. त्या प्रसंगांना मानवी जीवनाचे प्रतिनिधित्व करण्याचे बळ आहे. त्यामुळे या प्रसंगातून खोटे वाटणारे नाटक हे खरेखुरे जीवन नाटय आहे. व्यक्तिजीवनाचा आणि समूह जीवनाचा तोच तोचपणा, यांत्रिकपणा आणि त्यातून अनुभवाला येणारे निरर्थकत्व हे प्रत्ययकारी आहे. ध्वनींच्या कोलाहलात हरवून बसलेले माणसाचे अस्तित्त्व लक्षवेधी आहे. आशयाच्या दृष्टीने आणखीही काही वेगळा अन्वर्थ लावता येईल. तसा तो बहुविध पद्धतीने लावता येणे हे कलाकृतीचे मोठेपण आहे.

या एकांकिकेचे दिग्दर्शन माधव वझे यांनी केले होते. एकांकिकेचे प्रकटीकरण ध्वनी आणि दृश्य यांच्या माध्यमाद्वारा करायचे आहे. याचे भान त्यांनी राखलेले होते. अशा प्रकारची नाटयनिर्मिती ही मुक्त निर्मिती (Improvisation) असते, याचे अवधान त्यांना होते. लेखक मित शब्दात काही सूचना करतो. अभिनयाद्वारा ते विस्ताराने प्रगट करावयाचे असते, हे ध्यानात घेऊनच त्यांनी एकांकिकेतील समूहाच्या विविध विरचना केल्या होत्या. मुक्तनिर्मितीतील हालचालींना प्रतिकात्मक अर्थ लाभलेला असतो. त्या हालचाली लयबद्ध-तालबद्ध असतात. अर्थातच नृत्याला त्या अधिक जवळच्या असतात. विशिष्ट हेतू मनात बाळगून अस्वाभाविक वाटणाऱ्या हालचाली नृत्याप्रमाणेच अवकाशाच्या पोकळीत आकृतिबंध तयार करीत असतात. ते आकृतिबंध आपल्यासमोर साकारले जात असताना त्यातून मानवी विचार भावनांच्या तीव्र प्रतिक्रिया प्रगट होत असतात. या प्रकारचा सारा अनुभव या एकांकिका प्रयोग-दर्शनातून प्रत्ययकारकतेने आला. समूहाच्या विरचनेतील लवचिकता आणि सहजता ही अंगभूत वैशिष्टये दिग्दर्शकाने जाणतेपणाने हेरलेली होती. संपूर्ण प्रयोगातून ती अनुभवाला येत होती. विशेषतः प्रारंभीची दोर खेचण्याची, अपघाताची, झाड-प्रेम, तसेच अखेरच्या प्रसंगी व्यक्तीवर समूह जीवनाने लादलेले परंपरेचे ओझे इ. विरचना संस्मरणीय होत्या. त्या पाहात असताना 'गोची' 'अनुष्ठान', पुनश्च हरि ॐ' इत्यादी नाटकांचे स्मरण जरी झाले तरी त्यांचे अनुकरण या एकांकिकेत नव्हते हे जाणवण्याइतके वेगळेपण आणि ताजेपण यामध्ये होते. मुक्त निर्मितीसाठी रंगमंचाचा वापरही मुक्तपणाने केलेला होता. कोणत्याही प्रकारे बंदिस्त स्वरूप नव्हते. रंगमंच खुला-उघडा होता. त्याच्या दोन्ही बाजूला प्रेक्षक बसलेले होते. प्रेक्षकातून पात्रांचे वावरणे सहजपणाने होते. (इतक्या मुक्तपणाने केलेल्या अभिनय दर्शनाला पांढऱ्या फक्कीने आखलेल्या दोन चौकोनांची काहीच आवश्यकता नव्हती.) जवळ-जवळ वीसएक पात्रांनी एकत्रित येऊन अभिनयातील संघवृत्तीचा एक वस्तुपाठच दाखवला.

एरवी रंगमंचावर अवघडपणे उभे राहून आपल्या हातापायांच्या हालचालींचे नेमके काय करायचे असा प्रश्न ज्या कलाकारांना सतावतो त्यांना मुक्त नाटयनिर्मिती हे एक

आव्हानच असते. यामध्ये अभिनय दर्शनासाठी सर्व शरीरांगाचा वापर करावा लागतो. तो वापर जितका स्वाभाविक किंवा सहजस्फूर्त होईल तितका त्याचा परिणामही उत्कट होईल. या एकांकिकेतील साऱ्याच कलावंतांनी तो उत्कट परिणाम सहजतेने घडवण्याचा प्रयत्न केला. त्याचे बरेचसे श्रेय दिग्दर्शकाला जाते. कारण मुक्त नाट्यनिर्मितीत त्याच्याच कल्पना शक्तीला आव्हान असते. खरे तर ते नाटक दिग्दर्शकाचेच असते. माधव वझे यांनी ते आव्हान पेलले. कलात्मदृष्टचा सतत नवे आणि वेगळे व्यक्त करण्यासाठी धडपडणारा हा दिग्दर्शक आहे. 'काळोख' 'ओळख', 'सामना' अशा काही आव्हानात्मक एकांकिकांचे प्रयोगदर्शन त्यांनी आत्तापर्यंत कलात्म जाणीवेने घडवलेले आहे. 'राजा नावाचा गुलाम', 'प्रेषित' या दोन मोठ्या नाटकांच्या दिग्दर्शनाने त्यांनी आपले कलागुण सिद्ध केले आहेत. यशोनंदाच्या आवर्तात न अडकता कोंडी फोडण्याच्या वृत्तीतूनच 'खोटं नाटक'चा प्रयोग ते समर्थपणाने सादर करू शकले.

कलोपासकांच्या 'प्रयोग' उपक्रमात खऱ्या अर्थाने हाच प्रयोग लक्षवेधी ठरला. त्या खालोखाल 'गुलाबछकडीचा फार्स' आणि 'सामना' यांचा उल्लेख करता येईल. आशय आणि प्रयोगरीती या दोन्ही दृष्टीने 'खोटं नाटक'चा प्रयोग महत्त्वाचा वाटतो. शब्दवंबाळ असलेली किंवा शब्दांच्या भाराने आशयाला झाकोळणारी नाटके पाहण्याची सवय लागलेल्या प्रेक्षकाला मुक्त नाट्यनिर्मितीचा हा प्रकार आकलनाच्या आणि आस्वादनाच्या दृष्टीने काहीसा अवघड जाण्याची शक्यता आहे. कारण ध्वनी आणि दृश्य यांच्या माध्यमातून नाट्यलेखन करण्याची सवय मराठी नाटकात एकूणातच कमी. मध्यंतरी मुंबईला 'काबुकी' नामक जपानी नाट्यप्रकार सादर झाला. त्यामध्ये नटाने उच्चारलेल्या शब्दांच्या अर्थापेक्षा ध्वनीला अधिक महत्त्व होते, असे ऐकले. अशा भिन्न प्रकारची नाटके पाहण्याची सवय प्रेक्षकांना झाली तर नवीन नाट्यशैलीपासून विन्मुख होण्याची त्यांची वृत्ती कमी होईल. अशाप्रकारचे नवनवीन नाट्यप्रकार प्रयोगाद्वारा समजावून घेणे एवढा एकच उपाय आहे! एक वेगळा आणि चांगला 'प्रयोग' सादर केल्याबद्दल कलोपासकांचे अभिनंदन.

—वि. भा. देशपांडे

---

# गाड्या जेव्हा अडवल्या जातात....

## मुक्काम आंबेजोगाई

१९ फेब्रुआरीची रात्र. १० वाजलेले. स्थळ अंबेजोगाई.

उद्या शिवरात्र. म्हणजे परळी खच्चून भरणार. परळी वैजनाथ... बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक. अंबेजोगाईहून अवघ्या पंधरा मैलावर. गेल्या कित्येक वर्षांची ही प्रथा आहे की शिवरात्रीच्या दिवशी अंव्यातल्या आम जनतेने परळीला जाण्यासाठी धडपडायचे. मग दोन दिवस बसस्थानकावर ही ऽऽ गर्दी. बैलगाड्या भरलेल्या. सायकलवरून जाणारे वीरही बरेच. या साऱ्या यात्रेकरूत रुबाव नि थाट असायचा सरकारी अधिकाऱ्यांचा. सरकारी गाडी ही आपलीच मालमत्ता आहे असे समजून, मुले-बाळे, शेजारी-पाजारी यांनी खच्चून भरलेल्या जीप्स परळीच्या दिशेने दिवसभर धावायच्या. समोर साहेब, शेजारी रुबाबात मालकीणबाई आणि मागे चिल्लर कंपनी. यंदाही हेच घडले असते आणि घडणारही होते.

परंतु राष्ट्रसेवादलाच्या सैनिकांच्या आणि समाजवादी पक्षाच्या तरुणांच्या मनात आले... आज पेट्रोल महागले आहे. अशा स्थितीत सरकारी गाड्यामधून हा 'सहकुटुंब' 'पुण्यदौरा' करू द्यावा का? या पेट्रोल महागाईच्या काळात सरकारी जीप्स आणि सरकारी पैसा खाजगी कारणासाठी राबवला जावा? निर्णय ठरला. उद्याची मोहीम सरकारी गाड्या अडविण्याची. कोणतेही आंदोलन शिस्तशीर रीतीने पार पाडण्याची येथील तरुणांची रीत आहे. गेल्या दोन आठवड्यापूर्वीजाच कार्यक्रम पहाना!...

'गाढवायन' प्रकरणातील सरकारी अधिकारी श्री. चतर्जी, यांच्या आरोपांची चौकशी करण्याऐवजी नगराध्यक्ष बुरांडे, डॉ. लोहिया, ज्ञानेश रेड्डी व नरहरी कचरे यांना कस्टडीत कोंडण्यात आले.

कुणाशी बोलायचे नाही की भेटायचे नाही. ६×२ ची खोली. सोबतीला एक दरोडेखोर. लघवीचा कुबट वास. तो दूर व्हावा म्हणून उदबत्त्या वा डांबरगोळ्या मागितल्या. उत्तर नकारार्थी. वर्तमानपत्र वाचायला मागितले, पुन्हा नकार. तहान लागली? पाणी देण्यास नकार. लघवीला जायचे? त्या खोलीतच कार्यक्रम उरका.

म्हणजे जनतेची फसवणूक करू पाहणारा बाहेर आणि त्याच्या लबाड्या उघडकीस आणणारे कस्टडीत. या प्रकारांनी तरुण विद्यार्थी चिडले आणि निषेध म्हणून पोलीस खात्याला एक 'नजराणा' अर्पण केला.

आता नजराणा...

शेणाची टोपली, भाकरी, दारूच्या रिकाम्या बाटल्या, कोंबड्यांची पिसे इत्यादी. प्रेक्षक जवळ जवळ ७ हजार आणि वऱ्हाडी २ हजार. तरीही मोर्चा शांत.

पोलीस स्टेशन बाहेर जय्यत तयारी. लाठ्या, अश्रूधूर वगैरेची. पण ही तयारी वाया गेली. अनुचित प्रकार न घडता हा 'नजराणा' कार्यक्रम आधी जाहीर केल्याप्रमाणे पार पडला.

तर काय, कोणताही लढाऊ कार्यक्रम पोलिसांना 'वाव' न देता पार पाडण्याची इथली रीत. त्या रीतीनुसार शिवरात्रीच्या दिवशी सकाळपासून सरकारी गाड्या अडविण्याचा कार्यक्रम सुरू होतो.

परळीनाक्यापाशी पंधरावीस तरुण गाड्याची वाट पाहत उभे.

गाड्या येतात, अडवल्या जातात. तरुण प्रश्न विचारतात. गाडी सरकारी नसल्याची वा खरोखरच दौऱ्यावर असल्याची खात्री करून घेऊन पुढे सोडली जाते.

अंबेजोगाईच्या पंचायत समितीची गाडी (नं. MHZ 578) गाडीत मुले-स्त्रिया आदि पब्लिक भरलेले. गाडी अडविली जाताच साहेब रागावतात. पोलीस बोलविण्याची नेहमीची धमकी वगैरे दिली जाते. फोन केला जातो, तहसीलदाराकडे तक्रार होते. काय उत्तर मिळालेले असते ते तेच जाणे. पण एवढे खरे की गाडी परत फिरते.

आणखी एक गाडी M. S. E. B.ची गाडीत पत्नी, मुले.

'आम्ही ऑनड्यूटीवर आहोत.' अधिकारी.

'आपल्या पत्नीही ड्यूटीवर आहेत काय?' एक आवाज. मग वातावरण जरा गरम.

'लॉक-बुक कुठे आहे?' दुसरा प्रश्न.

'मी साताराकडचा आहे. एकेकाला मातीत लोळवीन.' अधिकारी. अर्थात ही भाषा अधिकाराला न शोभणारी वगैरे वगैरे.

अंबेजोगाई येथील पशुसंवर्धन खात्याची No. (B.Y.H 3384) गाडी. आत कुटुंब-परिवार.

'तुम्ही कोण मला अडवणार? दर तीन दिवसांनी जात असतो मी. गाडी अडवायला लाज वाटायला हवी तुम्हाला.'

मुले चिडतात.

'आपण सरकारचे पेट्रोल खाजगी कामासाठी वापरता. या बद्दल आम्ही विरोध केला तर आमचीच लाज काढता? खरं तर आमची 'लाज' काढायची तुम्हाला 'लाज' वाटायला हवी,

'मला काम आहे परळीला.'

'आपल्या कुटुंबाला टांग्यातून स्टँडवर वा घरी पाठवा. ही गाडी त्यांच्यालाठी नाही.' शेवटी कुटुंब टांग्यातून घरी आणि साहेब ड्यूटीवर.

बीडच्या जिल्हापरिषदेची (M. H. A. 414) एक गाडी. अर्थात सहकुटुंब. तरुणांच्या विनंतीला मान देऊन मंडळींना दुसऱ्या खाजगी गाडीतून पाठविले जाते व साहेब धरणाची पहाणी करण्याकरिता रवाना होतात.

असिस्टंट कमिशनर जोशी यांची खाजगी गाडी. कॅप्टन अशोक पाटील यांचीही गाडी. सार्वजनिक भ्रष्टाचाराविरुद्ध उभ्या असलेल्या या तरुणांचे दोघांकडून हार्दिक कौतुक होते.

जिल्हा-परिषदेच्या कृषिविभाग प्रमुखांची गाडीही अडवली जाते. गेले दोन दिवस ते दौऱ्यावर आहेत व दौरा पूर्वनियोजित आहे याची खात्री पटल्यावर गाडी पुढे जाते. या आगळ्या-वेगळ्या 'अडवणुकी'चे मनमोकळे कौतुक करण्यास ते विसरत नाहीत.

पूर्ण दिवसभर शांततेने चाललेल्या या कार्यक्रमाची सांगता होते तहसीलदार पवार यांची जीप अडवून! श्री. पवार हे कार्यक्षम अधिकारी आहेत. आणि तरुणांच्या भावना समजून घेणारे आहेत. मुलांच्या कृतीबद्दल सहानुभूती म्हणून त्यांनी आपल्या कुटुंबाला खाजगी गाडीतून परळीला पाठविलेले असते.

मझाही या पूजापाठावर तसा विश्वास नाही. पण तहसीलदाराच्या हातून पूजा होण्याची प्रथा आहे. जायला हवे अशी समजूत घालण्याचा प्रयत्न होतो. परंतु 'सेक्युलर' राष्ट्रात सरकारी जीपमधून, सरकारी पैसा वापरून अधिकाऱ्याने महापूजा करण्यास जावे हेच तरुणांना अमान्य असते. सरकारी पेट्रोल वापरू परळीस जाऊ देणार नाही असा हट्ट धरला जातो. शेवटी मित्राच्या मोटारसायकलवरून तहसीलदारसाहेब परळीस रवाना होतात.

गंमत अशी की, ही 'अडवाअडवी' सुरू असतानाच दुसऱ्या काही कामासाठी आलेले डी. आय. जी. चौबळ हा उपक्रम दुरून बघून जातात.

गावातील सुशिक्षित, प्राध्यापक, डॉक्टर्स, वकील व सामान्य जनता, सर्वजण कार्यक्रमावर खूश आहेत. या तरुणांचे सार्वत्रिक कौतुक केले जात आहे.

अशा कार्यक्रमांच्या वेळी सतत पुढे असणाऱ्या तरुणांच्या पोटाकडेही काहींचे लक्ष गेले आहे.

'अशा मूलतः विधायक कार्यासाठी काही फंड गोळा करायला हवा.' अशीही जाणीव उत्स्फूर्तपणे बोलून दाखविली जात आहे.

'रेड्डी, बेटया तुला नि हवीवला कोणी नोकरी देणार नाही. साऱ्या अधिकाऱ्यांच्या बायका तुम्हाला शिव्या देत असतील आज!' अशीही चेष्टा होत आहे.

'इथे एकदा लातूर झाले पाहिजे. चार-दोन मरतील तेव्हा गप्प बसतील!' अशीही आतल्या गोटातली चर्चा.

...ही उपक्रमशील तरुण मंडळी जे कार्यक्रम हाती घेतात त्या मागे हेतू काय? त्यांना सत्तापदे मिळणार आहेत? नोकऱ्या मिळणार आहेत? पैसा मिळणार आहे? सामाजिक प्रतिष्ठा मिळणार आहे? अशा कारणांनी सामाजिक प्रतिष्ठा मिळण्या-वाढण्याचे भाग्यही अजून दूर आहे. मग हे सर्व कशासाठी? ही राष्ट्रभक्ती नव्हे का? वाढत्या भ्रष्टाचाराला आळा घालण्याची ताकद ज्या तरुणांच्यात आहे आणि असायला हवी, त्यापैकी बरेच जण 'बे दुणे चार' असे जीवन जगू पहात आहेत. काही 'आधुनिकते'च्या धुंदीत बुडाले आहेत. अशा वेळी सार्वजनिक भ्रष्टाचाराविरुद्ध समर्थपणे उभ्या रहाणाऱ्या तरुणांना 'गुंडांची टोळी' ठरवून कुरकरून टाकायचे की त्यांच्या कार्यक्रमांकडे स्वच्छ दृष्टीने पाहून त्यांच्या सामर्थ्याचा सदुपयोग करून घ्यायचा हे जनतेने, शासनाने आणि अधिकाऱ्यांनी ठरवायचे आहे.

'प्रश्न' प्रतिष्ठेचे बनवून ते बंदुकीच्या गोळ्यांनी वा काठ्यांनी झोडपणे सोपे आहे. पण खरा 'प्रश्न' हा आहे की, तरुणांची तरुणाई खुडून आम्ही 'उद्या' कोणाच्या हातात सोपवणार आहोत?

—सौ. शैला लोहिया

## विद्यार्थी आंदोलन : औरंगाबाद

पृष्ठ ४ वरून

मुक्तविद्यापीठाचा कार्यक्रमही, असाच ही विद्यार्थी-चळवळ इतरेजनात फैलावण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरला. एसेम, बापूसाहेब काळदाते आदि नेते ह्या व्यासपीठावर आणण्यात 'युक्रांद' नेते यशस्वी झाल्यामुळे जनतेतही निश्चितपणे अनुकूल वातावरण तयार करणे विद्यार्थी चळवळीला जमले. ह्यातूनच सार्वजनिक कृतिसमिती (सर्व पक्षीय) उभी राहिली आणि तिच्या व विद्यार्थी कृतिसमितीच्य-सहकार्याने ८ फेब्रुवारीचा 'औरंगाबाद बंद' शांतपणे पार पडला. एका विशिष्ट गटासाठीच असलेली विद्यार्थी चळवळ सर्व थरापर्यंत नेऊन पोचवणे, सर्वांची सहानुभूती ह्या विद्यार्थ्यांना मिळवून देणे हे निश्चित महत्त्वपूर्ण यश होते. ह्या यशाचे श्रेय 'युक्रांद'ला देणे आवश्यक आहे. ('आयत्या बिळावर नागोबा' अशा स्वरूपात 'युक्रांद'ने आंदोलनात उडी घेतली हे मान्य करूनही, हे श्रेय निःसंकोचपणे त्यांना द्यायला हरकत नाही!)

आणि नेमके हेच दलित विद्यार्थ्यांच्या नेत्यांना खटकले. प्रश्न दलितांचा, त्यांचाच एकसंघ भलाभक्कम आठ-नऊ हजाराचा समुदाय, लढणारेही प्रामुख्याने तेच, आणि फक्त यशाचे श्रेय, नेतृत्वाचा मान मात्र युक्रांद किंवा कुमारकडे हे त्यांना टोचले. श्री. गाढे ह्या रिपब्लिकन स्टूडंट्स फेडरेशनच्या नेत्याने ह्या प्रकारच्या युक्रांदच्या 'स्वार्थी' (?) वृत्तीमुळे चिडून जाऊन मुंबईहून पँथर्स नेत्यांना औरंगाबादेत बोलावून घेतले. सर्वश्री, राजा ढाले, नामदेव ढसाळ मुंबईतल्या आंदोलनातून पेटूनच आले होते. शिष्यवृत्ती वाढ वा तत्सम तुकड्यासाठी लढायचे त्यांना मान्य नव्हते. दुसऱ्यांच्या 'सहानुभूती पूर्वक नेतृत्वाचा तर त्यांना तिटकाराच होता. ह्या दोन्ही नेत्यांनी सांगून टाकले की, '...असल्या 'सहानुभूती' वाल्या नेतृत्वाची आम्हाला गरज नाही. आमच्या लढ्यासाठी त्यांना पुढे करवून आमच्या पुढ्यात तुकडे फेकायचे आणि पँथर्सनी चळवळ मोडायची हा शासनाचा डाव आहे. ...आमचा लढा सर्वंकष आहे. आणि सत्ता हस्तगत करूनच तो थांबेल. अधल्या मधल्या लाचार तुकड्यांची आणि खोट्या, फसव्या सहानुभूतीची आम्हाला गरज नाही...' ह्या झंझावाती वक्तव्यांबरोबरच, 'कुमार सप्तर्षिच्या आंदोलनाला साथ देऊ नका, परीक्षा जवळ आलेली असताना आता आंदोलनाऐवजी अभ्यासाकडे वळा व नंतर जूनमध्ये सर्वंकष आंदोलनासाठी तयार राहा' असा आदेश देऊन हे दोन नेते मुंबईला परतले. आपल्या भाषणातून दोन्ही पँथर्सनी सवर्णांवर कडाडून हल्ले चढवले, नेहमी प्रमाणेच !

पँथर्सच्या औरंगाबाद भेटीचे परिणाम लगेच जाणवू लागले. एकसंघ कुमारांच्या मागे धावणारा दलित समाज (किंवा विद्यार्थी म्हणूयात) फार मोठ्या प्रमाणात, कुमारांना विरोध करू लागला. पँथर्सच्या भाषणांच्या दुसऱ्याच दिवशी विद्यार्थी आंदोलकांनी, कुमारांच्या नेतृत्वाखाली कुलगुरूंना घेराव घातला. सुदैवाने तो शांतपणे पार पडला; व नंतरच्या दोन-चार दिवसात मुंबईला गेलेले शिष्टमंडळ दलित विद्यार्थी वर्गासाठी यश घेऊन परत आलेही. ह्या यशानंतर आंदोलन समाप्त झाले हेही एक परीने बरेच झाले. एरवी कुमारांना दलित विद्यार्थ्यांकडूनच सुरू झालेल्या विरोधाने उग्र स्वरूप धारण केले असते आणि युक्रांद व कुमार सप्तर्षि यांनी आंदोलनाची बसवीत आणलेली घडी विस्कटूनही गेली असती. आंदोलन समाप्तीनंतर आज असे हे कुमार सप्तर्षि आणि 'युक्रांद' विरोधाचे प्रकार नेमाने सुरू असून, मिलींद वरून कुमारना आंदोलन समाप्तीच्या दुसऱ्या तिसऱ्या दिवशीच, जवळ जवळ 'हूट आऊट' करण्यात आले हा प्रकार फार फार बोलका आहे.

ह्या संबंधात 'युक्रांद' व विशेषतः कुमार सप्तर्षि ह्यांच्याविरुद्धचा एक मला ऐकवण्यात आलेला आरोप उद्धृत करावासा वाटतो. 'युक्रांद' व कुमार सप्तर्षि ह्यांनी, रिपब्लिक फेडरेशन, दलित युवक आघाडी व विशेषतः दलित पँथर्स ह्यांना विश्वासात घेऊन आंदोलन केले असते व आंदोलन युक्रांद आणि कुमार सप्तर्षि ह्यांची व्यक्तिगत प्रतिष्ठाच केवळ वाढविण्याच्या दृष्टीकोणातून राबवले नसते तर युक्रांद–पँथर्स हा संघर्ष सहज टाळता आला असता. आंदोलन अधिक व्यापक करता आले असते व विद्यार्थ्यांना केवळ पंधरा रुपयापेक्षा बरेच अधिक काहीतरी मिळवून देता आले असते ..

आज हे आंदोलन संपले आहे. थोडेसे मर्यादित का होईना, पण यश मिळवून संपले आहे. विद्यार्थी अभ्यासात गुंतले आहेत. परीक्षेची तयारी चालू आहे. औरंगाबादेतल्या विद्यार्थी जगतात शांतता प्रस्थापित झाल्यासारखे वाटत आहे. पण विद्यार्थ्यांशी बोलताना मात्र जाणवते की ही शांतता वरवरची आहे. आंदोलनानंतर निर्माण झालेली नवी तेढ वाढीला लागत आहे. कुलगुरू नाथाविरूद्धचे आरोप वाढत आहेत. सभोवतालची परिस्थिती ह्या सुप्त अशांततेला खतपाणी घालीत आहे. म्हणूनच वाटते जून ७४ नंतर, खदखदणारी ही अशांतता नव्या आंदोलनांच्या स्वरुपात उफाळून वर येईल....

### नवनिर्माणाचा प्रयोग

विद्यार्थ्यांच्या आंदोलनांचा मागोवा घेत औरंगाबादेत हिंडत असताना एका वेगळ्या चालू असलेल्या चळवळीची माहिती मिळाली. सध्याच्या रूढार्थाने हे चालू असलेले कार्य चळवळ किंवा आंदोलन कदाचित ठरणारही नाही. चळवळीत प्रामुख्याने, कुठल्यातरी प्रस्थापित रूढीविरुद्ध वा सत्तेविरुद्ध वा नियमाविरुद्ध सामूहिक लढा त्यातून काहीसा विध्वंस व शेवटी यशापयश असा अर्थ अभिप्रेत असतो. मी आता सांगणार असलेल्या प्रयोगात ह्यातले काहीही नाही. तिथे आहे तो नवनिर्माणाचा प्रयोग. पॉझिटीव्ह अँप्रोच असलेला. अशी चळवळ हल्ली तशी विरळाच. म्हणूनच जाताजाता ह्या प्रयोगाचा त्रोटक परिचय करून दिला तर ते इथे वावगे ठरू नये.

वसंतराव नाईक महाविद्यालयात हा प्रयोग सध्या सुरू आहे. कॉलेजच्या नावावरून ह्या महाविद्यालयावर, औरंगाबादेत शिरल्यापासूनच मी काहीसा नाराज होतो. कुठल्याही जिवंत व्यक्तीच्या नावावर एखादी वास्तू उभी राहणे मनाला पटत नाही. मग ती कितीही उच्चपदस्थ का व्यक्ती असेना! ह्याखेरीज औरंगाबादेत शिरल्यापासून, शंकरराव चव्हाण विरुद्ध वसंतराव नाईक वादाचे पुराण मला अनेकदा अनेक ठिकाणी ऐकायला मिळाले. 'कुलगुरू रे. पं. नाथ ह्यांची त्या पदावरची नियुक्ती, ते केवळ शंकरराव चव्हाण विरुद्ध गटाचे असल्यामुळेच झाली; एरवी त्यांची ती पात्र-

ताच नाही. महाराष्ट्र सरकारच्या काळ्या यादीत असूनही केवळ वसंतराव नाईकांच्या बाजूचे म्हणूनच त्यांची नेमणूक झाली....' हा आरोपही प्रच्छन्नपणे ऐकायला मिळाला. 'वसंतराव नाईक महाविद्यालय' हा शंकरराव चव्हाणांच्या वर्चस्वाला तडा देण्यासाठी निर्माण केलेला राजकारणी अड्डा आहे असेही ऐकायला मिळाले. ह्या साऱ्यातून ह्या कॉलेजविषयी, कॉलेजच्या प्राचार्यांना भेटताना माझे मन कलुषित होते. पण भेटीनंतर व तिथे चाललेला प्रयोग पाहिल्यानंतर मात्र असे वाटले की, कॉलेजविरुद्ध असलेले सगळे आरोप खरे आहेत असे गृहीत धरले तरी, तिथे सुरू असलेला प्रयोग इतरत्रही अनुकरणीय आहे.

कॉलेजमधे साडेसातशे विद्यार्थी आहेत. बहुतेक सर्व अत्यंत खालावलेल्या आर्थिक परिस्थितीतले. आणि सर्व जाती जमातींचे. सध्या भाड्याच्या जागेत भरत असून, स्वतःची नवीन वास्तू, सिडको उभारीत असलेल्या नव्या औरंगाबादेत उभी राहात आहेत. ही वास्तू विद्यार्थी स्वतः घाम गाळून उभी करत आहे. अर्धी चड्डी, धुळीने, तांबडट झालेला बनियन, डोकीवर मातीने भरलेले घमेले किंवा हातातली सपसप चालणारी कुदळ महाविद्यालयात शिक्षण घेणारा विद्यार्थी असा राबतो हेच कुणाला खरे वाटणर नाही असे काम साधारणतः दोन ते तीन तास. मोबदला ? विनामूल्य शिक्षण, भोजन, राहाणे, वाचनालय आणि टच्यूशन सुद्धा ! हो टच्यूशन सुद्धा. ह्या महाविद्यालयाच्या वसतिगृहातून, कॉलेज व कामाच्या व्यतिरिक्त वेळात, प्राध्यापक विद्यार्थ्यांकडून ज्यादा अभ्यास करून घेण्यासाठी, गृहपाठातल्या त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी उपलब्ध असतात ! वसतिगृहातून वाचनालये, कॉलेजमधल्या लायब्ररीशिवाय हाही प्रकार मला वाटते इथेच असावा. ही वसतिगृहातली वाचनालये देखील विद्यार्थीच चालवतात (पुस्तके मात्र कॉलेजची !) अर्थात वाचनालय चालवणाऱ्या विद्यार्थ्याला मोबदला मिळतोच !

श्रमासाठी तयारी असणाऱ्या व स्वतःच्या शिक्षणाला आर्थिक हातभार लावायची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांनाही कॉलेज त्या दृष्टीने मदत करते. उदाहरणार्थ, एखादा विद्यार्थी न्हावी जमातीतला आहे व त्याला ती कला अवगत आहे. कॉलेज त्याला आवश्यक ती साधने उपलब्ध करून देते. वसतिगृहातले, कॉलेजातले विद्यार्थी, प्राध्यापक ह्यांच्या रूपात गिऱ्हाईकही उपलब्ध करून देते ! प्राचार्य राठोड या संदर्भात बोलताना म्हणाले, 'गेल्या कित्येक महिन्यापासून, माझी कटींग मी अशा विद्यार्थ्याकडूनच करून घेत आहे.' अशाच सोयी धोबी व इतर जमातीतल्या इच्छुक विद्यार्थ्यांसाठी कॉलेजने उपलब्ध करून दिल्या आहेत. 'प्रिंटींग प्रेस, पोल्ट्री फार्म, डेअरी, टेक्निकल वर्कशॉप वगैरे योजनाही आम्ही अंमलात आणणार आहोत. Earn while learn ही योजना त्यावेळी पूर्णांशाने सफल होईल असे मला वाटते.

दमलेल्या, थकलेल्या विद्यार्थी-विद्यार्थीनींचे, प्राध्यापकांचे खुल्या मैदानातले सहभोजन हा ह्या महाविद्यालयाचा एक नित्याचा कार्यक्रम 'ह्यातून मने सांधली जातात. बंधुत्वाचे नवे संस्कार घडवले जातात....किंबहुना, शिक्षणाबरोबर कुठल्याही प्रकारच्या श्रमाचे महत्व पटविणारे, स्वच्छतेचे, जबाबदार व सुजाण नागरिकत्वाचे संस्कारही इथल्या विद्यार्थ्यांवर झाले पाहिजेत असा आमचा प्रयत्न आहे..." इति प्राचार्य राठोड.

आणि स्वतःवर झालेले हे सु-संस्कार इतर अविकसित गटांकडे 'पास ऑन' करण्याचेही धडे इथे मिळत असावेत असे दिसते. कॉलेजच्या नव्या वास्तूजवळच असलेले एक अगदी मागासलेले खेडे म्हणूनच, ह्या कॉलेजनी 'दत्तक' घेतले असावे. तिथे ह्या कॉलेजातले विद्यार्थी-विद्यार्थिनी-प्राध्यापक वेळोवेळी जातात. साक्षरतेचे धडे देतात. तिथल्या लोकांना राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत ह्यांची माहिती करून देतात. खेड्यातले रस्ते झाडून काढतात. खेड्यातल्या कच्च्याबच्च्यांना आंघोळी घालून स्वच्छ करतात. हे सारे एकदा 'प्रदर्शन' (शो) म्हणून करून थांबत नाहीत, तर वरचेवर त्याच खेड्यात जाऊन करत राहतात....

कर्मवीर भाऊराव पाटलांनी रयत शिक्षण संस्थेत अंगिकारलेला हा प्रयोग ! त्याचीच ही पुढची पायरी....

'युक्रांद'नी इथले आंदोलन हाताळले, एका ठरीव साच्यातनं जाऊन. आंदोलनाचा विषय ज्वलंत असताना अशा आंदोलनाला उठाव मिळतो. आंदोलन करणाऱ्यांना उचलून धरले जाते. विषय संपला की आंदोलकांना मिळालेला मोठा पाठिंबा झटकन विसरून जातो. तेव्हा अशा धोपटमार्गी आंदोलनाबरोबरच, (कारण ते कधी कधी आवश्यकही असते !) 'युक्रांद'नी नाईक कॉलेज पद्धतीचा प्रयोग करून पाहिला तर ? एखादा छोटा युवक गट हेरून असा प्रयोग करून पाहायला हरकत नसावी ! श्री. बाबा आमटेंचे कधी ना कधी मार्गदर्शन लाभलेल्या 'युक्रांद'च्या तरुण वर्गाला असा विधायक कार्यक्रम अशक्य नाही ! ☐ ☐

---


# माणूस

## मालकी व तत्संबंधित इतर तपशिलाचे निवेदन

[ अधिनियम ४, नियम ८ अन्वये ]

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ : | पुणे |
| २. प्रकाशन काल : | साप्ताहिक |
| ३. मुद्रक, प्रकाशक, संपादक नाव व पत्ता | श्री. ग. माजगावकर १०२५ सदाशिव, पुणे ३०. |
| ४. नागरिकत्व | भारतीय |
| ५. प्रकाशन संस्थेचे नाव व तिच्या भागीदारांची नावे व पत्ते | राजहंस प्रकाशन<br>१. ब. मो. पुरंदरे १०२५ सदाशिव, पुणे ३०.<br>२. श्री. ग. माजगावकर १०२५ सदाशिव, पुणे ३०. |

वर दिलेला तपशील बरोबर आहे.

प्रकाशकाची सही

दिनांक २ मार्च १९७४ श्री. ग. माजगावकर





प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

महाराष्ट्र दिन, १९६०. महाराष्ट्र राज्य स्थापना सोहळ्याच्या प्रसंगी श्री. यशवंतराव चव्हाण म्हणाले होते, "....महाराष्ट्राच्या सर्व भागांचा संतुलित विकास हे आमचं ध्येय आहे." आज चौदा वर्षानंतर परिस्थिती मात्र पूर्ण भिन्न आहे. मुंबई–पुणे–नाशिक त्रिकोणाची भरघोस प्रगती तर इतर सर्वत्र सर्व भकास ही आजची दुरवस्था आहे !

ही विषमता टाळण्यासाठी लघुउद्योगांची वाढ हे सूत्र बनू शकेल का ? का जडोद्योगांशिवाय ते अशक्य आहे ?

आणि लघुउद्योग म्हणजे तरी काय ? शेती, बागायत, सेवा उद्योग लघु-उद्योगांत सामावले जाऊ शकतात का ? का केवळ इंजिनियरींग, केमिकल, प्लास्टिकचे कारखाने म्हणजेच लघुउद्योग ?

लघुउद्योग महामंडळाच्या मते उद्योजक गांवोगावच शोधले पाहिजेत, तिथल्या साधनसामुग्रीवरच उभे राहून फोफावणारे उद्योग वाढले पाहिजेत. असे उद्योजक शोधून काढून त्यांना उत्तेजन देण्यासाठीच 'एन्टरप्रिनर डेव्हलपमेंट क्लिनिक'चा प्रयोग ते चंद्रपूर जिल्ह्यात आयोजित करीत आहेत !

हे क्लिनिक म्हणजे तरी काय ?

विविध महामंडळांच्या विविध योजना आज मराठी तरुणाला उद्योग-धंद्यांसाठी उद्युक्त करायला पुढे सरसावल्या आहेत. ह्या योजना आहेत तरी काय ?....

## एक अभ्यासपूर्ण पाहाणी

# माणूस लघुउद्योग विशेषांक

## तपशील पुढील अंकी


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर